...nt to the Manoranjan.

विचारविलसित.

किंमत ०-८-०.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ६१ वें.

विचार-विलसित.

[पांच अंकी नाटक.]

आंग्ल कादंबरीकर्त्री 'जेन ऑस्टिन' यांच्या
'प्राइड ॲन्ड प्रेज्युडिस' ग्रंथाधारें,

श्रीयुत गोपाळ चिमणाजी भाटे,

वकील, रोहें, कुलाबा,

यांनीं लिहिलें.

[प्रथमावृत्ति.]

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव-मुंबई.

किंमत ०-८-०.] [जुलई १९१२.

Printed by G. N. Kulkarni, at his Karnatak Press,
7, Girgaum Back Rd., and Published by K. R. Mitra,
Proprietor of the Manoranjak Grantha Prasarak
Mandali, at the Manoranjan Office,
2 A, Charni Rd., Girgaum, BOMBAY.

विचारविलसित.

प्रस्तावना.

माझ्या बंधूनीं आपल्या '**विचारविलसित**' नाटकाची प्रस्तावना मला लिहिण्यास सांगितली, व त्यांची ही विनंति मान्य करण्यांत माझ्यावर 'गुळाचाच गणपती व गुळाचाच नैवेद्य' असा आरोप येण्याचा संभव आहे, हें जाणूनहि मी ती मोठ्या आनंदानें मान्य केली. कारण, या नाटकाच्या प्रकाशनानें माझा फार दिवसांचा हेतु तडीस गेल्यासारखें मला वाटत आहे. कां कीं, ज्या कादंबरीवरून हें नाटक रचलें गेलें आहे त्या कादंबरीचें शब्दशः भाषांतर करण्याचा माझा मानस होता. तेव्हां आपल्या नाहीं, तर आपल्या बंधूच्या हातून पर्यायानें तोच हेतु साध्य झाल्यामुळें, एकादा बहुत दिवसांचा हेतु सिद्धीस गेल्यामुळें मनाला जें समाधान वाटतें तसेंच जवळजवळ मला ही प्रस्तावना लिहिण्यानें वाटत आहे. असो.

हें नाटक 'जेन ऑस्टीन' या प्रसिद्ध इंग्रज कादंबरीकर्त्रीच्या 'गर्व व गैरसमज' या एका नामांकित कादंबरीवरून माझ्या बंधूनीं रचिलें आहे. इंग्रजी ग्रंथाधारें अलीकडे मराठींत पुष्कळच नाटकें लिहिलीं गेलीं आहेत; परंतु या नाटकांत व माझ्या बंधूच्या नाटकांत एक मोठा फरक आहे. आजपर्यंत झालेल्या असल्या नाटकांत हिंदुसमाजाच्या चालीरीतींनां अनुरूप असे फेरफार करून नाटकांतील पात्रांचें अंतरंग, बहिरंग वगैरे सर्व बदलून त्यांनां हिंदुसमाजांतील स्त्रीपुरुषांचें रूप दिलेलें आहे. माझ्या बंधूनीं वरील नाटकांत अशा प्रकारची निरंकुशता स्वीकारलेली नाहीं. त्यांनीं मूळच्या संविधानकांत किंवा पात्रांत कोणताहि फरक केला नाहीं. मूळच्या कादंबरींत जीं स्त्रीपुरुषें आहेत तींच माझ्या बंधूनीं मराठी वाचकांपुढें उभीं केलीं आहेत. मात्र त्यांनां मराठी वाचकांच्या सोईकरितां मराठींत बोलावयास लाविलें आहे, व मूळ ग्रंथाचें कादंबरीचें श्राव्य काव्याचें स्वरूप काढून त्याला नाटकाचें—दृश्य काव्याचें–स्वरूप दिलें आहे. अशा नाटकाचा प्रकार आपल्या भाषेंत रूढ होणें जरूर आहे, असें माझें मत आहे. त्याचीं कारणें नमुद करण्यापूर्वी प्रथमतः मूळ कादंबरीचें थोडक्यांत संविधानक देणें योग्य होईल.

विचारविलसित.

मिस्तर बेनेट नांवाचे एक सुखवस्तु जमीनदार गृहस्थ लाँगबोर्न या गांवीं राहत असत. त्यांनां पांच अविवाहित मुली होत्या. सर्वांत लहान १६ वर्षांची होती व सर्वांत मोठी तेवीस वर्षांची होती. मिसेस बेनेट (मिस्तर बेनेटची वायको) ही अगदीं अशिक्षित, मूर्ख, व व्यवहारशून्य अशी बाई असतां तरुणपणीं तिच्या सौंदर्यावर भुलून मिस्तर बेनेटनें तिच्याशीं लग्न केलें होतें; परंतु त्याचा पुढें त्याला पश्चात्ताप झाला होता. तरी पण बेनेट हा गत गोष्टीबद्दल उगीच खेद करीत बसणारा मनुष्य नसल्यामुळें, बायकोची थट्टा करण्यांत व वाचनांत काळ घालवी. त्याला खरें गृहसौख्य नव्हतें. बेनेटच्या पांच मुलींपैकीं थोरली जेन ही फारच सुंदर व अत्यंत गोड स्वभावाची होती. ती स्वतः चांगली असल्यामुळें तिला सर्व जग चांगलें वाटे. तिची दुसरी बहीण एलिझाबेथ ही फार हुशार, चलाख व मोठी चाणाक्ष होती. हीच या कथानकांतील नायिका होय. खालच्या तिघी मुलींत विशेष गुण कांहींच नव्हते. तिसरीला लिहिण्यावाचण्याचा फार नाद होता. चवथी व पांचवी या अल्लड मुली आईच्या मूर्ख लाडानीं अचरट व उच्छृंखळ बनलेल्या होत्या.

लाँगबोर्न गांवानजिक नेदरफील्ड ह्मणून एक ठिकाण होतें. तेथें मिस्तर बिंगले नांवाचे एक तरुण गृहस्थ रहावयास आले होते. हे गृहस्थ चांगले श्रीमंत होते. यांनां एक अविवाहित व एक विवाहित अशा दोन बहिणी होत्या. मिस्तर बिंगले यांचें लग्न झालेलें नव्हतें. बिंगलेच्या वडिलांनीं व्यापारांत पुष्कळ पैसा मिळविला होता. मिस्तर डार्सी नांवाचा बिंगले यांचा एक स्नेही होता. हा पिढीजाद श्रीमंत असून त्याची पेंबरले नांवाची डर्बीशायर-मध्यें मोठी इस्टेट होती. या दोघां मित्रांच्या स्वभावांत मात्र फार अंतर होतें. बिंगले हा फार मनमिळाऊ, खुल्या दिलाचा व सुस्वभावी तरुण होता. डार्सी हा गर्विष्ट, अभिमानी, मितभाषी व खोल स्वभावाचा तरुण होता. ही नवी मंडळी गांवांत आल्यामुळें शिष्टाचारानुरूप मिस्तर बेनेट त्यांनां भेटावयास जाऊन मिस्तर बेनेटच्या कुटुंबाचा व मिस्तर बिंगले यांच्या मंडळीचा स्नेह जमला. ही मंडळी गांवांत आल्यावर लवकरच एका नृत्याचा समारंभ सर ल्यूकस नांवाच्या गृहस्थांचे घरीं झाला. त्या वेळीं बिंगलेला जेन फार आवडली व ह्मणून त्यानें तिच्याशीं बराच वेळ नृत्य केलें. त्या समारंभाचे दिवशीं पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या जास्त होती, व कोणी खेळगडी न मिळाल्यामुळें एलिझाबेथ रिकामी

बसली होती. डार्सीहि आपल्या मंडळीशींच केव्हांकेव्हां बोलत, पण इकडे तिकडे हिंडत होता; हें पाहून बिंगले त्याजकडे जाऊन त्याला नृत्याचा आग्रह करूं लागला व एलिझाबेथकडे बोट दाखवून 'या मुलीशीं मी तुझी ओळख करून देतों, तूं तिच्याशीं नृत्य कर,' असें ह्मणाला. यावर डार्सीनें एलिझाबेथकडे पाहिलें व दोघांची दृष्टादृष्ट झाल्यावर डार्सीनें बिंगलेला ह्मटलें, 'ही मुलगी बरी आहे; परंतु ती मला नृत्य करण्याचा मोह पाडण्याइतकी सुंदर नाहीं. तेव्हां तूं आपला जा!' हें संभाषण एलिझाबेथला ऐकूं आलें, व एलिझाबेथचा डार्सीविषयीं व त्याच्या गर्विष्ठपणाविषयीं ग्रह दृढ होऊन ती यापुढें त्याच्याकडे दोषैकदृष्टीनें पाहूं लागली. बिंगलेचें जेनकडे जास्त लक्ष्य जाऊं लागलें. त्यांतच एकदां जेन बिंगलेकडे गेली असतांना तेथेंच तापानें आजारी पडली व त्या निमित्तानें जेन व एलिझाबेथ या दोघीहि बहिणींचें आठवडाभर बिंगलेच्या घरीं राहणें झालें, व डार्सीशीं एलिझाबेथचा बोलण्याचा प्रसंग आला व तिची हुशारी, आनंदी स्वभाव, बुद्धिमत्ता व तिच्या शरीराची ठेवण आणि विशेषतः तिचे पाणीदार डोळे यांनीं डार्सीचें मन तिच्यावर जाऊं लागलें, व डार्सी तिच्याजवळ जास्त बोलण्याचे प्रसंग आणूं लागला. याचा एलिझाबेथला गंधहि नव्हता. तो आपली चेष्टा करण्याकरितां दोषैकदृष्टीनें आपल्याकडे पाहतो व बोलतो असाच तिचा समज होता. इकडे जेन व बिंगले यांचेंहि प्रेम जडत चाललें होतें.

याच सुमारास मेरीटन गांवीं असलेल्या पलटणींत मिस्तर विखम नांवाचा एक नवा ऑफीसर आला होता. हा डार्सीच्या बापाच्या कारभाऱ्याचा मुलगा होता. विखम हा फार ख्यालीखुशाली, चैनी व उधळ्या होता; तथापि चांगला देखणा होता, व त्याचें बोलणें परक्या माणसास मोह पाडणारें होतें. एलिझाबेथची व त्याची ओळख झाली, तेव्हां एलिझाबेथच्या मनावर त्यानें चांगलीच छाप बसविली, व डार्सीविषयीं तिचें मन चांगलें नाहीं हें समजतांच त्यानें डार्सीविषयीं पुष्कळच खोट्यानाट्या गोष्टी सांगून व त्याची नालस्ती करून एलिझाबेथचें मन डार्सीविषयीं जास्तच कलुषित करून ठेविलें. एलिझाबेथची एक अत्यंत जिवलग मैत्रिण सर लुकसची मुलगी शार्लट ह्मणून होती. ती कुरूपांपैकींच होती, यामुळें तिच्या लग्नाचा योग आलेला नव्हता. इकडे मिस्तर बेनेटचा एक दूरचा नातेवाईक मिस्तर कॉलीन्स ह्मणून होता. या स्वारीचें शिक्षण बेताबाताचेंच असून तो मोठा हांजी-

ह्यांजीखोर व स्वतःची आढ्यता मानणारा होता. त्याला नुकतीच एका श्रीमंत बाईच्या घरची धर्मोपदेशकाची जागा मिळाली होती. ही बाई डार्सीची मावशी होती. आतां आपली सांपत्तिक स्थिति संसार करण्यासारखी आहे असें पाहून कॉलीन्स हा साधल्यास बेनेटच्या एखाद्या मुलीशीं लग्न करण्याच्या हेतूनें मुद्दाम लाँगबोर्नला आला होता; परंतु तसा योग कांहीं जुळला नाहीं. तथापि शार्लटनें हें स्थळ बरें आहे व आपलेंहि वय होत चाललें, हें पाहून दूरदर्शीपणानें त्याची मागणी कबूल केली व लवकरच त्यांचा विवाह होऊन शार्लट त्याचेबरोबर त्याचे गांवीं हन्सफर्डला गेली. अशा माणसाला शार्लटनें पतकरिलें याबद्दल एलिझाबेथला वाईट वाटलें शार्लटनें नवऱ्याचे घरीं जातांना एलिझाबेथकडून आपल्या नवऱ्याच्या गांवीं आपल्या वडिलाबरोबर येण्याचें कबूल करून घेतलें होतें.

इकडे जेन व बिंगले यांचें प्रेम वृद्धिंगत होत होतें व या दोघांचें लग्न होणार अशी सर्वत्र वदंता उठली; परंतु ही गोष्ट डार्सी व बिंगले याच्या बहिणी यांनां पसंत नव्हती. आपल्या श्रीमंत भावाचें व मित्राचें चांगल्या श्रीमंत मुलीशीं लग्न व्हावें असें बिंगले याच्या बहिणींनां व डार्सी याला वाटत होतें; परंतु जेन तर गरीबच होती; तेव्हां हें लग्न फिसकटविण्याचा या दोघांनीं बेत केला व बिंगले सहज लंडनला गेला असतांना यांनीं मागें कारस्थान रचून त्याच्या मागोमाग प्रयाण केलें. हेतु हा कीं, बिंगलेची व जेनची ताटातूट झाली ह्मणजे बिंगलेला तिचा विसर पडेल. शिवाय 'जेनचें तुझ्यावर खरें प्रेम नाहीं' असें त्यांनीं बिंगलेच्या मनांत भरवून दिलें. या त्यांच्या कृत्यानें जेनच्या मनाला मोठा धक्का बसला.

पूर्वी ठरल्याप्रमाणें सर ल्यूकसबरोबर एलिझाबेथ हन्सफर्डला मिस शार्लट— मिसेस कॉलीन्सकडे गेली. कर्मधर्मसंयोगानें मिस्तर डार्सीहि याच वेळीं आपली मावशी लेडी कॅथेराईन डि बरो यांचे घरीं राहण्यास आला होता. अर्थात् एलिझाबेथ व डार्सी यांच्या नेहमीं गांठी पडूं लागल्या व डार्सीचें मन एलिझाबेथकडे जास्त जास्त ओढूं लागलें. तिचें कुळ आपल्यापेक्षां फारच हलकें, तिच्या बहिणी व आई या अगदीं अशिक्षित, तिची नातेवाईकमंडळी आपल्यापेक्षां सर्वतोपरी कमी दर्जाची, तेव्हां आपल्यासारख्या पिढीजाद, श्रीमान्, जमीनदार व वरच्या दर्जाच्या माणसानें एलिझाबेथशीं लग्न करणें हें आपल्या कुटुंबाभिमानाला,

आपल्या गर्वाला, आपल्या मानीपणाला व एकंदर विचाराला पसंत नाहीं असें त्यास वाटे, तरी पण एलिझाबेथकडे डार्सीच्या प्रेमाचा ओघ जोरानें वाहूं लागला.

इकडे एलिझाबेथचें मन तर डार्सीविषयीं जास्तजास्तच कलुषित होत चाललें. तिला कळून आलें कीं, जेनच्या व बिंगलेच्या लग्नांत मोडता डार्सीनेंच घातला. आपल्या प्रिय बहिणीच्या सुखांत डार्सीनें माती कालविली हें कळल्यापासून तर ती त्याच्यावर फारच रागावली. एलिझाबेथची अशी मनःस्थिति असतांना एके-दिवशीं डार्सीनें प्रेमाच्या भरांत तिला मागणी घातली व आपल्या मनांत प्रेम व विचार यांचा कसा झगडा चालला होता, वगैरे सर्व गोष्टी सांगितल्या. पण आपल्याला एलिझाबेथकडून नकारार्थी उत्तर मिळेल अशी त्याच्या मनांत शंकासुद्धां आली नाहीं. परंतु एलिझाबेथनें आपलें त्याच्याविषयींचें मत स्पष्टपणें सांगितलें 'व माझ्या प्रिय बहिणीच्या सुखाआड येणाऱ्या व मिस्तर विखमसारख्या भल्या माणसाला निर्दय तऱ्हेनें वागविणाऱ्या आणि आपल्याच माणसाविषयीं फाजील अभिमान बाळगणाऱ्या व दुसऱ्याच्या मनोविकाराविषयीं अगदीं बेफिकीर राहणाऱ्या अशा माणसाशीं आपण लग्न लावण्यास कधींहि तयार होणार नाहीं, असें तिनें निक्षून सांगितलें! या योगानें डार्सीला फार दुःख झालें. दुसरे दिवशीं डार्सीनें आपल्यावरील आरोपांचें खंडन ज्यांत केलें आहे असें पत्र लिहून एलिझाबेथच्या हातीं दिलें. त्या पत्रांत सर्व गोष्टी खुल्या दिलानें, सरळपणानें, यत्किंचितहि आड पडदा न ठेवितां व आपल्या बहिणीच्या दुर्वर्तनासारख्या अत्यंत खासगी व गुप्त गोष्टी कळविल्या होत्या व विखमचें खरें स्वरूप प्रकट केलें होतें. या पत्रानें एलिझाबेथचे डोळे उघडले. डार्सीचा सुस्वभाव व विखमचा दुष्ट स्वभाव यांची चांगली खातरी पटली व तिचा गैरसमज दूर होऊन तिचें डार्सीविषयींचें मत बदलत चाललें.

या मध्यंतरीं घडलेल्या गोष्टीची कोणास गंधवार्ताहि नव्हती. एलिझाबेथ लाँगबोर्नला परत आली. इतक्यांत मेरीटन एथें असलेली पलटण तेथून निघून ब्रायटनास गेली व त्यामुळें एलिझाबेथची कनिष्ठ बहिण लिडिया इला करमेनासें झालें. कारण, त्या अल्लड व उच्छृंखळ मुलीला ऑफीसरखेरीज दुसरा नादच नव्हता! तिनें आपल्या मैत्रिणीबरोबर ब्रायटनला जाण्याचा बेत केला. एकट्या लिडियाला ब्रायटनला धाडणें चांगलें नाहीं, तेथें वाईट लोक जमतात व लिडियाला तर धोरण मुळींच नाहीं, तेव्हां तिला धाडूं नये, असें एलिझाबेथला वाटत होतें, व त्याप्रमाणें ती बापाजवळ बोलली; परंतु बापाच्या निष्काळजीपणामुळें त्यानें

लिडियाची कटकट नको, ह्मणून तिला जाऊं दिलें. विखम हा अत्यंत वाईट व भयंकर मनुष्य आहे याबद्दलची एलिझाबेथला मिळालेल्या माहितीचा परिस्फोट एलिझाबेथनें जेनच्या संगनमतानें केला नाहीं.

पुढें एलिझाबेथ आपल्या मिसेस गार्डिनर नांवाच्या मामीबरोबर प्रेक्षणीय स्थलें पाहण्याकरितां ह्मणून प्रवासास निघाली. त्या प्रवासांत एलिझाबेथला डार्सीचें पेंबरले एथील घर व इस्टेट पाहण्याची संधी मिळाली. त्याचें वैभव, त्याची अभिरुचि व डार्सीचें घर राखणारणीकडून मिळालेली त्याच्या बालपणापासूनच्या स्वभावाची माहिती, या योगें एलिझाबेथच्या मनांत डार्सीविषयीं जास्तच चांगला गृह उत्पन्न झाला व तिला डार्सी आवडूंहि लागला. मिस्तर गार्डिनर वगैरे मंडळी ज्या दिवशीं पेंबरले पहावयास गेली होती, त्या दिवशीं डार्सी तेथें नव्हता, असें त्यांनां कळलेलें होतें; परंतु ही मंडळी बाग पहात असतांना डार्सी त्यांच्या दृष्टीस पडला. त्याला ही मंडळी पाहून आश्चर्य वाटलें. परंतु तो एलिझाबेथपाशीं येऊन तिच्याजवळ बोलूं लागला, व त्यानें मध्यंतरींच्या घडलेल्या गोष्टींचा आपल्या मनावर योग्य परिणाम झाला आहे असें आपल्या सभ्य वर्तनानें दाखविलें. एलिझाबेथला डार्सीच्या वर्तनांतील फरक दिसून आला व त्याचें प्रेम आपल्यावर आहे कीं काय, अशी तिला शंका वाटूं लागली. या वेळपर्यंत आपल्या मनांत त्याच्याविषयीं प्रेमोद्भव झाला आहे, हें तिला कळलें नव्हतें. या ठिकाणीं डार्सीच्या बहिणीची डार्सीनें एलिझाबेथशीं ओळख करून दिली. बिंगले वगैरे मंडळीहि एथेंच पुनः एलिझाबेथला भेटली. याप्रमाणें एलिझाबेथचे हे प्रवासाचे दिवस सुखांत जात असतां तिला एक दुःखदायक बातमी घराकडून कळली. जेनचें तें बातमीचें पत्र वाचीत एलिझाबेथ एकटीच खोलींत होती, इतक्यांत डार्सी तेथें आला, व एलिझाबेथचा अत्यंत दुःखी चेहरा पाहून त्यालाहि वाईट वाटलें. त्यानें एलिझाबेथच्या दुःखाचें कारण कळवळ्यानें विचारिलें. आतां डार्सीला खरें कारण सांगण्यास एलिझाबेथला वाईट वाटलें नाहीं. कारण, तोहि तितक्याच खुल्या दिलानें तिच्याशी वागला होता. "लिडिया ब्रायटनहून विखमबरोबर पळून गेली व तिनें आपल्या व सर्व कुटुंबाच्या अब्रूला काळीमा आणली," असें सांगून एलिझाबेथ दुःखावेगानें रडूं लागली. डार्सी तिच्या दुःखाबद्दल सहानुभूति प्रदर्शित करून निघाला, तो लागलीच त्या दोघांनां शोधून काढण्याचा निश्चय करून निघाला. या बातमीमुळें एलिझाबेथ व तिचा मामा

व मामी तावडतोब लॉंगबोर्नला गेली व मिस्तर गार्डीनर त्यांचा शोध करण्याकरितां लंडनला आला. मिस्तर बेनेटहि लंडनला गेला होता; त्याला गार्डिनरनें घरीं पाठविलें. पुढें लवकरच लिडियाचा व विखमचा शोध लागून त्यांचें कसें तरी लग्नाचें ठरविलें आहे ह्मणून गार्डिनरचें पत्र आलें. या कामाकरितां बराच पैसा खर्च करावा लागला. लग्न तरी घडून आलें, हें दुःखांत सुख असें एलिझाबेथला वाटलें. लग्न लागल्यावर लिडिया परत लॉंगबोर्नला आली. तिला झालेल्या गोष्टींत कांहींच वाईट वाटलें नाहीं, असें दिसलें; परंतु जेन व एलिझाबेथ यांनां मात्र लिडियाच्या या उच्छृंखलपणाबद्दल व दुर्वर्तनाबद्दल फारच वाईट वाटलें. सहज बोलतां बोलतां 'डार्सी आपल्या लग्नाला हजर होते' असें लिडिया बोलून गेली. एलिझाबेथला आश्चर्य वाटलें, व या गोष्टीचा सर्व खुलासा तिनें मिसेस गार्डीनरकडून करून घेतला. तेव्हां तिला समजलें कीं, विखमला व लिडियाला शोधून काढण्याची सर्व खटपट डार्सीनेंच केली. त्यानेंच त्याचें हजारों रुपयांचें कर्ज फेडिलें, त्यानेंच लिडियाशीं लग्न लावण्यास विखमचें मन तयार केलें, व त्याला दूरच्या एका पलटणींत नोकरी लावून दिली. ही सर्व खटपट, हे सर्व हाल व हे सर्व त्रास डार्सीनें आपल्या प्रेमाखातर घेतले, अशी एलिझाबेथची मनोदेवता तिला सांगू लागली.

या हकीकती घडल्यानंतर मिस्तर बिंगले पुन्हा नेदरफील्डला रहावयास आला व थोड्याच दिवसांत पुन्हा त्याची व जेनची गांठ पडूं लागून पूर्वीचा गैरसमज दूर होऊन बिंगलेचें व जेनचें लग्न ठरलें. या बातमीमुळें डार्सीचें व एलिझाबेथचें लग्न होणार अशी वदंता उठली, व ती लेडी कॅथेराईन डी बरोच्या कानावर गेली. या बड्या बाई एलिझाबेथकडे या बातमींतील खरेखोटेपणा काढण्याकरितां आल्या. त्या एलिझाबेथला उपमर्दकारक बोलल्या व डार्सीशीं लग्न न करण्याबद्दल तिच्याजवळ वचन मागूं लागल्या. एलिझाबेथचें आतां डार्सीविषयींचें मत बदललेलें होतें. अर्थात् अशा प्रकारचें वचन देण्यास ती कबूल नव्हती. लेडी कॅथेराईन मोठ्या रागानें तेथून निघून आपल्या भाच्याचें मन अशा अयोग्य संबंधापासून परावृत्त करण्याच्या हेतूनें त्याचेकडे गेल्या, व एलिझाबेथच्या उर्मट वर्तनाचा त्यांनीं पाढा वाचला. त्याचा परिणाम उलटच झाला. लेडी कॅथेराईनशीं एलिझाबेथच्या झालेल्या संभाषणाच्या कळलेल्या गोषवाऱ्यावरून डार्सीच्या मनांत आशा उत्पन्न झाली. त्याचें एलिझाबेथवर अढळ प्रेम जडलेलें होतें. परंतु एलिझाबेथचें आपल्या-

विषयींचें पूर्वीचें मत बदललेलें आहे हें त्याला कळून आलें व ह्मणून तो परत नेदरफील्डला आला व योग्य संधी येतांच त्यानें एलिझावेथला पुनः मागणी घातली. या खेपेला डार्सीची ती मागणी एलिझावेथनें मोठ्या आनंदानें कबूल केली. याप्रमाणें गर्व व गैरसमज दूर होऊन, पुष्कळ सहवासानें व एकमेकांच्या स्वभावाच्या ज्ञानानें उत्पन्न झालेल्या प्रेमानें बद्ध होऊन डार्सी व एलिझावेथ यांचें शेवटीं लग्न झालें.

माझ्या बंधूचें नाटक समजण्यास सोपें जावें ह्मणून थोड्या विस्तारानें हें संविधानक दिलें आहे. या संविधानकावरून नाटकाच्या विशेषाचेंहि सहज समर्थन करतां येईल. या कादंबरींत इंग्रज समाजांतील मध्यम स्थितींतील स्त्रीपुरुषांच्या संसाराचें उत्तम चित्र रेखाटलें आहे. इंग्रजलोकांतील चालीरीति, त्यांचे आचारविचार, मध्यम स्थितींतील लोकांचे गुणदोष, यांचे यथार्थ वर्णन या कादंबरींत आहे; कादंबरीमध्यें वस्तुस्थितीचेंच चित्र रेखाटलें असूनहि ही कादंबरी इतकी मनोवेधक, इतकी हृदयंगम आहे कीं, ती एकदां वाचूं लागलें कीं, शेवटपर्यंत गेल्या-खेरीज राहवतच नाहीं. एवढेंच नव्हे, तर ही कादंबरी पूर्वी कितीहि वेळां वाचलेली असली तरीहि प्रत्येक वाचनाचे वेळीं वाचकाची हीच स्थिति होते ! 'जेन ऑस्टिन'ला संभाषणाच्या योगानें मनुष्यस्वभावांतील बारिकसारिक खाची-खोची, गुणदोष व स्वभावभेद दाखविण्याची विलक्षण हातोटी साधलेली आहे. या कामांत ती जवळजवळ शेक्स्पीयरच्या तोडीची आहे. इंग्रजग्रंथकारांपैकीं प्रसिद्ध कादंबरीकार स्कॉट यानें आपल्या खासगी डायरींत या ग्रंथकर्त्रीसंबंधानें लिहिलेला पुढील अभिप्राय वाचनीय आहे:—

"मी पुन्हाः एकदां, व ही निदान तिसऱ्यांदा तरी, जेन आस्टिनची 'गर्व व गैर-समज' नांवाची फारच सुंदर कादंबरी वाचली. या तरुण स्त्रीला संसारांत नेहमीं दृष्टीस पडणाऱ्या साधारण मनुष्यांच्या स्वभावाचें, त्यांच्या मनोवृत्तीचें व त्या संसारांतील गुंतागुंतीचें हुबेहुब चित्र रेखण्याची विलक्षण हातोटी साधली आहे. अशा प्रकारची कला मीं आजन्मांत पाहिली नाहीं ! हल्लीं पुष्कळ लोक करीत आहेत, त्याप्रमाणें (अद्भुत प्रसंगाच्या अतिशयोक्तीच्या मनुष्याच्या अन्तःकरणांतील प्रबल मनोवृत्तीच्या वर्णनाचा) कोलाहल मला साधतो; परंतु सामान्य व्यव-हारांतील अगदीं साध्या गोष्टी, व सामान्य मनोवृत्ति यांचें हुबेहुब वर्णन करून वाचकांची वृत्ति तल्लीन करण्याची कला मला अवगत नाहीं !"

वरील उताऱ्यावरून जेन ऑस्टिनच्या कादंबऱ्यांची योग्यता ध्यानांत येईल! आतां अशा कादंबऱ्यांच्या संविधानकांत हात घालून त्याला हिंदूस्वरूप व पेहराव देण्याचा प्रयत्न केल्यास '**विनायकं प्रकुर्वाणो जनयामास वानरं**' किंवा '**न हिंदुर्नयवनः**' असा प्रकार व्हावा, हें साहजिक आहे! अशा रीतीनें लिहिलेल्या कादंबऱ्या व नाटकें कदाचित् मनोरंजक होत असतील; परंतु कादंबरी, नाटकें यांचा मनोरंजन इतकाच केवळ उद्देश नाहीं. अलीकडे मराठींत झालेल्या लेखकांनीं हाच प्रधान हेतु डोळ्यांपुढें ठेवल्यासारखा दिसतो. नाटकांत अश्लील थट्टामस्करीचे प्रसंग आणावे, कांहीं बीभत्स रसांचीं स्थळें घालावीं, कोठें अमानुष कृत्यांचें वर्णन करून भयानक रस उत्पन्न करावा, अस्वाभाविक व मनुष्यस्वभावाविरुद्ध प्रसंग आणावे, ह्मणजे लोक थक्क होऊन जातात, ते लेखकांची वाहवा करतात, नाटक पाहण्यास लोकांच्या उड्यांवर उड्या पडतात, व आपल्याला चापून पैसे मिळतात, असें पाहून पुष्कळ लेखकांनीं हाच मार्ग स्वीकारल्यासारखा दिसतो. परंतु इकडलीतिकडली चोराचोरी करून लोकांच्या क्षणैक मनोवृत्तीला पटतील अशीं नाटकें लिहिणें हें खऱ्या नाटककाराचें काम नव्हे! मनोरंजन करणें हें नाट्यकाराचें काम आहे खरें, परंतु तितकीच महत्त्वाची दुसरी कामगिरी त्याला करावयाची असते. नाटक हें खऱ्याखुऱ्या संसाराचें चित्र असावयास पाहिजे. त्यापासून समाजांतील चालींरीतींचें ज्ञान झालें पाहिजे; मानवी स्वभावाचें, मनोवृत्तींचें व त्यांच्या संमिश्र मिलाफाचें व त्या योगें होणाऱ्या मनुष्याच्या वर्तनाचें ज्ञान मिळालें पाहिजे. नाटकानें मनुष्याच्या मनोवृत्ति उज्ज्वल व उदार झाल्या पाहिजेत. सारांश, नाटकाच्या वाचनानें मनुष्याला बहुश्रुतपणा आला पाहिजे; त्यांची नैतिक प्रगति झाली पाहिजे; त्याला व्यवहारिक ज्ञान झालें पाहिजे. हेंच नाट्यकाराचें उच्चतर ध्येय आहे व हें साधण्याकरितां निरनिराळ्या समाजाचीं चित्रें व मानवी-स्वभावाचीं यथार्थ रूपें त्यानें रेखाटलीं पाहिजेत. आज सर्व सुधारलेल्या जगांत शेक्स्पीयरला जें अग्रस्थान मिळालें आहे, तें त्याचीं नाटकें निवळ मनोरंजक आहेत एवढ्यानेंच मिळालें नाहीं! तीं मनोरंजक तर आहेतच, परंतु त्याचीं नाटकें ह्मणजे चित्रमय मानसशास्त्र आहे; तीं सर्व ज्ञानसंग्रह आहेत. तीं व्यवहार चातुर्याचा रत्नाकर आहेत. सारांश, शेक्स्पीयरच्या काव्याचा अभ्यास ह्मणजे सर्वाङ्गीण उदार शिक्षणच होय. अशा या उच्च ध्येयाला साजतील अशीं नाटकें मराठींत झालीं पाहिजेत. परंतु अशीं होण्यास प्रचलित प्रघाताचा मोठा अडथळा

आहे. सर्व नाटकांनां हिंदूस्वरूप देण्याच्या पद्धतीपासून खालील नुकसान झालेलें आहे.

आमच्या वाचकवर्गाला हिंदूसमाजाखेरीज दुसऱ्या चालीरीति खपत नाहींशा झाल्या आहेत. एकाच समाजाचीं चित्रें लोकांपुढें आल्यामुळें त्याची कूपमंडुकाप्रमाणें स्थिति होते. आपल्या चालीरीति तेवढ्याच उत्तम, असा खोटा ग्रह होतो. दुसऱ्या समाजाच्या चालीरीतींबद्दल ज्ञान होत नाही, इतकेंच नाहीं, तर त्याबद्दल तिटकारा उत्पन्न होतो. मनुष्याच्या खऱ्या प्रगतीस त्याला चांगलेंवाईट समजणें आवश्यक आहे. चांगलें वाईट ओळखून काढण्यास निरनिराळ्या चालीरीति पाहिल्या पाहिजेत, किंवा त्याबद्दल माहिती मिळविली पाहिजे. ती माहिती मिळण्याचें एक उत्तम साधन ह्मणजे निरनिराळ्या समाजाचीं हुबेहुब चित्रें रेखाटलीं आहेत अशा प्रकारचीं नाटकें व कादंबऱ्या या होत, व ह्मणून इंग्रजींतील सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्या व तसल्या प्रकारचीं नाटकें यांचीं मराठींत शब्दशः भाषांतरें होणें इष्ट आहे, अशी माझी फार दिवसांची ससजूत आहे. तुह्मीं मराठींत भाषांतर करण्यास हवीतितकी मेहनत घ्या, धेडगुजरी वाक्यें, इंग्रजी शब्दप्रयोग ओबडधोबड भाषा, खडबडीत न समजण्यासारखें भाषांतर करणें करूं नका. या गोष्टीकडे जास्त लक्ष घाला. अशा तऱ्हेनें मराठी वाङ्मयांत भर घालणें कमी महत्त्वाचें नाहीं. जॉवेट या प्रसिद्ध इंग्रज तत्वज्ञानाच्या प्रोफेसरानें आपलें सर्व बुद्धिसामर्थ्य, आपलें सर्व आयुष्य, प्लेटोच्या ग्रंथांचें भाषांतर करण्यांत घालविलें व हें काम त्यानें इतक्या उत्तम तऱ्हेनें केलें आहे कीं, हीं भाषांतरें आहेत असें आपल्याला सांगितल्याखेरीज कळणार नाहीं! असा भाषांतरकार होणें कांही कमी महत्त्वाचें नाहीं. प्रत्येक माणसाला प्रतिभाशाली व स्वतंत्र कल्पनावान् नाटयकार होतां येणार नाहीं; परंतु आमच्या मराठींत इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें कादंबऱ्या लिहिणारांनां आपल्याला मूळ संविधानकांत फेरफार करण्याचा पूर्ण अधिकार आहे असें वाटतें, व मूळच्या प्रतिभाशाली कवीच्या कृतींत हे भाषांतरकार शालजोडीला घोंगडीचें ठिगळ लावून मुळच्या नाटकाचा किंवा कादंबरीचा बेरंग करून टाकतात!

तेव्हां मूळांत कोणताहि फरक न करितां माझ्या बंधूंनीं जेन ऑस्टिनच्या एका कृतीचें मराठी वाचकांकरितां शब्दचित्र देण्याचा विचार करून '**विचारविलसित**' हें नाटक लिहिलें आहे व हा नवा प्रकार भाषेंत येणें आवश्यक आहे

अशी माझी समजूत असल्यामुळें या प्रकारचे समर्थनपर दोन शब्द मीं या प्रस्तावनेंत लिहिले आहेत.

शेवटीं, माझ्या बंधूसारख्या नवख्या पण होतकरू मराठी लेखकाच्या पहिल्याच वाङ्मयविषयक प्रयत्नाला–आणि त्यांतहि तो प्रयत्न नवा व लोकाभिरुचीविरुद्ध असतांना—मूर्त स्वरूप देण्याचें धाडस मासिक मनोरंजनकारांनीं केलें, व माझ्या बंधूचें नाटक मनोरंजनाच्या वाचकांस बक्षीस पुस्तक ह्मणून देण्याचें ठरविलें, याबद्दल त्यांचे आभार मानून या किंचित् लांबलेल्या प्रस्तावनेची समाप्ति करतों.

गोविंद चिमणाजी भाटे.

या नाटकांतील पात्रें.

मिस्तर बेनेट—एक सभ्य गृहस्थ व नायिका ‘ एलिझाबेथ ’ इचा बाप.

मिस्तर डार्सी—नायक. एक तरुण व श्रीमान् जमीनदार.

मिस्तर बिंगले—डार्सीचा मित्र.

सर विल्यम ल्यूकस—एक बॅरोनेट व नायिकेची मैत्रीण शार्लट इचा बाप.

मिस्तर कॉलीन्स—मिस्तर बेनेटचा दूरचा पुतण्या व शार्लटचा नवरा.

मिस्तर विखम—डार्सीच्या बापाच्या कारभाऱ्याचा मुलगा.

मिस्तर फिलिप्स—एक वकील व नायिकेच्या मावशीचा नवरा.

मिस्तर गार्डिनर—नायिकेचा मामा.

कर्नल फिट्झविल्यम—डार्सीचा मावसभाऊ.

मिस्तर डेनी—लष्करांतील एक ऑफिसर.

जॉन—मिस्तर गार्डिनरचा नोकर.

मिस्तर हर्स्ट—मिस्तर बिंगलेच्या वहिणीचा नवरा.

एलिझाबेथ (लिझी)—नायिका. मिस्तर बेनेटची मुलगी.

जेन—
मेरी—
कॅथेराईन—
लिडिया— } मिस्तर बेनेटच्या इतर मुली व नायिका एलिझाबेथ इच्या वहिणी.

मिसेस बेनेट—मिस्तर बेनेटची बायको व नायिका एलिझाबेथ इची आई.

मिस डार्सी—डार्सीची बहीण.

मिसेस हर्स्ट (लुअॅझा)—मिस्तर बिंगले याची बहीण व मिस्तर हर्स्टची बायको.

मिस बिंगले(कॅरोलाईन)—मिस्तर बिंगले याची दुसरी बहीण.

लेडी ल्यूकस—सर विल्यम ल्यूकसची बायको व शार्लटची आई.

शार्लट—मिस ल्यूकस. (पुढें मिसेस कॉलिन्स) एलिझाबेथची मैत्रीण.

मिसेस फिलिप्स—मिसेस बेनेटची बहीण. व एलिझाबेथची मावशी.

मिसेस गार्डिनर—मिस्तर गार्डिनरची बायको व एलिझाबेथची मामी.

लेडी कॅथेराईन डि बरो—डार्सीची मावशी.

मिस डि बरो—डार्सीची मावसबहीण.

मिसेस रेनॉल्डस—डार्सीची घरराखणारीण बाई.

विचारविलसित.

अंक पहिला.

प्रवेश पहिला.

[**स्थल**—लांगबोर्न. लेडी[1] ल्यूकस व मिसेस[2] बेनेट
बोलत बसल्या आहेत, असा प्रवेश.]

लेडी ल्यूकस—कसें काय, बरें आहे ना ?

मिसेस बेनेट—विशेष असें कांहीं नाहीं. तरी पण जेन आजारी असून हल्लीं ती येथें नाहीं. बाकी सर्व ठीक आहे.

लेडी ल्यूकस—ह्मणजे ? तुमच्या बोलण्याचा कांहींच अर्थ समजत नाहीं ! जेन आजारी असून घरीं नाहीं, हें कसें काय ? ती गेली आहे तरी कुठें ?

मिसेस बेनेट—ती हल्लीं नेदरफील्डला आहे.

लेडी ल्यूकस—काय ह्मटलेंत ? नेदरफील्डला अन् मिस्तर[3] बिंगले यांजकडे जेन आहे ?

---

१. इंग्रज लोकांमध्यें ज्या गृहस्थांनां सर, बॅरोनेट, किंवा लॉर्ड असे मानाचे किताब मिळालेले असतात, त्यांच्या बायकांच्या नांवांचा उल्लेख करतांना 'लेडी' हें उपपद लावण्याचा प्रघात आहे. त्या समाजांत बायकांचा पुरुषांप्रमाणेंच सामान्यतः आडनांवानें निर्देश करण्याची रीत आहे. अलीकडे आपल्या इकडील गृहस्थांनां सर किताब देण्याचें सरकारनें सुरू केल्या-पासून 'लेडी भाटवडेकर,' 'लेडी चंदावरकर' असे शब्दप्रयोग रूढ होऊं लागले आहेत.

२. साधारणतः सभ्यगृहस्थाच्या बायकोला 'मिसेस' हें उपपद लावतात. अविवाहित स्त्रीला हें उपपद कधींहि लावीत नाहींत.

३. सामान्यतः कोणत्याहि गृहस्थाविषयीं बोलतांना 'मिस्तर' ह्मणण्याचा इंग्रज लोकांत प्रघात आहे. मिस्तर व त्यापुढें त्या गृहस्थाचें आडनांव. आपल्या इकडील 'राजश्री परांजपे' या प्रयोगा-प्रमाणें हा प्रयोग आहे.

मिसेस बेनेट—होय बरें, तेथेंच आहे !

लेडी ल्यूकस—तें कसें काय झालें ? ती गेली केव्हां ? आजारी पडली केव्हां ? सर्व हकीगत मला आधीं सांगा तर खरी.

मिसेस बेनेट—तें असें झालें; तुह्माला ठाऊकच आहे कीं, मिस्तर बिंगले हे या गांवांत रहाण्यास आल्यानंतर त्यांच्या बहिणीचा विशेष स्नेह जर कोणाशीं जमला असेल तर तो आमच्या जेनशीं.

लेडी ल्यूकस—अहो, त्यांत कांहीं संशय नाहीं; अन् तेवढ्या बाबतींत तुह्मी भाग्यवान् आहांत खऱ्या !

मिसेस बेनेट—त्या स्नेहाचा ह्मणजे कांहीं विशेष उपयोग होणार आहे, असें नाहीं; तथापि ती गोष्ट अगदींच क्षुल्लक आहे असेंहि मानितां येत नाहीं; अन् त्याचा अनुभवहि आलाच. नुकते चार दिवसांपूर्वीं नेदरफील्डमधली मिस्तर बिंगले वगैरे मंडळी वाटतें कोठें मेजवानीला जाणार होती; घरांत मागें दोघी बहिणीच रहाणार होत्या; तेव्हां मिस[1] बिंगलेला काय स्वस्थ रहावतें ? तिनें लगेच जेनला आपल्या येथें बोलावून घेतलें.

लेडी ल्यूकस—अन् मग जेन तेथेंच आजारी पडली वाटतें ?

मिसेस बेनेट—अहो तें कांहीं विचारूं नका कसें झालें तें ! जेव्हां जेनला चिठी आली तेव्हां आम्हीं सर्वजणं याच ठिकाणीं बोलत बसलों होतों. हवा जरा बिघडली असून पावसाचा रंग होता. खरें म्हटलें तर, अशा वेळीं कोणालाहि बाहेर जावयाचें तर त्यानें गाडींत बसूनच जावयाला पाहिजे होतें. अन् कदाचित् जेनला त्या दिवशीं गाडी मिळालीसुद्धां असती. पण मींच

---

१. अविवाहित मुलींनां किंवा स्त्रियांनां 'मिस' हें उपपद लावतात. 'मिसेस' व 'मिस' या उपपदावरून इंग्रज समाजांत विवाहित व अविवाहित हा भेद स्पष्टपणें दिसून येतो. याच्या तोडीला मराठींत सौभाग्यवती व कुमारी हे शब्द प्रचारांत येत आहेत. मात्र सौभाग्यवती व मिसेस यांमध्यें एक मोठा भेद आहे. आपल्याइकडे सौभाग्यवती हा शब्द लग्न झालेल्या व नवरा हयात असलेल्या बायकांनांच मात्र लावतां येतो; तो शब्द विवाहित पण विधवा झालेल्या स्त्रियांनां कधींहि लावतां येत नाहीं; परंतु मिसेस हा शब्द सधवा व विधवा अशा दोन्ही तऱ्हेच्या विवाहित स्त्रियांनां लावतात. मिसेसच्या तोडीला आपल्याइकडे श्रीमति हा शब्द व्यापक अर्थानें उपयोगांत येऊं पहात आहे.

मिस्तर[१] बेनेट यांनां गाडी न पाठविण्याविषयीं सुचविलें. कारण असें पहा, गाडी पाठवावयाची म्हणजे घोड्याचा शेतांतील कामाचा एक दिवस फुकट जावयाचा. शिवाय दुसराहि पण एक हेतु मनांत होता.

लेडी ल्यूकस—तो कोणचा ?

मिसेस बेनेट—अहो तुमच्या लक्ष्यांत आलेंच असेल. जेनला नेदरफील्डचें स्थळ मिळावें असें मला मनापासून वाटत आहे, तेव्हां त्या धोरणानें वागावयाचें, म्हणजे जेनची व मिस्तर बिंगले यांची ओळख जितकी जास्त होईल तितकी नको का व्हावयाला ? अन् तशी ओळख व्हावयाला तर त्यांच्या वारंवार गांठी पडणें, त्यांचा एकत्र राहण्याचा प्रसंग येणें, अत्यंत आवश्यक नाहींका ? तेव्हां आपला मनांत विचार केला कीं, जेननें जावयाचें तें घोड्यावर बसून जावें, दुसरा मार्ग नाहीं. आणि उघड्या अंगानें घोड्यावर बसून ती गेली, आणि वाटेंत पावसानें गांठलें, तर मग तिची स्नेही मंडळी तिला कांहीं तावडतोब परत पाठविणार नाहींत. आणि मग साहजिकपणेंच तिचें तेथें राहणें होईल.

लेडी ल्यूकस—तुमच्या धोरणापुढें बाई शर्थ असो ! दूरवर लक्ष्य असावें तर असें! मग तुमच्या तर्काप्रमाणें पुढें सर्व घडलें वाटतें ?

मिसेस बेनेट—होय, अगदीं तसें घडलें. जेन घोड्यावर बसून फार लांब गेली नाहीं तोंच पाऊस अगदीं मुसळधारेसारखा पडूं लागला. मला मनापासून बरें वाटलें. या पोरींनां का कांहीं समजतें आहे ? लागल्या कावऱ्याबावऱ्या व्हावयाला ! मी त्यांनां एकदांदोनदां बोलूनसुद्धां दाखविलें कीं, पाहिलेंत मला कशी नामी कल्पना सुचली ती ! त्यावेळीं तिच्या प्रकृतीसंबंधानें विशेष असें कांहीं वाटलें नाहीं; पण दुसऱ्या दिवशीं पाहातें तों आजारी असल्याबद्दलची तिची चिठी आली. डॉक्टरला बोलावण्यापर्यंत पाळी आल्याचेंहि तिनें लिहिलें होतें. अर्थात् तिला कांहीं दिवस तरी घरीं परत येणें अशक्य झालें. आतां तिची प्रकृति जरा बरी आहे असें कळतें.

लेडी ल्यूकस—पण तिच्या शुश्रूषेची कशी काय व्यवस्था ?

---

१. इंग्रजलोकांमध्यें पतीपत्नीचें विशेष सलगीचें व समानतेचें नातें समजलें गेल्यामुळें बायका नवऱ्याबद्दल इतर पुरुषांप्रमाणेंच, मिस्तर या उपपदानें युक्त अशा आडनांवानें उल्लेख करतात. तसेंच पुरुषहि आपल्या पत्नीबद्दल मिसेस या उपपदानें युक्त अशा आडनांवानें उल्लेख करतात.

मिसेस बेनेट—अहो, आह्मांला का त्याबद्दल काळजी घ्यायला पाहिजे? मिस्तर बिंगले यांनीं तिची उत्तम व्यवस्था ठेवलीच असेल. शिवाय जेनची चिठी येतांच लिझी[1] निघून गेली आहे.

लेडी ल्यूकस—एकूण जेनच्या आजारानें जेन व एलिझाबेथ या दोघींनां तेथें राहण्यास सांपडलें व आजाराचा सुखांतच शेवट झाला!

मिसेस बेनेट—कसें छान बोललांत तुह्मी! मीसुद्धां घरांत असेंच ह्मटलें; पण माझें ह्मणणें कोणाला आवडत आहे! सदाच आपलें तसें तें! मी एक ह्मणावें व मिस्तर बेनेट यांनीं दुसरेंच ह्मणावें! दोघांचा एक विचार ह्मणून कधीं नाहीं!

लेडी ल्यूकस—अहो, पुरुषांचें हें असेंच! त्यांतल्यात्यांत मिस्तर बेनेट यांनां घरच्या गोष्टींत मुळीं लक्ष्यच घालावयाला नको असतें. तें असो. पण आतां जेन व एलिझाबेथ परत कधीं येणार?

मिसेस बेनेट— तें काय सांगावें? माझी इच्छा तर ती जितकी जास्त दिवस तेथें राहील तितकी चांगली. मिस्तर बिंगले ह्मणजे केवळ रत्न आहे बरें!

लेडी ल्यूकस—होय हो! अगदीं तरूण, विलक्षण देखणे, अन् अत्यंत मनमिळाऊ असे ते गृहस्थ आहेत. शिवाय, त्यांच्यांतली विशेष गोष्ट ह्मणजे बॉलनृत्याला[2] जाणें वगैरे गोष्टींची त्यांनां फार आवड आहे. आणि आपल्यासारख्या मुलीबाळी असलेल्यांनां तर अशाच गृहस्थाची जास्त जरूर! उघडच आहे, श्रीमान् आणि तरूण ह्मटला ह्मणजे त्याला लग्नाची आवश्यकता असावयाचीच!

मिसेस बेनेट—हें काय विचारावें? अहो, त्याला अनुसरून आपल्यासारख्यांचें सदर बाबतींत वर्तन असतें!

लेडी ल्यूकस—बरें आहे, येतें आतां मी. विशेष कांहीं झालें तर कळवालच!

[जाते.

मिसेस बेनेट—(पाहिलेंसें करून) अरे, पण इकडे हें कोण येत आहे?

(एक चाकर प्रवेश करितो.)

---

१. लिझी हें एलिझाबेथ या नांवाचें संक्षिप्त रूप आहे.

२. बॉल ह्मणजे नृत्याचा समारंभ. इंग्रजसमाजांतील बॉल ही एक फार महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. यामध्यें नृत्यगायनादि प्रकार चालतात. स्त्रीपुरुषसमाज एकत्र जमण्याचा हा एक प्रसंग असतो. इंग्रजसमाजामध्यें प्रौढ विवाहाचा प्रघात चालू असल्यामुळें तरूण स्त्रीपुरुषांचा परिचय व सलगी होण्यास हा समारंभ फार उपयोगी पडतो.

चाकर—बाईसाहेब, ही चिठी मिस बेनेट यांनीं आपल्याला दिली आहे.

(चाकर पत्र देतो व निघून जातो.)

मिसेस बेनेट—(पत्र वाचून) जेन मला तिकडे बोलावीत आहे? बरें तर, जावेंच तिला पाहाण्याला. कोण आहे रे तिकडे; हिल!

मिसेस हिल—काय पाहिजे बाईसाहेब?

मिसेस बेनेट—जा, लिडियाला सांग कीं, जेनला भेटण्यासाठीं नेदरफील्डला जावयाचें आहे! तयारींत अस.

[जातात.

प्रवेश दुसरा.

[**स्थल**—नेदरफील्ड. मिस्तर बिंगले, मिस्तर डारसी, मिस बिंगले, मिसेस हर्स्ट बोलत बसलीं आहेत, असा प्रवेश.]

मिस बिंगले—काय बाई चमत्कार! एकंदरींत या एलिझाबेथ बेनेटची वागणूक कांहीं चांगली नाहीं! तिच्या अंगीं किती अप्रयोजकपणा भरला आहे, व ती गर्विष्ठ तरी किती आहे! संभाषण कसें करावें हें तर तिला मुळींच ठाऊक नाहीं. रीतभात माहित नाहीं, चांगलेंवाईट कळत नाहीं, अन् सौंदर्य तर पहावयालाच नको!

मिसेस हर्स्ट—सारांश, तिच्याबद्दल चांगलें ह्मणावयाला असें कांहींच नाहीं. असें कां ह्मणेनास?

मिस बिंगले—हो, बरी आठवण झाली! लूअॅझा,[१] परवां जेव्हां आपण त्या ल्यूकसलॉजमध्यें[२] गेलों कीं नाहीं, त्यावेळीं एकदां मिस्तर डारसीची स्वारी अगदीं विचार करीत असल्याचें दिसलें. ह्मणून मीं त्याजबद्दल चौकशी केली. तेव्हां ही स्वारी काय ह्मणाली, समजलीस का?—एका चांगल्या मुलीच्या सुंदर दृष्टीपासून उत्पन्न होणाऱ्या सुखाचा मी विचार करीत आहें!—खरेंना हें, मिस्तर डारसी?

मिस्तर डारसी—होय! मीं असें ह्मटल्याचें मला स्मरतें.

---

१. लुअॅझा हें मिस बिंगलेच्या विवाहित बहिणीचें ह्मणजे मिसेस हर्स्टचें क्रिश्चन (स्वतःचें) नांव.

२. सर विल्यम ल्यूकस यांचा बंगला.

मिस बिंगले—आणि मीं जेव्हां 'असे विचार उत्पन्न करणारी भाग्यवान् मुलगी तरी कोणची ?' ह्मणून यांनां विचारलें, तेव्हां ती भाग्यवान् मुलगी ' मिस एलिझाबेथ बेनेट ' ह्मणून यांनीं सांगितलें.

मिसेस हर्स्ट—मि. डारसी, क्यारोलाईन[१] ह्मणते तें खरेंच कीं काय ?

मिस्तर डारसी—अक्षरशः खरें !

मिसेस हर्स्ट—बरें बाई, मला नव्हतें ठाऊक ! तें कसें का असेना, पण एलिझाबेथ बेनेटला चांगलें चालतां येतें, एवढी गोष्ट मात्र खरी ! ती येथें जेव्हां परवां चालत आली तेव्हांचा तिचा चेहरा मी कधींहि विसरणार नाहीं ! त्या वेळीं ती केवळ जंगली माणसासारखी दिसत होती !

मिस बिंगल—लुॲझा, अगदीं खरें बोललीस ! मला पण अगदीं तूं ह्मणतेस तशी ती दिसली ! मला तर बाई किती चमत्कारिक वाटलें ह्मणून सांगूं ! आधीं येथें येणेंच मुळीं मूर्खपणाचें. बहिणीची कोठें थंडीवाऱ्यानें प्रकृति बिघडली तर इनें तंगड्या तोडीत कांहीं येथें यावयाला नको होतें ! काय ते त्यावेळचे तिचे पिंजारलेले केंस–

मिसेस हर्स्ट—अन् तिचा तो पेटिकोट[२] ! मला वाटतें, तूंहि तो पाहिला असशील–कसा सहा इंच चिखलानें मढलेला होता ! तो दिसूं नये ह्मणून तिनें झग्याखालीं त्याला झांकण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ–

मिस्तर बिंगले—लुॲझा, तुझें हें तिचें वर्णन अगदीं बरोबर आहे असें धरून चाललें, तरी माझ्याविषयीं बोलावयाचें तर माझें लक्ष त्यावेळीं या गोष्टीकडे मुळींच गेलें नाहीं. मला ती आली तेव्हां फारच चांगली दिसली !

मिस बिंगले—मि. डारसी, मला वाटतें, तुह्मीं तो पेटीकोट पाहिला असेल. हें पहा डारसी, तुमची बहीण जर अशा थाटानें आली असती तर तुह्मांला तें खास आवडलें नसतें.

मिस्तर डारसी—होय, मला खास आवडलें नसतें !

---

१. कॅरोलाईन हें मिस बिंगले इचें क्रिश्चन नांव. विशेष सलगीच्या माणसाला संबोधितांना त्याच्या क्रिश्चन नांवाचा उल्लेख करण्याची इंग्रजलोकांत पद्धति आहे.

२. पेटिकोट ह्मणजे सैलसा आंतला झगा.

अंक पहिला, प्रवेश दुसरा.

मिस बिंग्ले—तीनचार किंवा किती असतील तितके मैल चालत येणें, आणि तेंहि एकटीनें! काय–तिला वाटलें असावें तरी काय? मला तर बाई वाटतें कीं या गांवढळ पोरी, यांनां सभ्य चालीरीति ठाऊकच नाहींत! आणि असल्या, तरी गांवढ्यांत रौहिल्यानें मिळालेल्या फाजील स्वतंत्रतेमुळें त्या चालीरीतींनां फांटा द्यावा असें या पोरींनां वाटतें. दुसरें काय?.

मिस्तर बिंगले—या तिच्या कृतीनें तिच्या अन्तःकरणांत आपल्या बहिणी-विषयीं किती उत्कट प्रेम आहे तें चांगलें दिसून येतें व त्यामुळें तर मनाला मोठें समाधान वाटतें.

मिस बिंगले—मिस्तर डारसी! या तिच्या कृतीनें तिच्या त्या सुंदर दृष्टी-मुळें उत्पन्न झालेली आपली आवड जरा कमी झाली असेल, नाहीं?

मिस्तर डारसी—मुळींच नाहीं! उलट, व्यायामामुळें त्या मूळच्याच सुंदर डोळ्यांत जास्तच तेज चमकत होतें!

मिसेस हर्स्ट—एलिझाबेथचें असो, पण जेन बेनेटविषयीं मात्र मला फार आस्था वाटते. खरोखरच ती फार गोड मुलगी आहे. अन् माझी तर अशी इच्छा आहे कीं, तिला चांगलें स्थळ मिळावें; परंतु तिच्या आईबापांकडे पाहिलें व तिच्या नातेवाईकांबद्दल विचार मनांत आले ह्मणजे तसें कांहीं घडेल असें वाटत नाहीं.

मिस्तर डारसी—तूं केव्हांसें ह्मणाली होतीस नाहीं का, कीं तिचा एक मामा मेरिटनमध्यें[1] बगल्या वकील आहे ह्मणून.?

मिसेस हर्स्ट—होय. आणि तिचा दुसरा मामा ह्मणे चिपसाईडजवळ[2] कोठेंसा रहातो!

मिस बिंगले—खरेंच कीं काय? फारच मौज! (दोघी हंसतात.)

मिस्तर बिंगले—सगळें चिपसाईड जरी त्यांच्या मामांनीं भरून टाकिलें, तरी ह्या दोघी बहिणींच्या अंगच्या चांगुलपणांत कांहीं कमीपणा येईल असें मला वाटत नाहीं!

---

१. मेरिटन हें लाँगबोर्नजवळच एक व्यापारी गांव आहे.

२. चीपसाईड हा लंडनचा एक भाग असून तेथें कामधंदा व व्यापार करणाऱ्या लोकांची वस्ति आहे. घरंदाज जमीनदारापेक्षां व्यापारीपेशा व वकीलीपेशा त्या काळीं इंग्लंडमध्यें कमी दर्जाचा समजत असत.

मिस्तर डारसी—पण एवढें खरें कीं नाहीं, कीं त्या योगानें योग्यतेच्या माणसाबरोबर त्यांचीं लग्नें होणें दुरापास्त जाईल !

मिस बिंगले—चार्लसनें[1] यावर जरी उत्तर दिलें नाहीं, तरी मी देतें. तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें होईल, यांत कांहीं संशय नाहीं. एक मामा दुकानदार तर दुसरा बगल्या वकील! वा फारच उत्तम !! अरे, पण वाजले तरी किती ? चला आतां जरा 'लू'[2] खेळूं. (पाहिलेंसें करून) वा ! एलिझाबेथ पण इकडेच येत आहे, तिला पण खेळावयास घेऊं.

(एलिझाबेथ प्रवेश करिते.)

मिसेस हर्स्ट—लू खेळायास येतां का तुह्मी ?

एलिझाबेथ—मीं पाहिलें, या तुमच्या खेळण्यांत बरीच ईर्षा उत्पन्न होते, तेव्हां मी नाहीं येत खेळायाला. असला खेळ खेळण्यापेक्षां पुस्तक वाचीत बसणें मला बरें वाटतें.

मिसेस हर्स्ट—मिस्तर हर्स्टनां तर हें बोलणें फारच चमत्कारिक वाटेल. काय ह्मणे, खेळण्यापेक्षां वाचन बरें !

मिस बिंगले—ह्यांनां कीं नाहीं 'क्याटांनीं' खेळणें आवडत नाहीं. हो, या मोठ्या भक्कम वाचणाऱ्या आहेत अन् वाचनाखेरीज दुसऱ्या कशांतच यांनां आनंद वाटत नाहीं. असेंच कीं नाहीं मिस बेनेट ?

एलिझाबेथ— माझी एवढी स्तुतीहि करावयाला नको व इतकी निंदाहि पण नको ! मी कांहीं फार वाचीत नसतें आणि मला दुसऱ्या पुष्कळ गोष्टींत आनंदहि वाटत असतो.

मिस्तर बिंगले—आपल्या बहिणीची शुश्रूषा करण्यांत तुला आनंद वाटतो यांत मुळींच शंका नाहीं. तिला बरी झालेली पाहून तुला फारच समाधान होईल, नाहीं का ?

एलिझाबेथ—आपले फार आभार आहेत ! बरें, पण वाचावयाला एखादें पुस्तक मिळालें तर बरें.

मिस्तर बिंगले—एखादेंसें काय, सर्व लायब्ररी खुली आहे. त्यांतून वाटेल तें पुस्तक घेण्यास हरकत नाहीं. खरेंच, माझा पुस्तकसंग्रह जास्त असता

१. चार्लस हें मिस्तर बिंगलेचें क्रिश्चन (स्वतःचें) नांव.

२. लू हा एक पत्त्यांतला खेळ आहे.

तर फार बरें झालें असतें. कारण, त्यायोगानें माझा फायदा होऊन माझी अब्रूहि राखली गेली असती. परंतु मी फार आळशी मनुष्य आहें. आणि आहे हाच पुस्तकसंग्रह जरी मोठा नाहीं तरी त्यांत कांहीं पुस्तकें अशीं आहेत कीं, तीं मीं नुसतीं उघडूनसुद्धां पाहिलेलीं नाहींत!

एलिझाबेथ—आपल्याला कांहीं तसें त्यांत विशेष वाटावयाला नको. या ठिकाणीं जीं हीं पुस्तकें आहेत त्यांतच माझें उत्तम रीतीनें भागणार आहे हो.

(एक पुस्तक घेऊन वाचूं लागते.)

मिस बिंगले—मला आश्चर्य वाटतें कीं, माझ्या वडिलांनीं इतका लहान पुस्तकसंग्रह काय ह्मणून ठेविला? मिस्तर डारसी, तुमची पेंबरलेमधील लायब्ररी किती सुंदर आहे!

मिस्तर डारसी—ती सुंदर असणें अगदीं स्वाभाविक आहे. कारण, तिला कित्येक पिढ्यांचा हातभार लागलेला आहे.

मिस बिंगले—शिवाय,तुह्मीं त्यांत इतकी भर टाकितां, कीं कांहीं विचारूं नका. तुह्मी नेहमीं पुस्तकें विकत घेत असतां.

मिस्तर डारसी—अशा दिवसांत कुटुंबाचे लायब्ररीची अनास्था करणें अगदीं वाईट.

मिस बिंगले—अनास्थेचें नांवच नको! ज्यायोगानें त्या सुंदर स्थानाला अधिक शोभा येईल अशा कोणत्याहि गोष्टीची उपेक्षा केली जात नाहीं. चार्लस! तूं जेव्हां आपलें घर बांधशील, तेव्हां तें पेंबरलेच्या अर्ध्यानें तरी चांगलें बांधलेंस ह्मणजे मिळविलेंस!

मिस्तर बिंगले—होय, माझी पण तीच इच्छा आहे.

मिस बिंगले—मला तर असें वाटतें कीं, तूं पेंबरलेच्या जवळपास ईस्टेट घ्यावीस; कारण, मग पेंबरले हें तुला नमुन्यादाखल उपयोगी पडेल. खरेंच, डरबीशायर इतका रमणीय प्रदेश सगळ्या इग्लंडांत क्वचितच सांपडेल!

मिस्तर बिंगले—अग, पण नमुन्याची गोष्ट हवी कशाला? डारसीचे मनांत असेल तर मी पेंबरलेच विकत घेतों, ह्मणजे झालें!

मिस बिंगले—अरे, तसें नव्हे रे! पण मी आपली होष्यमाणाविषयीं बोलतें.

मिस्तर बिंगले—क्यारोलाईन! अग, एकवार पेंबरले विकत घेणें शक्य होईल, परंतु पेंबरले हा नमुना धरून दुसरें ठिकाण तयार करणें शक्य नाहीं, समजलीस?

एलिझाबेथ—(स्वगत) मी पुस्तक घेऊन वाचूं लागलें, पण माझें बाई लक्ष यांच्या या भाषणानें पुस्तकाकडे मुळींच लागत नाही. खरेंच, पेंवरले हें ठिकाण इतकें उत्तम आहे काय ? पण संशय कसला ? जर तें ठिकाण इतकें उत्तम नसतें तर मिस्तर बिंगले त्याची इतकी स्तुति कधींच करतेना ! काय असेल तें असो, पण या डारसीविषयीं सर्वच प्रकार कांहीं विलक्षण आहे ! फारच उमदा, अतिशय श्रीमान्, अन् अगदीं तरूण असा हा पुरुष ! पण याच्यांत एक गोम मोठी आहे असें दिसतें. आणि ती गोम ह्मणजे याच्या अंगीं वसत असलेला गर्व ! पहिल्याच भेटीला याचें तें माझ्याबरोबरचें वर्तन किती चमत्कारिक ! बरें, पण यांचें पुढें काय बोलणें चालतें तें ऐकूं तर खरें !

मिस बिंगले—मिस्तर डारसी ! मिस डारसी गेल्या वसंतापासून बरीच वाढली असेल नाहीं ? माझ्या इतकी उंच झाली आहे का ?

मिस्तर डारसी—मिस एलिझाबेथ बेनेट इतकी किंवा कांहींशी जास्त उंच झाली आहे.

मिस बिंगले—मला कीं नाहीं, तिला केव्हां पाहीन असें झालें आहे. तिच्या इतकी दुसरी चांगली मुलगी मला आढळलीच नाहीं ! काय तो सुंदर चेहरा, वागणूक किती चांगली, अन् तिच्या वयाच्या मानानें ती शिकलीसवरलेली तरी किती आहे ! पेटी कशी छान वाजविते—

मिस्तर बिंगले—मला खरोखर आश्चर्य असें वाटतें कीं, या तरुण पोरींनां इतक्या शिकल्यासवरलेल्या व्हावयाला फावतें तरी कसें ? कारण, सगळ्या पहाव्या त्या आपल्या शिकल्यासवरलेल्या !

मिस बिंगले—काय, सर्व तरुण मुली शिकल्यासवरलेल्या असतात अशी का वेड्या तुझी समजूत आहे ?

मिस्तर बिंगले—होय हो, मला वाटतें सर्व तशाच आहेत. त्यांनां कशिदा काढतां येतो, टोप्या विणतां येतात व असलींच सर्व कामें त्या करितात. या गोष्टी जिला येत नाहींत अशी एकहि मुलगी मीं पाहिलेली नाहीं. आणि कोणत्याहि मुलीविषयीं बोलणें निघाल्यास ती शिकलीसवरलेली नाहीं असें कांहीं ऐकण्यांत येत नाहीं—

मिस्तर डारसी—शिकलीसवरलेली ह्मणावयाला ज्या गोष्टींची जरूरी आहे असें सर्व साधारण समजुतीला वाटतें, त्या समजुतीला अनुसरून तुझें वर्णन

अगदीं बरोबर आहे! जिला केवळ कशिदा काढणें, टोप्या विणणें यापलीकडे कांहीं येत नाहीं अशा मुलीलाहि हें विशेषण लाविलेलें ऐकण्यांत येतें; परंतु हें तुझें ह्मणणें मला मुळींच पसंत नाहीं ! खरोखर, ज्यांनां शिकल्यासवरलेल्या ह्मणून ह्मणतां येईल अशा माझ्या ओळखीच्या मंडळींत पांचसहाहून जास्त मुली आढळल्याच नाहींत !

मिस बिंगले—खरेंच गडे, मलाहि पण आढळल्या नाहींत !

एलिझाबेथ—तर मग शिकलीसवरलेली या शब्दांत तुमच्या मतानें बराच अर्थ असला पाहिजे ?

मिस्तर डारसी—अलबत! त्या शब्दांत बराच अर्थ भरलेला आहे खास.

मिस बिंगले—हो तर, सर्व साधारणपणें दिसून येणाऱ्या गोष्टीहून जास्त असें जर एखादीच्या अंगीं दिसून येणार नाहीं तर तिला तें विशेषण लावावयाचें तरी कसें? शिकल्यासवरलेल्या बाईला गायनवादन, चित्रकला, नृत्य, अर्वाचीन सर्व भाषा यांचें चांगलें ज्ञान असलें पाहिजे. शिवाय, या सर्व गोष्टी असूनहि तिच्या बोलण्यांत, चालण्यांत, पहाण्यांत विशेष असें कांहीं तरी असावें लागतें. तरच तिला शिकलीसवरलेली हें विशेषण लावितां येईल.

मिस्तर डारसी—हे सर्व गुण पाहिजेतच; पण या सर्वांच्या मिलाफास सात्विक गुणाची जोड पाहिजे आणि ती कोणची ह्मणाल तर पुष्कळ वाचनानें तिचें मन सुसंस्कृत झालेलें पाहिजे.

एलिझाबेथ—असें काय ? तर मग आतां मला तुमच्या अर्थानें तुह्मांला शिकल्यासवरलेल्या पांचसहा तरी मुली कशा आढळल्या ईश्वर जाणे ! माझी तर कल्पना अशी आहे कीं, अशी शिकलेलीसवरलेली मुलगी एखादीसुद्धां तुह्मांला आढळणें कठीण आहे.

मिस्तर डारसी—तूं तर बायकोची जात आणि तूंच आपल्या जातीवर उठलीस वाटतें ? अशा अर्थानें जिला शिकलीसवरलेली ह्मणतां येईल अशी बायको मिळणें अशक्यच आहे, असें का तुला वाटतें ?

एलिझाबेथ—मीं तरी निदान अशी बायको कोठेंहि पाहिलेली नाहीं ! असला हा गुणसन्निपात एकत्र आढळणें फारच मुष्कीलीचें आहे !

मिस बिंगले— }
मिसेस हर्स्ट— } तें कांहीं नाहीं! इचें ह्मणणें आह्मांला मुळींच कबूल नाहीं ! ह्या वर्णनाला शोभतील अशा शेंकडों बायका आह्मीं पाहिल्या आहेत !

मिस्तर हर्स्ट—पुरे झालें हें असलें बोलणें! खेळावयाचें असलें तर खेळा मुकाट्यानें, नाहीं तर आटपाना परता खेळ.

एलिझाबेथ—चालूं द्या तुमचा खेळ, मी जातें वरें जेनकडे.

[एलिझाबेथ जाते.

मिस बिंगले—एलिझाबेथ बेनेट ही आपल्या जातीची निंदा करून पुरुषाच्या जातीला आपल्याकडे वळवूं पहाणाऱ्यांपैकीं एक दिसते. आणि कांहीं उदाहरणांकडे पाहिलें तर ही त्यांची युक्ति साधल्याचेंहि आढळून येईल. परंतु माझ्यादृष्टीनें हा अगदीं क्षुद्र व निंद्य मार्ग आहे!

मिस्तर डारसी—यांत काय संशय! पुरुषांचें मन वळवून घेण्यासाठीं जे जे ढंग तरुण मुली करितात त्या सर्वांत नीचपणा असतोच. केवळ लवाडी जरी नाहीं तरी जवळजवळ त्यासारखें वर्तन सदाच निंद्य होय!

मिस बिंगले—(स्वगत) अरेरे, माझें तोंडच बंद केलें म्हणावयाचें!

मिस्तर डारसी—(स्वगत) ही आतांशा भारीच पुढें पुढें करून लुब्रेपणा करायला शिकत आहे. (उघड) अरे, पण इकडे ही कोण मंडळी येत आहे? चार्लस, पहा रे कोण तें.

मिस्तर बिंगले—अरे, जेन बेनेटचा निरोप गेल्याप्रमाणें तिची आई जेनच्या एका बहिणीला घेऊन आली वाटतें.

(मिसेस बेनेट व लिडीया प्रवेश करितात. परस्पर शेकहँड[१] करितात.)

मिस्तर बिंगले—निरोप नुकताच गेला होता. अगदीं तावडतोब येणें झालें.

मिसेस बेनेट—आपल्यासारख्यांच्या शुश्रूषेखालीं जेन असल्यावर आणखी काय पाहिजे? मला कसली काळजी आहे. होता वेळ, निरोप जातांच निघालें. जेन वरी आहेना?

मिस्तर बिंगले—आम्हीं सांगण्यापेक्षां समक्षच तिला वर जाऊन पहावें म्हणजे झालें.

मिसेस बेनेट—बरें तर.

[दोघी जातात.

१. आपल्याइकडे ज्याप्रमाणें कोणी ओळखीचें भेटल्यास नमस्कार करण्याचा प्रघात आहे त्याप्रमाणें इंग्रजी समाजांत शेकहँड (हातांत हात घालणें) करण्याचा प्रघात आहे.

मिस बिंगले—अहाहा ! काय पण बाई आहे ! मानसिक सुधारणेचा हिला अगदीं गंधसुद्धां नाहीं ! समजूत कोती, जगाची माहिती अगदीं अल्प, आणि अनिश्चित स्वभाव यांची सांगड हिच्या ठिकाणीं चांगली दिसून येते. खरें कीं नाहीं लूअॅझा ?

मिसेस हर्स्ट—तुझें वर्णन अगदीं यथार्थ आहे !

मिस्तर डारसी—आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता म्हणजे आपल्या मुलींचीं लग्नें झालेलीं पहाणें हीच होय, असेंच या बाईला वाटत असावें असें दिसतें.

मिस बिंगले—मला पण हेंच वाटतें. (पाहिलेंसें करून) जेनला पाहून आल्या वाटतें खालीं ?

(मिसेस बेनेट, लिडिया आणि एलिझाबेथ प्रवेश करितात.)

मिस्तर बिंगले—आपल्या अटकळीपेक्षां जेनची प्रकृति जास्त बिघडलेली आहे, असें तर नाहींना ?

मिसेस बेनेट—हो तर, तिची प्रकृति अद्याप सुधारली नाहीं. तिला येथून घरीं घेऊन जाणें कांहीं बरें दिसत नाहीं.

मिस्तर बिंगले—येथून घरीं नेण्याविषयीं तूर्त तर गोष्टच काढूं नका. माझ्या बहिणीला तर तें मुळींच पसंत पडणार नाहीं !

मिस बिंगले—बाईसाहेब, जेन आमच्या येथें आहे तोंपर्यंत शक्य ती काळजी घेतली जाईल बरें.

मिसेस बेनेट—पण त्याबद्दल मला संशयच नाहीं ! आपले फारच उपकार आहेत बरें. जर ती अशा प्रसंगीं तुमच्यासारख्या स्नेह्यांच्या घरीं नसती तर तिचें काय झालें असतें कोण जाणे ! मिस्तर बिंगले, तुमचें हें ठिकाण, त्यांतल्या-त्यांत हा तुमचा दिवाणखाना फारच चांगला आहे ! जरी तुमची भाड्याची मुदत थोडी आहे तरी तुम्ही हें ठिकाण लौकरच सोडाल असें वाटत नाहीं.

मिस्तर बिंगले—मी जें जें कांहीं करितों तें सदा घाईनें करितों आणि ह्मणून जर कदाचित् माझ्या मनांत नेदरफील्ड सोडण्याचें आलें तर मी पांच मिनिटांचे आंत निघून जाईन. पण आतांचाच विचार मनांत आणिला तर यां तरी मी येथून हालेन असें मला वाटत नाहीं.

एलिझाबेथ—तुमच्या वागण्याबद्दल जर मला अटकळ करावयाची असती मीं हेंच सांगितलें असतें !

मिस्तर बिंगले—आमच्या मनांतलें तूं जाणतेस वाटतें?

एलिझाबेथ—अहो संशय कसला त्यांत? तुमचें हृद्गत मला पुरतें समजतें.

मिस्तर बिंगले—हा एक माझा चांगुलपणा आहे असें मी धरून चालतों; परंतु अशा रीतीनें मनांतील विचार दुसऱ्यास सहज समजले जाणें एक प्रकारें वाईटच नव्हे का?

एलिझाबेथ—केव्हां केव्हां असें घडतें खरें. परंतु यावरून असेंच कांहीं खास निष्पन्न होत नाहीं, कीं खोल व गूढ स्वभाव तुमच्यासारख्याच्या स्वभावाहून अधिक प्रसंशनीय मानिला पाहिजे.

मिसेस बेनेट—लिझी, तूं आहेस कोठें? येथें मंडळी कोण कोण आहेत, आहे का कांहीं ध्यानांत? घरीं आपली तुला संवयच लागली आहे–पण घरच्या सारखी येथें कांहीं तरी बरळत सुटूं नकोस!

मिस्तर बिंगले—बाईसाहेब, संकोच धरण्याचें कांहीं कारण नाहीं. हें आपलेंच घर आहे. मिस बेनेट, मला यापूर्वी ठाऊक नव्हतें कीं तुला स्वभावाचें परीक्षण करितां येतें. मला वाटतें, तो फारच मनोरंजक विषय असला पाहिजे.

एलिझाबेथ—होय. पण गूढ स्वभावाचीं माणसें तर फार मनोरंजक असतात. त्यांच्यांतला तो विशेष सदाच चित्ताकर्षक असतो.

मिस्तर डारसी—अशा अभ्यासाला सामान्यतः खेड्यांत फार थोडा अवकाश मिळत असला पाहिजे. खेडेगांवांत फार संकुचित व फरक न होणारा असाच समाज मनुष्याला नेहमीं दिसत असतो.

एलिझाबेथ—पण लोकच स्वतः इतके पालटत असतात कीं, त्यांच्यामध्यें कांहींना कांहीं तरी नवीनपणा सदोदित दिसून येत असतो.

मिसेस बेनेट—(लिडियास) लिडिया, कायग बोलत आहेत हें? समजतें का तुला कांहीं?

लिडिया—(मिसेस बेनेटला) कांहीं समजत नाहीं.

मिसेस बेनेट—(लिडियास) मिस्तर डारसी आहेच तसा! दुसऱ्याला नांव ठेवण्यांत त्याला बरेंच वाटत असावें.

एलिझाबेथ—(स्वगत) बरें झालें. आई लिडियाशींच कांहीं पुटपुटली. तिला हें भाषण धड समजलें असेल किंवा नाहीं कोण जाणे; आणि कदाचित

न समजतां भलताच अर्थ करून कांहीं तरी बोलावयाची. (उघड) आई, मिस ल्यूकस आह्मी इकडे आल्यापासून आली होती का कधीं आपल्या घरीं ?

मिसेस बेनेट—ती नाहीं आली, पण लेडी ल्यूकस आल्या होत्या.

मिस्तर बिंगले—कोण मिस ल्यूकस? वा, फार चांगली मुलगी आहे. नाहीं का ती ?

मिसेस बेनेट—होय, मी आपली ह्मणून ह्मणतें असें नाहीं, पण माझ्या जेनइतकी सुंदर मुलगी क्वचितच पाहाण्यांत येईल ! जो तो असेंच आपलें मत देतो. एकदां असें झालें, जेन पंधरा वर्षांची होती, एक तरुण पुरुष येथें आला त्याला ती इतकी आवडली कीं त्यानें तिच्यावर गाणींसुद्धां केलीं–

एलिझाबेथ—आणि तेवढ्यानेंच त्याच्या त्या आवडीचा-प्रेमाचा शेवट झाला ! आणि मला वाटतें, अशीं उदाहरणें कांहीं थोडींथोडकीं नाहींत. प्रीतीला घालवून लावण्यास कवितेचा उपयोग कोणीं शोधून काढिला कोण जाणे !

मिस्तर डारसी—आजपर्यंत माझी अशी समजूत आहे कीं, कविता ही प्रेमाची पोषक आहे.

एलिझाबेथ—होय, खऱ्याखुऱ्या प्रेमाबद्दल तसें ह्मणतां येईल. कारण जें मूळचेंच सामर्थ्यवान् असतें त्याला पोषक द्रव्यानें फायदा होतो; परंतु जेथें मुळांत खरें प्रेम नसून एक प्रकारची साधारण व निस्सत्व आवड असते तेथें एका सुंदरशा कवनानें त्या आवडीची इतिश्री केव्हांच होऊन जाते, व शेवटीं शिल्लक काय तें कवनच राहतें !

मिस्तर डारसी—(स्वगत) खरेंच, या एलिझाबेथचें बुद्धिसामर्थ्य कांहीं विलक्षण आहे ! वयाच्या मानानें फारच चाणाक्षपणा इच्या अंगीं आहे.

मिसेस बेनेट—बरें आहे, मिस्तर बिंगले, येतें मी आतां. जेनची काळजी तुम्हांला आहेच.

मिस्तर बिंगले—यावें बरें, आपण जेनविषयीं कांहीं काळजी करूं नका.

[मिसेस बेनेट व लिडिया जातात.

मिस बिंगले—मिस्तर डारसी, मघाशीं तुह्मी ह्मणत होतां नाहीं का, कीं तुह्माला मिस डारसीला पत्र लिहावयाचें आहे ह्मणून ? हें पहा तुमची लेखणी करावयाची असेल तर मी करितें हो. कारण, मला कीं नाहीं लेखण्या चांगल्या करितां येतात–

मिस्तर डारसी—फार आभारी आहें! पण मला दुसऱ्यानें केलेली लेखणी चालतच नाहीं.

मिस बिंगले—तुमचें लिहिणें कसें साधें आणि किती जलद असतें—

मिस्तर बिंगले—कॅरोलाईन, ही तुझी स्तुति अगदीं अस्थानीं आहे! हा लिहावयाला बसला कीं, मोठमोठे शब्द आठवून आठवून घालण्याची याला खोड लागलेली आहे. खरें कीं नाहीं डारसी?

मिस्तर डारसी—माझी लिहिण्याची पद्धति तुझ्या लिहिण्याच्या पद्धतीपेक्षां फार निराळी आहे, हें खास!

मिस बिंगले—वा! चार्लस किती निष्काळजीपणानें लिहितो! लिहावयाला लागला कीं आधीं अर्धेअधिक शब्द गाळतो आणि राहिलेला भाग डाग पाडून नाहींसा करितो!

मिस्तर बिंगले—मी लिहावयाला बसलों ह्मणजे माझ्या डोक्यांत विचारांचें असें काहूर उठतें कीं, ते सर्व विचार लिहून काढण्यास मला अवसरच मिळत नाहीं. त्यामुळें पुष्कळ वेळां माझ्या पत्राचा अर्थ दुसऱ्याला समजत नाहीं—

एलिझाबेथ—तुमच्या विनयामुळें तुह्माला दोष देण्याचें कोणालाच धाडस होणार नाहीं!

मिस्तर डारसी—विनयाच्या आविर्भावा इतकी फसवणूक दुसऱ्या कशांतच नसते! बहुधा ज्याला विनय ह्मणून ह्मणतात तो एक प्रकारचा निष्काळजीपणा असतो. अगर केव्हां केव्हां ती अप्रत्यक्ष अशी स्वतःची प्रौढी असते!

मिस्तर बिंगले—यापैकीं आतांचें हें माझें वर्तन आपण कोणच्या वर्गांत घालतां?

मिस्तर डारसी—ही तुझी आत्मप्रौढीच आहे. कारण, तुला आपल्या लिहिण्यांतील दोषांबद्दल अभिमान वाटतो. तूं असें समजतोस कीं, ते दोष विचारांच्या वेगवान ओघानें उत्पन्न होतात आणि यामुळें निष्काळजीपणानें जें असें लिहिणें तुझ्या हातून होतें त्याची तुला प्रशंसा जरी नव्हे तरी गम्मत वाटते. काम जलद करितां येणें ह्मणजे फार चांगलें असें ज्याचें त्याला वाटत असतें. परंतु त्यामुळें कामांत अपुरेपणा रहातो याकडे कोणीच लक्ष देत नाहीं. फार लांब कशाला? मघांशींच जेव्हां तूं मिसेस बेनेट यांनां ह्मणालास कीं, मी नेदरफील्डहून जाण्याचें मनांत आणिलें तर पांच मिनिटांत जाऊं शकेन,

तेव्हां तें एक तुला भूषण असें वाटलें; परंतु त्यांत भूषणास्पद असें काय आहे ? कारण, तशा जाण्यानें प्रत्येक कामाचा घोंटाळा होणार. त्यापासून खरा फायदा तुलाहि नाहीं व दुसऱ्यालाहि नाहीं !

मिस्तर बिंगले—हें पहा, हीं असलीं क्षुल्लक बोलणीं लक्ष्यांत ठेवणें बरें नव्हे. परंतु एवढी गोष्ट खरी कीं, मला जें वाटलें व आतांहि वाटत आहे, तेंच मी बोलतों. उगाच बायकांसमोर फुशारकी मारावी असा कांहीं माझा हेतु नव्हता व नाहीं.

मिस्तर डारसी—मला वाटतें कीं तुझा तसा समज आहे; परंतु तूं तितक्या जलदीनें जाशीलच याची मात्र खात्री मला पटत नाहीं ! तुझें जाणें केवळ तवकलीवर अवलंबून राहील. कारण, जाण्याकरितां तूं घोड्याचे रिकीबीवर पाय ठेविलास आणि एखादा स्नेही येऊन त्यानें तुला ह्मटलें कीं, बिंगले, आतां आपण जाऊं नये, कीं लगेच तूं आठवडाभर जाणार नाहींस; आणि त्यानें जरा जास्त आग्रह केला तर महिनाभरसुद्धां राहशील !

एलिझाबेथ—या आपल्या भाषणानें इतकेंच सिद्ध होतें कीं, मिस्तर बिंगले स्नेहाखातर स्वतःच्या इच्छेविरुद्धहि वागण्यास तयार होतील, आणि यामुळें त्यांच्या चांगुलपणांत उलट भरच पडते !

मिस्तर बिंगले—तुझ्या ह्या भाषणानें, मिस बेनेट, मला फार आनंद झाला ! कारण, डारसीच्या बोलण्याचा तूं असा अर्थ केलास कीं, त्याच्या योगानें माझा चांगुलपणा जास्तच खुलून दिसावा. परंतु हा तुझा अर्थ त्याला मात्र मान्य होणार नाहीं. अशा प्रसंगीं त्याच्या मतानें मीं त्या स्नेह्यास स्पष्ट नकारार्थी उत्तर द्यावें व घोड्याला टांच मारून निघून जावें.

एलिझाबेथ—परंतु या तुमच्या करण्यानें तुमच्या पहिल्या बेतांतील अविचार, त्याला चिकटून राहिल्यानें, भरून निघाला असें का डारसींनां वाटतें ?

मिस्तर बिंगले—खरें ह्मणशील तर मला कांहीं याचें उत्तर देतां येत नाहीं. डारसीनेंच तें दिलें पाहिजे.

मिस्तर डारसी—जीं मतें माझीं आहेत असें मीं ह्मटलेलें नाहीं, तीं मतें माझींच आहेत असें तूं धरून चालली आहेस व त्याचें उत्तर अगर स्पष्टीकरण मीं करावें असें याचें ह्मणणें आहे. असो. मिस बेनेट, तूं ह्मणतेस तसें धरून चाललें तरी, ही गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे कीं, अशा रीतीनें थांबा ह्मणून सांगणाऱ्या स्नेह्यानें तसें कां करावें याचीं कारणें दिलेलीं नसतात.

२

एलिझाबेथ—स्नेहाखातर त्याच्या ह्मणण्याला तावडतोब व सहजीं रुकार देणें हाहि एक प्रकारचा गुण आहे, असें कांहीं आपणाला वाटत नाहीं तर ?

मिस्तर डारसी—सारासार विचारानें खात्री झाल्याशिवाय असें कृत्य करावयास लागणें हें दोघांनांहि भूषणावह नाहीं !

एलिझाबेथ—स्नेहाच्या व प्रेमाच्या वजनाला तुह्मी कांहींच किंमत देत नाहीं तर ? केवळ सांगणाराचा शब्द मोडावयाचा नाहीं, एवढ्याच कारणानें त्याच्या ह्मणण्याच्या युक्तायुक्ततेचा फारसा विचार न करितां त्याचें ह्मणणें केव्हां केव्हां ऐकावें लागतें. तेव्हां सर्वसाधारणपणें फार महत्त्वाचा प्रसंग नसेल तर स्नेहाखातर त्याचें ह्मणणें कबूल करून एखाद्यानें आपला बेत रहित केला, तर त्यानें मोठी चूक केली असें का तुह्मी ह्मणणार ?

मिस्तर डारसी—या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी आपण जरा खोल पाण्यांत शिरलें पाहिजे. त्या दोघांमधील स्नेह किती दाट आहे, त्याच्या विनंतीचें महत्त्व कितीसें आहे, या गोष्टींचा प्रथम विचार झाला पाहिजे.

मिस्तर बिंगले—खरोखर तसेंच झालें पाहिजे ! सर्व गोष्टी स्पष्टपणें कळल्या पाहिजेत ! त्या दोघां स्नेह्यांची उंची, बांधा, वजन याचाहि त्यांत विचार झाला पाहिजे ! हें पहा मिस बेनेट, डारसी जर माझ्याहून इतका उंच नसता, तर मला त्याच्याबद्दल इतका आदर कधीं वाटता ना ! कांहीं विशेष प्रसंगीं व विशेष स्थळीं, त्याच्या घरीं आणि त्यांतल्यात्यांत त्याला दुसरें कांहीं करावयाचें नसेल अशा एखाद्या रविवारसारख्या दिवशीं, तर त्याची मला फारच भीति वाटते !

मिस बिंगले—चार्लस, मिस्तर डारसी यांनीं जरी हंसण्यावर नेलें तरी असें अप्रिय बोलणें चांगलें नव्हे हो !

मिस्तर डारसी—चार्लस, तुझा हेतु मी समजलों. तुला वादविवाद करण्याचें मुळींच आवडत नाहीं. आणि तें टाळण्याकरितां ह्या तुझ्या साऱ्या युक्त्या आहेत !

मिस्तर बिंगले—हो, तसें कां ह्मणेनास ? वादविवाद ह्मणजे बहुतेक भांडणच ! तेव्हां मी येथून जाईपर्यंत तूं व मिस बेनेट यांनीं हें माझ्या स्वभाव-परीक्षणाचें काम तहकूब ठेविलें, तर तुमचे फार उपकार होतील ! मग माझ्या अपरोक्ष काय वाटेल तें माझ्यासंबंधीं बोला !

एलिझाबेथ—पण राहीना का हा विषय आतां !

मिस्तर बिंगले—बरें तर.

[जातो.

मिस्तर डारसी—तुह्मीं दोघींनीं या वेळीं थोडें गावें असें वाटतें आहे. कशी काय मर्जी ?

मिस बिंगले—मला काय येतें आहे ! मिस बेनेट, तुह्मीच प्रारंभ करा.

एलिझाबेथ—कांहीं नको ! पागोळीचें पाणी आढ्याला नको जावयाला हो ! तुह्मीच प्रारंभ करा !

मिस बिंगले—बरें बाई ! लुॲझा, चला आपण आरंभ करूं. (थोडें गातात.)

मिस्तर डारसी—(एलिझाबेथला) या प्रसंगीं 'रील' नृत्य करावेंसें नाहींका तुला वाटत ?

एलिझाबेथ— (गालांतल्या गालांत हंसते.)

मिस्तर डारसी—मीं काय ह्मटलें ऐकलेंस का मिस बेनेट ?

एलिझाबेथ—ऐकलें हो ! पहिल्या प्रथमच ऐकिलें होतें, परंतु त्याचें उत्तर काय द्यावें हें मला ताबडतोब ठरवितां येईना ह्मणून उत्तर दिलें नव्हतें ! मला ठाऊक आहे कीं, तुमच्या मनांत मीं तुमच्या प्रश्नाला होय असें उत्तर द्यावें, असें होतें; आणि मीं तसें उत्तर दिलें, कीं माझ्या अप्रयोजकपणाबद्दल माझी मनांतल्या मनांत तुह्मीं टेर उडवावी ! परंतु माझा स्वभावच असा आहे कीं, ह्या असल्या दुसऱ्याच्या मसलती हाणून पाडावयाच्या, व ह्मणून मला मुळीं नृत्यच करावयाचें नाहीं, असेंच तुह्माला सांगण्याचा मीं बेत केला. आतां तुमच्यानें झालें तर खुशाल माझी टेर उडवा !

मिस्तर डारसी—नाहीं बरें, तसें माझ्या हातून होणें शक्य नाहीं ! (मिस बिंगलेकडे वळून) पुरे आतां गाणें.

मिस बिंगले—ठीक आहे.

[डारसीशिवाय सर्व जातात.

मिस्तर डारसी—(स्वगत) कांहीं म्हटलें तरी या एलिझाबेथ बेनेटकडे माझें लक्ष जाऊं पहात आहे, खास ! प्रथम ही मुलगी मला साधारण चांगली अशीसुद्धां वाटली नाहीं. इची पहिली भेट सर ल्यूकसकडे बॉलच्या रात्रीं झाली. त्यावेळीं इच्याकडे नुसतें पहावें असें देखील मला वाटलें नाहीं. पुनः जेव्हां आह्मां दोघांचा भेटीचा योग आला, तेव्हां केवळ दोषैकदृष्टीनेंच मी पहात होतों. परंतु काय चमत्कार आहे !

मीं आपल्याशीं तसेंच आपल्या स्नेही मंडळींत तिच्या चेहऱ्यांत चांगुलपणा असा मुळींच नाहीं असें म्हटलें नाहीं तोंच तिच्या त्या काळेभोर डोळ्यांतील सुंदर चमकेनें तिच्या चेहऱ्यावर असाधारण हुशारी दिसत असल्याचें ध्यानीं आलें. बरें एवढ्यानेंच संपलें नाहीं. जसें चेहऱ्याबद्दल तसेंच तिच्या शरीराच्या एकंदर ठेवणीबद्दलहि झालें. पहिल्याप्रथम जरी त्यांत पुष्कळ दोष असावेत असें मला वाटलें, तरी मागाहून पहातां तिचा बांधा चुणचुणीत व मनोवेधक दिसूं लागला. जरी तिची वागणूक प्रतिष्ठित चालीरीतींशीं अगदीं जुळती अशी दिसली नाहीं, तरी तिच्या अंगीं जो नामी अल्लडपणा दिसून येतो तो कांहीं अजब आहे! काय असेल तें असो, वारंवार तिच्याकडे पहावेंसें वाटतें. तिच्या भाषणानें तर माझें मन कसें गुंगवून सोडलें आहे. बुद्धि किती तीव्र आहे. तिची भाषणशैलीच अशी गमतीची आहे, कीं तिचें बोलणें जरी कटु असलें, तरी त्या घटकेला म्हणून त्या भाषणामुळें तिचा राग येण्या ऐवजीं आपले स्वताचे अंगींच कमीपणा असल्याचें भासूं लागतें. अरेरे! दुर्दैवाची गोष्ट ही कीं, तिचीं संबंधी माणसें फारच कमी दर्जाचीं आहेत! नाहीं तर हें रत्न माझ्या हातीं–पण नको, हे विचारच नकोत एव्हां!–पण ती आतां वहिणीला जरा बरें वाटूं लागतांच घरीं लौकरच जाणार, याचें कसें! जाते हें बरें किं वाईट? वाईट–नाहीं बरेंच म्हणणें आजला युक्त आहे.

[जातो.

[पडदा पडतो.]

अंक दुसरा.
प्रवेश पहिला.

[**स्थळ**—मेरिटनची पेठ. मिस्तर डेनी व मिस्तर विखम प्रवेश करितात.]

मिस्तर डेनी—ही पाहिलीस का मेरिटनची पेठ ? येथून जवळच लॉंगबोर्न ह्मणून मी ह्मणत होतों तें ठिकाण आहे. त्याचे सध्यांचे मालक मिस्तर बेनेट आहेत. त्यांच्याच मुलींविषयीं मघां मी तुजजवळ बोलत होतों. काय सांगूं विखम ! या सगळ्या प्रांतांत मिस्तर बेनेट यांच्या मुलींसारख्या सुंदर मुली आढळणारच नाहींत !

मिस्तर विखम—खरेंच कीं काय ? एकंदर मुली तरी किती आहेत त्या ?

मिस्तर डेनी—पांचजणी आहेत.

मिस्तर विखम—आणि पांचजणींपैकी एकीचेंहि अद्याप लग्न झालें नाहीं ?

मिस्तर डेनी—होय. आणि सांगावयाची गोष्ट ह्मणजे त्यांच्यापैकीं शेवटच्या दोघीजणी तर अशा फटाकड्या आहेत कीं कांहीं बोलूं नकोस !

मिस्तर विखम—अरे वा ! तर मग तुमच्याआमच्यासारख्या आफिसरांनां ती एक महत्त्वाचीच बाब ह्मटली पाहिजे !

मिस्तर डेनी—तें काहीं विचारूं नकोस ! त्या दोघींनां ऑफिसरशिवाय एक घटकाभरहि चैन पडत नाहीं ! (पाहिलेंसें करून) अरे, पण तिकडे पाहिलेंस का ? मिस्तर बेनेटच्या मुलीच इकडे येत आहेत !

मिस्तर विखम—त्या तर तिघीच दिसत आहेत ! चालल्या आहेत तरी कुठें ?

मिस्तर डेनी—थोरल्या दोघीजणी व सर्वांत धाकटी लिडिया अशा आहेत. बहुधा त्या आपल्या मावशीकडे चालल्या असाव्या.

मिस्तर विखम—त्यांची मावशी कोण ?

मिस्तर डेनी—मिसेस फिलिप्स ह्मणून जवळच येथें राहते ती.

मिस्तर विखम—मग ह्या तिघीच कां मावशीकडे जात आहेत ?

मिस्तर डेनी—माझ्या ऐकण्यांत असें आहे कीं, त्यांची जी मेरी नांवाची बहिण आहे ती बरीच एकलकोंडी आहे. तिला आपलें घर सोडून जाणें नको असतें. एकसारखी पुस्तकें घेऊन वाचीत बसते. राहिली कॅथेराईन. कांहीं तरी कारणानें ती नसेल आली झालें.

मिस्तर विखम—पण कायरे, त्यांच्याबरोबर एक गृहस्थ दिसत आहे, तो कोण बरें ?

मिस्तर डेनी—(पाहिलेंसें करून) कोण बरें ? ओळखीचा नाहीं दिसत. असेल त्यांचाच कोणी संबंधी.

(जेन, एलिझाबेथ, लिडिया व मिस्तर कॉलीन्स प्रवेश करितात. मिस्तर डेनी, कॉलीन्स खेरीज[1] इतरांशीं शेकहँड करितो.)

मिस्तर डेनी—कसें काय ? बरें आहेना ? कोणीकडे चाललां आहांत आपण ?

लिडिया—वाहवा ! मी तर तुह्मी लंडनहून आलां किंवा नाहीं याच्याच चौकशीला चाललें होतें ! तुमची पण बातमी समजेल व मावशीचीहि भेट होईल ह्मणून इकडे आलों. (हळूच) पण हे आपल्याबरोबरचे गृहस्थ कोण ?

एलिझाबेथ—(स्वगत) हा डेनीबरोबर आलेला गृहस्थ पहातांक्षणींच मोठा संभावित दिसतो. याची एकंदर छवी फार चांगली आहे. कोण बरें असावा ? लिडिया पण त्याचीच चौकशी करीत आहे–आतां सहजीं समजेल.

मिस्तर डेनी—आपली परवानगी असेल तर या माझ्या मित्राची व तुमची सर्वांची मी ओळख करून देतों.

लिडिया—फार चांगलें.

मिस्तर डेनी—यांचें नांव मिस्तर विखम. मी लंडनला गेलों, तेव्हां यांची व माझी भेट झाली. यांनीं नुकतीच आमच्या सैन्यांत नोकरी पत्करली आहे, व हे येथेंच येऊन रुजू झाले.

(सर्वजणी मिस्तर विखमबरोबर शेकहँड करितात.)

---

१. इंग्रज समाजांत अनोळखी माणसाशीं शेकहँड करण्याची रीत नाहीं. अनोळखी माणसाशीं ओळख करून देण्याला दोघांच्या परिचयाचा मध्यस्थ लागतो. एकमेकांचीं नांवें सांगून परिचय करून देण्याचा प्रघात आहे, व असें झाल्यावर तीं दोन अनोळखी माणसें एकमेकांशीं शेकहँड करतात.

मिस्तर डेनी—पण हे तुमच्याबरोबरचे गृहस्थ कोण ?

जेन—हे आमच्या वडिलांचे संबंधी आहेत. यांचें नांव मिस्तर कॉलीन्स. (सर्वजणें शेकहँड करितात.)

मिस्तर विखम—आपली ओळख झाल्यानें मला फार संतोष वाटतो ! आपल्यासारख्यांची ओळख होणें ह्मणजे कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं !

एलिझाबेथ—(स्वगत) यांचा चेहरा जसा सुंदर आहे, तसें बोलणें पण किती मिठास ! (उघड) चांगलें वाईट मानून घेणें ज्याच्या त्याच्या स्वभावावर अवलंबून असतें.

मिस्तर विखम—अगदीं खरें !

जेन—(ऐकलेंसें करून) लिझी, कोणाच्या बरें घोड्याचे टापांचा आवाज ऐकूं येत आहे ? पाहिलेंस का ?

(मिस्तर बिंगले व मिस्तर डारसी घोड्यावर बसलेले असे प्रवेश करितात. एलिझाबेथ व जेन यांनां पाहतांच खालीं उतरून त्यांच्याशीं शेकहँड करितात.)

मिस्तर बिंगले—आह्मी तुमच्याच प्रकृतीबद्दल चौकशी करण्यास तुमच्या घरीं चाललों होतों. नेदरफील्डहून तुह्मी घरीं परत गेल्यापासून कांहींच हकीगत समजली नाहीं, ह्मणून मुद्दाम चाललों होतों. (जेनला उद्देशून) प्रकृति बरी आहे ना ?

(डारसीहि मान तुकवून तोच प्रश्न विचारल्यासारखें करितो.)

जेन—मी आपल्या दोघांचीहि फार आभारी आहें ! माझी प्रकृति आतां चांगली आहे.

मिस्तर डारसी—(स्वगत) या एलिझाबेथकडे पहावयाचें नाहीं म्हणून म्हणत होतों, पण मनांत नसतांहि डोळे तिच्याकडेसच वळत आहेत. (पाहिलेंसें करितो, तों विखम दृष्टीस पडतो.) अरे ! पण हा येथें कसा आला ?

मिस्तर विखम—(स्वगत) अरेरे ! मिस्तर डारसी ! हा येथें कोठें ? याला पाहून माझें तर धाबेंच दणाणलें ! शेकहँड तर केला पाहिजे. (टोपी[१] काढून शेकहँड करितो. डारसी तो फक्त स्वीकारल्याचें दाखवितो.)

---

१. ओळखीचा मनुष्य भेटला असतां टोपी काढून त्याच्याविषयीं आदर व्यक्त करण्याची इंग्रजलोकांत पद्धति आहे.

मिस्तर बिंगले—(स्वगत) ही काय विलक्षण भेट या दोघांची! येथें आतां क्षणभरसुद्धां उभें रहातां कामा नये! डारसीला तें मुळींच खपणार नाहीं. (डारसीकडे वळून) चला तर आतां परत जाऊं. (जेनकडे वळून) येतों तर आम्ही.

[दोघे जातात.

एलिझाबेथ—(स्वगत) हा काय बाई चमत्कार! मिस्तर डारसी तर या विखमचे बरेच ओळखीचे दिसतात! पण हा काय बाई शेकहँड करण्याचा चमत्कारिकपणा! विचारपूस तर मुळींच नाहीं. मला वाटतें, यांत कांहीं तरी गूढ आहे. परंतु उपयोग काय? तूर्त तें काय आहे हें समजावून घेण्यास साधनच नसल्यामुळें मूग गिळूनच बसलें पाहिजे. मात्र संधि येतांच याचा छडा लाविल्याशिवाय रहावयाचें नाहीं.

जेन—लिझी, अग विचार कसला चालला आहे तुझा? जेव्हां पहावें तेव्हां आपलें कांहीं तरी तुझ्या डोक्यांत चालावयाचेंच! (चाललेंसें करून) पण हें पाहिलेंस का, आपण मावशीच्या अगदीं घरापाशींच आलों!

एलिझाबेथ—अग खरेंच! पण—

मिस्तर डेनी—येतों तर आह्मी.

लिडिया—तुह्मीहि आमच्याबरोबर चला कीं आमच्या मावशीकडे! (पाहिलेंसें करून) तिकडे पाहिलेंत का मावशीसुद्धां तुह्मांला आंत येण्याविषयीं खिडकींतून खूण करीत आहे ती!

मिस्तर डेनी—नको, आह्मी आतां कांहीं येत नाहीं.

[डेनी व विखम जातात.

लिडिया—मिस्तर विखम हे फार देखणे गृहस्थ आहेत. मला कीं नाहीं ते फार आवडले. त्यांचें व आपलें जास्त संघटन होईल असें केलें पाहिजे. (विचार करून) बरी आठवण झाली. परवां कांहीं मंडळी मावशीकडे जमणार आहेत. मिस्तर डेनी यांनां बोलावणें होणारच आहे, तेव्हां त्यांच्याबरोबर मिस्तर विखम यांनांहि बोलावण्याबद्दल मावशीला आतां गेल्याबरोबर आग्रह केला ह्मणजे झालें.

एलिझाबेथ—खरेंच लिडिया, तुझी युक्ति मला फार पसंत पडली. मलाहि पण मिस्तर विखम यांच्याशीं जास्त संघटन व्हावें असें वाटत आहे. चला तर आतां आंत जाऊं.

[सर्व जातात.

प्रवेश दुसरा.

[**स्थल**—लाँगबोर्न. मिस्तर कॉलीन्स प्रवेश करितो.]

मिस्तर कॉलीन्स—माझ्या वडिलांचें व या मिस्तर बेनेटचें केवढें वांकडें! त्या दोघांमध्यें कधीं बोलणेंचालणें अगर पत्रव्यवहार झालेला तर मला माहित नाहीं! तेव्हां अशा त्या खुद्द वडिलांच्या शत्रूशीं आपण सख्य करावें किंवा नाहीं, याचा मी पुष्कळ दिवस विचार करीत होतों. परंतु अशी स्थिति असणें एकंदरीनें चांगलें नाहीं असें वाटल्यावरून शेवटीं सख्य करण्याचें मनांत आणून मीं त्यांनां प्रथम पत्र पाठविलें. पत्रामध्यें मला जें लिहिणें अवश्य वाटलें तें लिहिलें होतें. परंतु त्या लिहिण्याचा परिणाम या कुटुंबांतील माणसांचे मनावर बराच झालेला दिसतो. ही इस्टेट मिस्तर बेनेट यांच्या स्त्रीसंततीकडे जाऊं नये असा मूळ देणाराचा हेतु असल्यामुळें व बेनेट यांनां पुत्र संतति नसल्यामुळें, त्यांची ही सर्व इस्टेट मिस्तर बेनेट यांचे पश्चात् वारस या नात्यानें मला मिळणार. अर्थात्, बापाचे मरणानंतर त्यांच्या या सुंदर मुलींचें फारच नुकसान होणार आहे. तेव्हां ह्या होणारे नुकसानीची अंशतः तरी भरपाई व्हावी ह्मणून त्यांच्या मुलींपैकीं एखादीबरोबर आपण लग्न करावें, असाहि पण हेतु असल्याचा त्यांनां अप्रत्यक्ष रीतीनें समजण्यासारखा मजकूर मुद्दाम त्या पत्रांत मीं लिहिला होता, व चाणाक्ष माणसाच्या तो लक्षांतहि आला असेल. असो. मिस्तर बेनेट यांच्या मुली फारच सुंदर आहेत ह्मणून जें केवळ ऐकत होतों तें येथें आल्या-नंतर खरें ठरलें. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या सौंदर्याची ऐकिलेली कीर्ति वस्तु-स्थितीपेक्षां फारच कमी असल्याचें अनुभवास आलें. अहाहा! या मुली किती सुंदर आहेत! मिस बेनेटचें सौंदर्य तर अवर्णनीय आहे, आणि आतां मी आपल्या स्थितीचा विचार केला तर मला लग्न करणें अवश्य आहे. लेडी कॅथेराईन डी बरो यांच्या कृपाकटाक्षामुळें त्यांच्याच आश्रयाखालीं सुखानें योगक्षेम चालवितां येईल, अशी माझी स्थिति आहे. अहाहा! काय त्या बाईसाहेबांचें औदार्य! गुणग्राहकता तरी किती नामी! फारच योग्य! शिवाय लग्न करावें—नव्हे केलेंच पाहिजे—याला दुसरें आणखी एक महत्त्वाचें कारण आहे. लेडी कॅथेराईन यांचें मत रेक्टरनें लग्न करण्यास कोणचीच हरकत नाहीं असें आहे, व माझ्या बाबतींत तर त्यांची तशी आज्ञा आहे. तेव्हां स्वतःचा विचार कसाहि असला तरी त्या अशा थोर बाईसाहेबांचे आज्ञेविरुद्ध कोण जाणार? मी तर खास जाणार नाहीं.

त्यांची आज्ञा पाळणें मी आपलें पवित्र कर्तव्य समजतों. तेव्हां असे एकंदर हेतु मनांत धरून आमची स्वारी येथें आली आहे. आतां संधि सांपडतांच आपला हेतु कळवावा म्हणजे झालें. (विचार करून) अरे पण कसें करावयाचें ? जेन फार सुंदर खरी, पण तिच्यासंबंधानें थोडा विचार आहे; कारण, तिला मिस्तर बिंगले यांची मागणी पडण्याचा बराच संभव आहे, असें तिची आई ह्मणत होती. तेव्हां कसें करावें ! आपल्याला काय, ती नसली तर तिची दुसरी बहिण एलिझाबेथ ! ती तरी काय कमी सुंदर आहे ! तेव्हां तिच्याकडेसच आपलें लक्ष लावून कोणीकडून तरी आपला लग्न करावयाचा हेतु साध्य झाला, ह्मणजे एक तर लेडी कॅथेराईन यांची आज्ञा पाळल्यासारखें होणार आहे, आणि दुसरें, बेनेट घराण्यावरहि आपण उपकार केल्यासारखें होईल. ठीक आहे तर, ठरला बेत. संधि येतांच लग्नाचें बोलणें एलिझाबेथपाशीं काढावयाचें; व मी रेक्टर असतांहि लग्न कां करणार, लेडी कॅथेराईन यांची आज्ञा मोडणें कसें अवघड आहे, अशा थोर माणसाच्या कृपाछत्राखालीं वाढणें किती भाग्याचें आहे, हेंहि सर्व सांगून टाकणार !

[जातो.

प्रवेश तिसरा.

[**स्थल**—मिस्तर फिलिप्स यांचे वाड्यांतील एक दिवाणखाना. मिसेस, फिलिप्स, लिडिया, एलिझाबेथ, मिस्तर कॉलीन्स व विखम प्रवेश करितात.]

मिसेस फिलिप्स—चलावें सर्वांनींच. पलीकडल्या खोलींत खेळण्याची सर्व तयारी केलेली आहे.

मिस लिडिया—वा, मी तर आधीं येणार ! मला बाई लॉटरी[१] टिकेटनें खेळणें फार आवडतें !

मिस्तर कॉलीन्स—हल्लीं मला हा व्हिस्ट[२] खेळ चांगलासा येत नाहीं. तत्रापि सवयीनें तो चांगला खेळतां येण्यास हरकत नाहीं आणि माझी स्थिति मनांत आणितां—

१. हा एक प्रकारचा तबकलीचा खेळ आहे. यांत तिकिटावर नंबर घातलेले असतात व कांहीं नंबरांनां बक्षीस मिळावयाचें असतें.

२. व्हिस्ट हा पत्त्यांतील सात हातीं चौघांनीं खेळण्याचा खेळ आहे. पत्त्याच्या बहुतेक सर्व खेळांत पैसे लावून खेळण्याची पद्धति आहे.

मिसेस फिलिप्स—आपले फार आभार आहेत ! (विखमकडे वळून) आपणहि येतांना खेळायाला ?

मिस्तर विखम—मी व्हिस्टनें खेळत नसतों.

मिसेस फिलिप्स—बरें तर, आपण चला जाऊं तिकडे.

[मिस लिडिया, मिसेस फिलिप्स व मिस्तर कॉलीन्स जातात.

एलिझाबेथ—(स्वगत) बरें झालें, ही सर्व मंडळी खेळण्याच्या निमित्तानें तरी दुसरीकडे गेली! काय बाई चमत्कार ! मिस्तर विखम हे येथें आल्यापासून जिचें पहावें तिचें लक्ष्य यांच्याचकडे ! आधींच सुंदर, त्यांत या लष्करी पोशाखानें तर फारच शोभा आणिली आहे. असो. यांच्याशीं बोलत बसून मिस्तर डारसीची माहिती काढून घ्यावी असें मनांत आहे, व त्यामुळें तर त्यांच्याशीं एकटें बोलण्याचा प्रसंग यावा ह्मणून मी वाट पहात होतें. पण, आपणच कसें बाई विचारावें ?

मिस्तर विखम—मिस्तर डारसींनां तुह्मी ओळखतां? ते इकडे कोणीकडे ?

एलिझाबेथ—(स्वगत) फारच उत्तम! मला हवा होता तोच विषय यांनीं आपण होऊन काढिला. आतां थांबवितां कामा नये. ह्मणजे आपल्याला हवी ती माहिती सहजीं मिळेल. (उघड) ते आपले स्नेही मिस्तर बिंगले यांजबरोबर आले आहेत. मिस्तर बिंगले यांनां आपण ओळखितां ?

मिस्तर विखम—मिस्तर बिंगले यांनां मी नांवानें ओळखतों. परवां रस्त्यांत तुमची आमची गांठ पडली त्यावेळीं डारसीबरोबर जे गृहस्थ होते तेच वाटतें बिंगले ?

एलिझाबेथ—होय, तेच ते. त्यांनीं येथून जवळच असलेलें जें नेदरफील्ड ह्मणून ठिकाण आहे तें भाड्यानें घेतलें आहे, व त्या ठिकाणीं ते हल्लीं आपले स्नेही डारसी व बहिणी यांसह रहात आहेत.

मिस्तर विखम—त्यांनां येथें येऊन किती दिवस झाले ?

एलिझाबेथ—सुमारें एक महिना. मी असें ऐकतें कीं, डरबिशायरमध्यें मिस्तर डारसी यांची फार मोठी इस्टेट आहे.

मिस्तर विखम—होय, त्याची इस्टेट ह्या शायरमध्यें फार मोठी व चांगलीच आहे. सालीना निवळ उत्पन्न दहा हजार (पौंडांचें दीडलक्ष रुपयांचें) आहे. त्याच्या-

संबंधाची माहिती देण्यास माझ्याइतका दुसरा इसम आपल्याला कोणी मिळणार नाहीं. त्याच्या कुटुंबाशीं माझा संबंध अगदीं बाळपणापासून आहे.

एलिझाबेथ—खरेंच कीं काय ? मला नव्हतें ठाऊक !

मिस्तर विखम—हें पहा, मिस एलिझाबेथ ! आपल्याला आश्चर्य वाटेल यांत नवल नाहीं. परवां त्याची व माझी जी रस्त्यांत भेट झाली त्या वेळचा आमचा तो भेटीचा प्रकार कोणालाहि चमत्कारिक असा वाटला पाहिजे. मिस्तर डारसीची व आपली बरीच ओळख आहे वाटतें ? (स्वगत) न जाणों हिला जर त्याचा खरा इतिहास माहित असला तर आपण जें कांहीं पुढें सांगणार त्याचा फोलपणा इच्या लक्षांत येईल.

एलिझाबेथ—ओळख ह्मटली तर मला जितकी असावीशी वाटते तितकीच ती आहे ! मी व ते गृहस्थ एका घरांत असे चार दिवस रहात होतों. मला तर तो इसम फार तुसडा दिसतो. परवांचा तो भेटीचा प्रकारहि आश्चर्यकारकच ! एक अक्षरानेंहि ओळखीच्या मनुष्याची विचारपूस न करणें सभ्य ह्मणविणाराला कांहीं शोभत नाहीं !

मिस्तर विखम—(स्वगत) एकंदरींत डारसीच्या नांवालैकिकाला कमीपणा आणण्याचा माझा हेतू सिद्धीस जाण्यास येथें उत्तम संधि आली आहे. या पोरीचें मत त्याच्याविषयीं आधींच प्रतिकूळ झालेलें दिसत आहे. त्यांतच आणखी द्यावी भर टाकून, झालें ! (उघड) त्याच्याविषयीं मीं आपलें मत द्यावें अशी माझी पात्रताहि नाहीं व तसा मला अधिकारहि पण नाहीं ! तथापि एवढी गोष्ट खरी कीं, त्याची व माझी लहानपणापासून इतकी चांगली ओळख आहे कीं, त्याच्याविषयीं निःपक्षपातानें मत देणें मला शक्य नाहीं. पण कायहो ! मिस एलिझाबेथ, हें आपलें त्याच्या विषयींचें मत दुसऱ्या कोणाला येथें आवडणार नाहीं. आपण माझ्याशींच बोलत आहां ह्मणून ठीक. दुसऱ्या कोणासमक्ष असें मत आपल्याच्यानें देववणार नाहीं, खरें ना ?

एलिझाबेथ—नेदरफील्ड शिवायकरून वाटेल त्या ठिकाणीं याप्रमाणें मत देण्यास मी तयार आहें ! त्याच्या मंडळीशिवाय या हर्टफर्डशायरमध्यें तो कोणालाच आवडत नाहीं ! तो अत्यंत गर्विष्ठ माणूस आहे अशीच सर्वांची खात्री झाली आहे, व त्यामुळें त्याचा सर्वांनांच तिटकारा आला आहे. कोणीहि त्याच्याबद्दल चांगलें बोलणार नाहीं.

मिस्तर विखम—त्याची काय अगर दुसऱ्या कोणाचीहि काय, खरी किंमत जगाला कळल्याबद्दल खरें ह्मणाल तर मला वाईट वाटणार नाहीं. परंतु त्याच्याबद्दल खरा प्रकार काय आहे हें कोणालाच समजून येत नाहीं. त्याचें समाजांतील महत्त्व व त्याची अवाढव्य संपत्ति ह्यांच्यायोगानें जग अंध होतें व त्याच्या प्रतिष्ठित पण आग्रही वर्तनानें जग भिऊन जाऊन तो आपण जसें आहों असें भासवितो तसाच तो आहे, असें जगाला वाटूं लागतें.

एलिझाबेथ—सर्व जगाचें कांहीं का असेना, पण त्याची माझी जी काय ओळख आहे त्यांतील अनुभवावरून तो गृहस्थ फार वाईट स्वभावाचा माणूस असला पाहिजे, अशी माझी समजूत आहे.

मिस्तर विखम—तसें ह्मणण्याला कांहीं प्रत्यवाय येईल असें मलाहि वाटत नाहीं! या कौंटीमध्यें[1] तो फार दिवस राहणार आहे काय? (स्वगत) हो, करितां काय? तसें असेल तर जरा जपूनच पुढें पाऊल टाकूं.

एलिझाबेथ—मला त्यांतलें कांहींच ठाऊक नाहीं; आणि मी नेदरफील्डमध्यें असतांना त्याच्यासंबंधी कांहीं ऐकिलेंहि नव्हतें. तो शेजारींच रहात असल्यामुळें आपल्या बेतांत तर कांहीं अडचण नाहींना येणार?

मिस्तर विखम—मुळींच नाहीं! डारसीला चुकवून मला निघून जाण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं! त्यानेंच वाटेल तर निघून जावें. माझें त्याचें कांहीं बरें नाहीं, व त्याला पाहिल्यानें मला दुःख होतें ही गोष्ट जरी खरी आहे, तरी त्याला टाळण्याचें मला तरी कांहीं कारण नाहीं! मला जें वाईट वाटतें तें एवढेंच कीं, मला त्यानें फार वाईट रीतीनें वागविलें व तो स्वतः चांगल्या तऱ्हेचा माणूस निपजला नाहीं. त्याची भेट न झाली तर बरी असें वाटण्याचें कारण त्याच्या स्वभावाचें वर्णन करण्याचा प्रसंग मजवर न यावा!

एलिझाबेथ—हें केवळ आपल्या थोर मनाचें लक्षण आहे! तरी पण माझ्या-जवळ सर्व हकीगत सांगण्यास कांहीं संकोच नको धरावयाला. मला त्याची हकीगत समजण्यापूर्वीच त्याच्याविषयीं माझें मत चांगलें झालेलें नाहीं.

मिस्तर विखम—जगांत थोर ह्मणून मिरविणाऱ्या इसमाविरुद्ध कोणी बोललें, तर बोलणाराचीच अखेर फजिती व्हावयाची!

---

१. कौंटी हा आपल्या इकडील तालुक्यासारखा इंग्लंडांतील एक राजकीय विभाग आहे. यालाच शायर असेंहि ह्मणतात.

एलिझाबेथ—हें पहा, आपल्यासारख्यांच्या बोलण्याबद्दल कोण शंका घेणार आहे? त्यांत आपल्याला तर विशेष अधिकार दिसतो.

मिस्तर विखम—तें कांहीं विचारूंच नका! मिस एलिझाबेथ—या डारसीचा बाप फारच थोर माणूस होता. माझा त्याचा अत्यंत स्नेह. स्नेह ह्मणण्यापेक्षां त्याला माझा लळा फार होता, असेंच ह्मटलें पाहिजे. काय सांगूं, या डारसीला पाहिल्याबरोबर हजारों गोष्टींचें एकदम स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं! जरी माझ्याशीं त्याची वर्तणूक पाजीपणाची असली, तरी तो आपल्या बापाच्या हेतुविरुद्ध वागला, व त्यामुळें त्यानें आपल्या बापाच्या कीर्तीस कालिमा लाविला, या त्याच्या कृत्याशिवाय इतर दुसऱ्या सर्व गोष्टींबद्दल मला त्याच्यावर रागावण्याचें कारण नाहीं.

एलिझाबेथ—ही काय हकीकत आहे?

मिस्तर विखम—मला एकलकोंडेपणाचा प्रथमपासून कंटाळा व लष्करी पेशा पत्करण्याचें प्रथमच्या हेतूप्रमाणें मला कारणच नव्हतें. मी धर्मखातें स्वीकारणार होतों, व मला शिक्षणहि तशाच प्रकारचें दिलेलें होतें. आणि या मिस्तर डारसीचे लहरीस आलें असतें, तर तसें घडलेंहि असतें!

एलिझाबेथ—खरेंच कीं काय?

मिस्तर विखम—होय. डारसीच्या बापानें आपल्या मृत्युपत्रांत एक सुंदरशी रेक्टरची[1] जागा रिकामी होतांच मला द्यावी असें लिहून ठेविलें होतें; पण पुढें काय, ती जागा रिकामी झाली व त्याजवर नेमणूक झाली दुसऱ्याचीच!

एलिझाबेथ—अरे देवा! तें कसें काय झालें? मृत्युपत्राविरुद्ध कसें वागतां आलें? आपण कायदेशीर इलाज कां केला नाहीं?

मिस्तर विखम—त्या देणगीसंबंधी वापरलेल्या भाषेंत थोडा घोंटाळा होता; व त्यामुळें कायदेशीर इलाज करून कांहीं फायदा होणार नाहीं असें मत पडलें. बाकी, त्या लिहिणाराच्या हेतूबद्दल प्रामाणिक माणसाला तरी शंका आली नसती!

एलिझाबेथ—मग डारसीनें त्याबद्दल काय केलें.

मिस्तर विखम—काय सांगावें? या राजश्रींनां त्यांत शंका आली. तें लिहिणें केवळ अटीवर होतें आणि मी आपल्या वर्तनानें, खर्चिकपणानें, मूर्खपणानें आणि आणखी कांहीं अशाच दहावीस गोष्टींनीं त्या जाग्यावरील आपला हक्क गमाविला,

१. रेक्टर हा ग्रामोपाध्यायासारखा एका गांवावरील धर्माधिकारी असतो.

असें या स्वारीनें ठरविलें ! परंतु कोठें बोलण्याचालण्यांत आपलीं मतें स्पष्टपणें त्याच्या विरुद्ध असतील तीं सांगणें, याशिवाय माझ्या हातून कांहीं गैर वर्तनच ह्मणावयाचें असेल तर झाल्याचें मला तरी स्मरत नाहीं !

एलिझाबेथ—हें सर्व कोणीं ऐकिलें तर अंगावर शहारेच येतील ! असला का डारसी आहे ? सार्वजनिकरीतीनें याची निर्भर्त्सना केली पाहिजे !

मिस्तर विखम–केव्हां तरी तसें होणारच ! जोंपर्यंत त्याच्या बापाची विस्मृति मला होत नाहीं, तोंपर्यंत माझ्या हातून तरी त्याची उघडीक होणार नाहीं !

एलिझाबेथ—(स्वगत) मनाचा किती मोठेपणा हा ! यानें मूळच्याच सौंदर्याला किती तरी भर पडली ह्मणावयाची ! (उघड) परंतु इतक्या क्रूरपणानें आपल्याला वागविण्यांत त्याचा हेतु तरी कोणचा ?

मिस्तर विखम—याला कारण असूया ! माझ्याविषयींचा त्याचा पूर्ण हेवा. त्याच्या बापाचा ओढा खुद्द त्याच्या मुलाहून–या डारसीहून–माझ्यावर जास्त नसता तर मला नाहीं वाटत, डारसी अशा तऱ्हेनें वागता !

एलिझाबेथ—जरी डारसी प्रथमपासूनच मला आवडला नाहीं तरी तो इतका नीच–कृतघ्न–अन्यायी व भयंकर खुनशी असेल, असें मला वाटलें नव्हतें ! आतां मला त्याच्या त्या एकदां बोललेल्या शब्दाची आठवण होते. काय ह्मणे, 'माझा स्वभाव खुनशी आहे असेंहि कोणाला वाटण्याचा संभव आहे ! एकदांचा माझ्या मनांतून एखादा इसम उतरला तर तो निरंतरचा उतरला !' पण या हकीगतीनें त्याचे हे वरील उद्गार अक्षरशः खरे असें भासूं लागतात, व त्यांत जो कांहीं शालीनतेचा भाग असावा असें वाटत होतें, तें सर्व खोटें !

मिस्तर विखम—मला यावर कांहींच बोलतां येणार नाहीं ! माझा त्याच्या विषयींचा ग्रह पालटणें शक्य नाहीं !

एलिझाबेथ—आपल्या बापाचा स्नेही, आवडता शिष्य, त्याच्याशीं याचें असें वर्तन ? (स्वगत) असेंहि माझ्या मनांत ह्मणावयाचें होतें कीं, यांच्यासारख्या तरुण, केवळ चेहेऱ्यावरूनच जो आवडता होईल अशा या माणसाशीं असें वर्तन ? फारच गर्हणीय ! (उघड) शिवाय, आपण त्याचे बाळपणाचे मित्रहि आहां.

मिस्तर विखम—बाळपणचे मित्र एवढ्यानेंच भागणार नाहीं. आह्मी दोघे जन्मलों एकाच जाग्यांत, वाढलों एकाच ठिकाणीं, खेळ खेळलों तेहि एकाच घरांत राहून. या डारसीच्या 'पेंबरले' इष्टेटीची व्यवस्था माझ्या वडिलांकडे त्याच्या बापानें

सोंपविली होती आणि त्या इस्टेटीला उत्तम स्वरूप येण्याला माझ्या वडिलांचेच दीर्घ प्रयत्न कारणीभूत झाले. आणि या गोष्टीची आठवण ठेवून उपकाराची फेड ह्मणून व माझ्याबद्दल आवड ह्मणून या दोन्ही कारणांनीं, कदाचित् पहिल्याच कारणामुळें, त्याच्या बापानें–थोरल्या मिस्तर डारसींनीं–वर सांगितलेली जागा मला मिळावी अशी योजना केली असावी.

एलिझाबेथ—हाय हाय ! काय विलक्षण प्रकार ! हा या डारसीच्या गर्वाचा परिणाम ! दुसरें कांहीं जरी असलें तरी गर्विष्ठपणाचें पर्यवसान असें लबाडींत व्हावें काय ? कारण, याला तर मी शुद्ध लबाडीच ह्मणतें !

मिस्तर विखम—थोरल्या मिस्तर डारसीच्या मुलाला लबाड ह्मणावयाला जड जातें, पण त्याच्या वर्तनाला याहून दुसरा शब्द लावणें शक्य नाहीं ! गर्व हा तर त्याचा सद्गुणच होऊं पहात आहे ! माझ्याशीं त्यानें केलेल्या वर्तनांत गर्वापेक्षांहि जास्त निंद्य असः कांहीं विकार उद्भूत झालेला असावा.

एलिझाबेथ—इतक्या गर्विष्ठपणाचा त्याला कसला तरी उपयोग होत असेल काय ?

मिस्तर विखम—होय. या गर्विष्ठपणामुळें तर त्याच्या अंगीं उदारपणा आलेला आहे. बापाविषयीं अभिमान–भाऊ ह्मणून चांगुलपणा मिळविण्याची हौस–हाहि त्याच्या गर्वाचा परिणाम आहे. आपल्या बहिणीबद्दल विलक्षण काळजी हा गृहस्थ घेत असतो.

एलिझाबेथ—मिस डारसी ही कशी काय मुलगी आहे ?

मिस्तर विखम—विचारतां काय ? भावाचीच सख्खी बहीण ती ! गर्वाची जशी कांहीं पुतळीच ! बाकी गोष्टी सर्व ठीक आहेत. वय १५।१६ वर्षांचेंच, देखणी सुंदर आहे आणि चांगली शिकलीसवरलेलीहि आहे.

एलिझाबेथ—मला मघांपासून राहून राहून आश्चर्य वाटत आहे कीं, मिस्तर बिंगलेचा व यांचा स्नेह कसा जमला ? मिस्तर बिंगलेची व आपली पूर्वीची जानपछान नाहीं वाटतें ?

मिस्तर विखम—मुळींच नाहीं ! मघां मीं सांगितलें नाहीं का, कीं ते फक्त मला यापूर्वी नांवानें ठाऊक होते.

एलिझाबेथ—तो गृहस्थ कीं नाहीं फार सुंदर, मन मिळाऊ आणि फार गोड स्वभावाचा आहे. बहुधा डारसीचा खरा स्वभाव त्याला कळलाच नसावा !

मिस्तर विखम—हीच गोष्ट जास्त संभवनीय आहे. डारसी हा फारच हुषार आहे. जेथें स्नेह करणें कमी योग्यतेचें नाहीं असें त्याला वाटेल तेथें त्याच्यासारखी वागणूक क्वचितच आढळेल. आपल्या तोडीच्या श्रीमान् माणसाशीं त्याचें वर्तन उदार,प्रामाणिकपणाचें,न्यायी, थोर व प्रेमळ असतें,असेंहि ह्मणण्यास हरकत नाहीं. असें असलें तरी पण गर्वाला फांटा दिला, असें मात्र होत नाहीं व स्वतःच्या संपत्तीबद्दल व सुस्वरूपाबद्दल आत्मजागृति असल्याचें दिसून येतच असतें. (पाहिलेंसें करून) अरे, पण इकडे कोण येत आहे ?

एलिझाबेथ—(पाहून) मिस्तर कॉलीन्स. (कॉलीन्स प्रवेश करितो.) काय, मिस्तर कॉलीन्स, खेळ कसा काय झाला ? आपण खेळांत जिंकलां कीं हरलां ?

मिस्तर कॉलीन्स—खेळांतील जयापजयाविषयीं आह्माला कांहींच वाटत नाहीं ! लेडी कॅथेराईन डी बरो यांच्या उदारतेनें आमची पैशाच्या दृष्टीनें फार बरी स्थिति आहे. तेव्हां करमणुकीखातर खेळतांना पांचदहा शिलिंगांचा चट्टा लागल्यानें मोठेंसें नुकसान झालें, असें मी समजत नाहीं. चालूं द्या, आपलें काय चाललें आहे तें, आह्मी जातों !

[जातो.

मिस्तर विखम—लेडी कॅथेराईन यांचा व या गृहस्थाचा बराच निकट संबंध आहे वाटतें ?

एलिझाबेथ—होय. त्या बाईसाहेबांनीं नुकतेंच यांनां रेक्टर नेमिलें आहे. यांची लेडी कॅथेराईनकडे प्रथम डाळ कशी शिजली, याचेंच मला आश्चर्य वाटतें ! पण एवढें खास कीं, तिची व यांची फार दिवसांची कांहीं ओळख नाहीं.

मिस्तर विखम—लेडी कॅथेराईन व लेडी ॲन डारसी ह्या बहिणी बहिणी होतात व ह्मणून या डारसीची लेडी कॅथेराईन मावशी लागते, हें आपल्याला ठाऊक असेलच.

एलिझाबेथ—नाहीं, मला त्यांतली कांहीं माहिती नाहीं. खुद्द त्या बाईचें नांवहि मला नुकतेंच कळलें.

मिस्तर विखम—तिच्या मुलीला ह्मणजे मिस डी बरो इला मोठीच इस्टेट मिळावयाची आहे; व असाहि पण संभव आहे कीं, ती व तिचा मावसभाऊ यांचा शरीरसंबंध होऊन त्या दोन्ही इस्टेटी एकत्र होतील.

एलिझाबेथ—(स्वगत) ही काय नवीन बातमी मी ऐकत आहें. अरेरे ! बिचारी मिस बिंगले ! तिचे सर्व बेत आणि आशा निष्फळ होणार तर! तिचा तो डारसीचें मनधरणी करण्याकरितां सारखा चाललेला लडिवाळपणा शेवटीं व्यर्थ होणार ना ! ! (उघड) मिस्तर कॉलीन्स यांचें मत त्या दोघी मायलेकींबद्दल चांगलें आहे; पण मीं जें कांहीं त्यांच्या तोंडून ऐकिलें आहे त्यावरून ती बाई मोठी मस्त आणि अहंमन्य असावी.

मिस्तर विखम—हे दोन्ही दुर्गुण—गुण ह्मणा पाहिजे तर—तिच्या अंगीं बऱ्याच अंशानें असावे, असें मलाहि वाटतें. मीं तिला पाहिल्याला जरी बरींच वर्षें झालीं आहेत, तरी मला इतकें स्मरतें कीं, ती मला आवडत नसे. आणि तिची वागणूक 'हम करे सो कायदा' या पद्धतीची असे. ती बाई फार हुशार आणि शहाणी आहे ह्मणून तिची ख्याति आहे. पण तिचे हे गुण अंशतः तिच्या संपत्तीमुळें व दर्जामुळें व कांहीं अंशीं तिच्या अधिकारयुक्त वाणीमुळें व अंशतः तिच्या भाच्याच्या गर्वामुळें तिला प्राप्त झाले असावेत, असें मला वाटतें. कारण, डारसीला वाटतें कीं, ज्या ज्या माणसाशीं आपला संबंध आहे किंवा होईल, तीं सर्व माणसें पहिल्या प्रतीचीं शहाणीं असलीं पाहिजेत.

एलिझाबेथ—हें डारसीचें आपण केलेलें वर्णन अगदीं यथार्थ आहे. त्याला तसा अभिमान आहे खराच. मला कीं नाहीं, आजच्या ह्या माहितीनें फार समाधान झालें आहे. असो. चला तिकडे, जेवणाची तयारी झाली वाटतें. तिकडे आतां गेलेंच पाहिजे. मावशी वाट पहात असेल.

मिस्तर विखम—आपण चला पुढें, मी येतों पाठीमागून.

[एलिझाबेथ जाते.

मिस्तर विखम—(स्वगत) डारसीचें व माझें बोलूनचालून हाडवैर पडलेलें. त्याची जगांत नाचक्की व्हावी हें तर आपल्याला इष्ट. तेव्हां त्याच्याविषयीं वाईट ग्रह उत्पन्न करून देण्याची आलेली सुंदर संधि हा पठ्या काय फुकट दवडतो ? माझें भाषण इतकें लक्ष लावून यापूर्वी कोणींच ऐकलें नसेल. माझ्या ह्मणण्यावर गैरविश्वास ठेवण्याला कांहीं कारणें तिच्याजवळ नाहींत असें एकदां काढून घेतल्यावर मग काय हावें ? आधींच दूषित झालेल्या तिच्या मनाला पटेल अशाच रीतीनें त्याचा इतिहास मीं तिला सांगून टाकिला. हेतु हाच कीं, तिचा झालेला वाईट ग्रह असाच कायम रहावा. स्वारीला ह्मणावें, समजून अस !

जेथें जेथें संधि सांपडेल तेथें तेथें मिळून तुझी नाचक्की केल्याशिवाय मी राहणारच नाहीं! एवढेंच नव्हे, तर ईश्वरेच्छेनें तशी संधि आल्यास तुला नाकच घांसावयाला लावीन! हें डारसीचें आख्यान पुरे झालें. पण येथें आल्यानें एका अर्थी बरेंच झालें. या 'मिलीशिया'मध्यें स्नेही मंडळी बरी आहे. आह्मां ऑफीसरांनां भेटणाऱ्या तरूण पोरींचीहि गर्दी आहे. पैशाचा लग्गा साधेल अशीं स्थळेंहि डोकावूं पहात आहेत. आणि आमची स्वारी तर बगळ्यासारखी टपून बसलेली आहेच– भुरळलेला एखादा मासा जवळ येण्याचा अवकाश कीं तोंडांत टाकलाच! पण एक मोठें विघ्न सर्व बेतांच्या आड येणार आहे. मघाशीं मार ठोकून दिलें खरें, पण अंतःकरणापासून बोलावयाचें तर डारसी येथें शेजारींच रहात आहे हें चिन्ह कांहीं ठीक नाही. तो येथून जितका लौकर जाईल तितकें चांगलें. कारण, त्याच्या वजनाच्या टापूंत मला वेडेंवांकडें असें कांहींच करितां येणार नाहीं. पण आजच याचा फारसा विचार कशाला?

[जातो.

प्रवेश चवथा.

[**स्थळ**—ल्यूकस लॉज. मिस्तर कॉलीन्स व मिस ल्यूकस प्रवेश करितात.]

मिस्तर कॉलीन्स—मिस ल्यूकस! आतां तूं लौकरच मिसेस कॉलीन्स होणारना? लाडके, तूं माझी मागणी कबूल केलीस ह्मणून मला जो कांहीं आनंद झाला आहे, तो काय सांगूं? मीं इकडे येतांना केलेल्या बेताप्रमाणें लग्नाचा योग जुळून येणार हें पाहून मला स्वतःला जें समाधान वाटत आहे, त्यापेक्षांहि लेडी कॅथेराईन यांनां माझ्या कर्तृत्वाबद्दल जें कांहीं वाटेल व त्यामुळें त्या बाईसाहेब माझें जें काय कौतुक करतील त्याची मला कल्पनाच करवत नाहीं! त्या हट्टी एलिझाबेथ बेनेटनें जेव्हां का माझें ह्मणणें नाकबूल केलें, तेव्हां मला किती वाईट वाटलें ह्मणून सांगूं? मिस ल्यूकस, मी तिला फार हुषार समजत होतों; पण तुझ्यापुढें आतां तिची कांहींच किंमत वाटत नाहीं! गुणग्राहकता कशी ती तिला ठाऊकच नाहीं. असो. त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट म्हटली ह्मणजे ही कीं, ती तुझी मैत्रीण आहे. आतां लौकरच मी पुनः येथें आलों व आपलें लग्न होऊन तूं माझ्या बरोबर हन्सफर्डशायरला आलीस, व लेडी कॅथेराईनचा आपल्या विषयींचा आदर– नव्हे प्रेमच तें–अनुभवलेंस, तसेंच आपलें घरदार, चीजवस्त, बागबगीचा पाहि-

लास ह्मणजे होणाऱ्या आनंदापेक्षां एलिझाबेथनें केलेल्या चुकीबद्दल तुला वाईट वाटून तूं तिची कींवच करूं लागशील !

मिस ल्यूकस—बरें, पण हें असलें बोलणें आतांच कशाला पाहिजे ? आतां आधीं आपण वडिलांची याबद्दल परवानगी घ्यावी. आईची[1] मी घेतेंच.

मिस्तर कॉलीन्स—अग त्याचें काय एवढें मोठें आहे ! सर विल्यम यांची या गोष्टीला–आपल्या भावी संबंधाला–परवानगी आहेच ह्मणून समजलें पाहिजे. तें काम मी आतांच करून टाकितों. रात्रौ मी जाणार. जातांना लॉंगबोर्न येथें या आपल्या संबंधाची मी मुळींच ओळख देणार नाहीं. तरी पण त्या मंडळीला या गोष्टीचा वास लागेल असें कांहीं बोलल्याशिवाय माझ्यानें रहावणार नाहीं. कोणीं चाणाक्षपणानें त्याचा अर्थ ग्रहण केला तर ठीक, नाहीं तर नाहीं.

मिस ल्यूकस—आतां कोठें ही गोष्ट लपून का राहणार आहे ? आणि लपवून तरी काय फायदा ? उलट ती आपल्या आप्तेष्टांनां समजणेंच अवश्य असतें.

मिस्तर कॉलीन्स—उद्यां तुह्माला जसें बरें दिसेल तसें करा !

मिस ल्यूकस—पण गडे आपण लौकरच पुनः येणार ना ?

मिस्तर कॉलीन्स—कां ? तुला शंका कां वाटते ? अग, अशा बाबतींत तरूण पुरुषाचें मन किती उत्कंठित असतें त्याचा अनुभव तुला कसा येणार ? शिवाय, आपण थोर माणसांच्या आश्रयांतील मंडळी. तेव्हां लेडी कॅथेराईन यांनां ही सर्व हकीगत सांगून त्यांचा रुकार घेतल्याशिवाय कसें चालेल ? यापुढें कशी काय व्यवस्था करावयाची याची योजना खुद्द लेडी कॅथेराईन करून देतील, अशी माझी पूर्ण खात्री आहे. तेव्हां, थोरामोठ्यांचा अभिप्राय मिळण्याचें आपल्या नशिबीं परमेश्वरानें घातलें आहे त्याचा फायदा आपण घेतला पाहिजे.

मिस ल्यूकस—मन रहात नाहीं ह्मणून आपलें विचारलें हो ! खरें ह्मटलें तर पुढील बेतांनां पुष्कळ अवकाश आहे. तरी पण सहज सुचलें ह्मणून सांगतें. आपण हन्सफर्डशायरमध्यें राहूं लागल्यावर लौकरच माझ्या बाबांनां व एलिझाबेथला आपल्या घरीं भेटावयाला बोलवावयाचें बरें का !

---

१. इंग्रजलोकांमध्यें प्रीतिविवाहाची पद्धति असल्यामुळें स्त्रीपुरुष प्रथमतः परस्परांमध्यें निश्चय करितात. नंतर आईबापांची परवानगी घेऊन लग्न कायम ठरतें.

मिस्तर कॉलीन्स—अगदीं जरूर ! आपल्या संबंधी माणसांशिवाय आपल्या सुस्थितीबद्दलचें कौतुक दुसरें कोण करणार ? आणि त्या एलिझाबेथ बेनेटला बोलावण्याच्या बेताला तर माझी पूर्ण संमति आहे ! प्रत्येक गोष्ट पाहून तिला मनांतल्यामनांत खजील झाल्यासारखें वाटेल, यांत मला शंका वाटत नाहीं ! असो. हे सर्व बेत पुढें नक्की करतां येतीलच. येतों मी आतां.

[कॉलीन्स जातो.

मिस ल्यूकस—या गोष्टीनें माझ्या आईबापांनां संतोष होईल, यांत शंकाच नाहीं. माझें वय, आमच्या कुटुंबाची एकंदर स्थिति, मिस्तर कॉलीन्स यांची योग्यता, या एकंदर गोष्टींचा विचार केला तर मीं त्यांनां पसंत करण्यांत चूक केली, असें मला तरी वाटत नाहीं ! पण माझी जिवलग मैत्रीण जी लिझी तिला मात्र माझ्या या कृत्याबद्दल बरें वाटणार नाहीं, याचेंच मला राहून राहून वाईट वाटत आहे. ती मला खास दोष देईल. जो पुरुष तिला आवडला नाहीं, तो जगांतील कोणच्याच स्त्रीला आवडूं नये काय ? असें जरी मीं तिला विचारलें, तरीसुद्धां तिला तें पसंत पडणार नाहीं. मिस्तर कॉलीन्सविषयीं तिचा ग्रह फारच वाईट झालेला दिसतो. संसारांत सौख्य मिळणें हें केवळ भवितव्यतेवर अवलंबून असतें. जरी स्त्रीपुरुषांचे स्वभाव एकमेकांनां लग्नापूर्वी पूर्णपणें माहितीचे असले, आणि ते एकमेकांशीं जुळतेहि असले, तरी लग्न झाल्यानंतर सौख्यवृद्धि होते असें थोडेंच आहे ! कारण, लग्नसंबंधानंतर त्यांचे स्वभाव इतके कांहीं भिन्न भिन्न होऊं लागतात कीं, जो कांहीं संसारांत त्रास व्हावयाचा तो प्रथमच्या –लग्नापूर्वीच्या–सावधगिरीनें कांहीं टळत नाहीं ! तेव्हां ज्याच्याबरोबर आपला सर्व जन्म घालवावयाचा त्याच्या अंगीं असलेल्या दोषांची माहिती लग्नापूर्वी जितकी कमी असेल तितकी चांगली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असो. कसेंहि करून तिची समजूत ही घातलीच पाहिजे. तिला ही गोष्ट लोकोलोकीं कळण्यापूर्वी स्वतः मींच कळविलेली चांगली. आज रात्रीं तिची नेदरफील्डला बॉलच्या वेळीं गांठ पडेलच; परंतु तेथें हा विषय बोलण्यासारखा नाहीं. उद्यां सकाळींच हें काम केलें पाहिजे.

[जाते.

प्रवेश पांचवा.

[**स्थळ**—नेदरफील्ड. बॉलरूम. एलिझाबेथ प्रवेश करिते.]

एलिझाबेथ—अरे पण, मिस्तर विखम कोठें दिसत नाहींत! आज ह्या बॉलकरितां किती विलक्षण तयारी मिस्तर बिंगले यांनीं केली आहे, व त्याचें कारण मनाला आनंद देणारेंच आहे. जेनकरितां हा बॉल दिला आहे. तिला दुखण्यांतून उठलेली पाहून त्यांनां जो आनंद झाला त्याचेंच हें द्योतक आहे. आज जेनच्या सुखवृक्षाचें बीजारोपण होणार, यांत मला तर कांहीं शंका दिसत नाहीं. या गोष्टी जशा व्हाव्या तशाच होत आहेत. पण माझी वाट काय? मिस्तर विखम हे आज पुनः भेटतील, त्यांच्याबरोबर नृत्य करण्यास सांपडेल, त्या डारसीबद्दल पुष्कळसें बोलावयास मिळेल, ह्मणून मी मनांतल्यामनांत केलेले बेत फुकट जाणार कीं काय?—अरे पण मी वेडी तर नाहीं! मिस्तर बिंगले जरी फार सुशील आहेत तरी डारसी येथें असतां, मिस्तर विखम यांनां बोलावतील, असें घडेल तरी कसें? होय, तसेंच झालें असलें पाहिजे. (पाहिलेंसें करून) अरे पण, इकडे हें कोण येत आहे? मिस्तर डेनी व लिडिया. वा! फारच उत्तम. आतां बहुधा समजेल खरा प्रकार काय आहे तो.

(मिस्तर डेनी व लिडिया प्रवेश करितात.)

लिडिया—मिस्तर डेनी, मिस्तर विखम कोठें दिसत नाहींत? सांगा लौकर ते कोठें आहेत तें?

मिस्तर डेनी—ते येथें आलेले नाहींत.

एलिझाबेथ—ह्मणजे असें कसें! त्यांनां बोलावणेंच नव्हतें कीं काय?

मिस्तर डेनी—अहो बोलावणें कसें चुकेल! मिस्तर बिंगले यांच्यासारख्या सद्गृहस्थाकडून अशी चूक होणें संभवनीय नाहीं. मिस्तर विखम यांनां कांहीं जरूरीच्या कामामुळें लंडनला जाणें भाग पडलें व ह्मणून ते परवांच येथून लंडनला निघून गेले. त्यांनां लंडनला काम तर असेलच; पण माझा स्वतःचा तर्क असा आहे कीं, त्यांनां येथील एका गृहस्थाची भेट चुकवावयाची नसती तर ते त्या कामाकरितां ह्मणून आतांच कांहीं लंडनला गेले नसते! मिस लिडिया, जरा आपण तिकडे दुसरे कोण ऑफीसर आले आहेत तें पाहूं.

लिडिया—चला तर.

[मिस लिडिया व डेनी जातात.

एलिझाबेथ—(स्वगत) एकूण मिस्तर विखम आज येथें नसावयाला कारण डारसीच ! बोलावणें नसलें काय आणि असून येथें हजर राहणें अशक्य झालें काय, सारखेंच ! आज रात्रीं किती तरी सौख्यदायक गोष्टी घडून येतील असें मला वाटलें होतें; परंतु ते मनचे मांडे मनांत जिरले. आतां मला आजची ही रात्र अगदीं निराशामय भासणार यांत कांहीं शंका नाहीं. अरे, पण हें कोण माझ्याकडे येत आहे ?

(मिस्तर डारसी प्रवेश करितो.)

मिस्तर डारसी—मिस एलिझाबेथ बेनेट, तुलाच मी पहात होतों. आतां सुरू होणाऱ्या नृत्याला आपल्या जोडीचा लाभ मिळावा अशी इच्छा आहे.

एलिझाबेथ—बरें तर.

मिस्तर डारसी—(आनंदानें) मी तुझा फार फार आभारी आहें.

[जातो.

एलिझाबेथ—(स्वगत) अरेरे ! हें मीं काय केलें ! मिस्तर डारसीनें मला आज नृत्याला बोलाविलें हें झालें तरी कसें ? ल्यूकस लॉजमध्यें सर विल्यमनीं बॉल दिला त्या वेळीं पहिल्याच भेटीला खुद्द मिस्तर बिंगले यांनीं माझ्याशीं नृत्य करण्यास जावें ह्मणून सांगितलें असतां ज्या या स्वारीनें माझ्याकडे नुसतें पाहिलेंसें केलें व "कोण ! ही का ? कांहींशी बरी आहे–पण माझ्या मनांत भरेल अशी कांहीं ती सुंदर नाहीं !" असें ह्मणून मला झिडकारिलें–तीच डारसीची स्वारी आज आपण होऊन मला नृत्याला बोलवीत आहे, हें केवढें आश्चर्य ! हें आश्चर्य तर खरेंच ! पण मीं खुळीनें त्यांचें ह्मणणें कबूल केलें हें महदाश्चर्य होय ! काय बाई चमत्कार ! त्या क्षणीं माझें प्रसंगावधान गेलें होतें तरी कोठें ? असो. आतां काय त्याचें ! झालें तें झालें. शिष्टाचाराप्रमाणें आतां त्याच्याबरोबर नृत्याला गेलेंच पाहिजे.

[जाते.

प्रवेश सहावा.

[**स्थळ**—तेंच. नृत्य चालू आहे असा देखावा.]

एलिझाबेथ—मिस्तर डारसी, आतां तुह्मीं कांहीं तरी बोललें पाहिजे. मघाशीं मीं नृत्यासंबंधीं प्रश्न केला; आतां तुह्मीं या खोलीचा आकार अगर येथें जमलेल्या स्त्रीपुरुषांविषयीं कांहीं तरी ह्मटलें पाहिजे.

मिस्तर डारसी—(हंसत) मीं जें जें कांहीं बोलावें ह्मणून तुझी इच्छा असेल, तें बोलण्यास माझी अगदीं तयारी आहे!

एलिझाबेथ—ठीक आहे. ह्या उत्तरानें तूर्त काम भागणार आहे. कारण, एक अक्षरहि न बोलतां एकसारखें दोघांनीं नृत्य करणें इतरांच्या दृष्टीला तरी जरा चमत्कारिक दिसेल. जातां जातां मी असेंहि ह्मणतें कीं, सार्वजनिक बॉलपेक्षां खासगी बॉलमध्यें जास्त मौज असते; परंतु या मोठ्या संभाषणानंतर कांहीं वेळ स्वस्थ बसलें तरी चालेल.

मिस्तर डारसी—तर मग तूं नृत्य करीत असतांना ठराविक नियमानें बोलत असतेस?

एलिझाबेथ—होय. कधीं कधीं तसें करावें लागतें. हें पहा, माणसानें नेहमीं बेताबातानें बोलावें. भाषणाचा विषय असा काढावा कीं, होतां होईल तों जितकें कमी बोलणें निघेल तितकें चांगलें.

मिस्तर डारसी—हे विचार स्वतःचे ह्मणून तूं सांगत आहेस किंवा मला ते आवडतील ह्मणून बोलून दाखवीत आहेस?

एलिझाबेथ—दोघांचे ह्मणून मी ते सांगत आहें. आपल्या दोघांच्या स्वभावामध्यें सारखेपणा बराच असल्याचें माझे दृष्टोत्पत्तीस आलें आहे. दोघांनांहि मनमिळाऊपणा नको आहे, बोलावयाला थोडें पाहिजे, आणि जें काय थोडें बोलावयाचें त्याच्या योगानें सर्व समाज आश्चर्यचकित होऊन तें बोलणें ह्मणी-सारखें लोकांनीं नेहमीं ध्यान्यांत ठेविलें पाहिजे.

मिस्तर डारसी—हें कांहीं तुझ्या स्वभावाचें तंतोतंत वर्णन नाहीं. तें माझ्या स्वभावाशीं कितपत जुळतें हें सांगावयाचा आव मीं आणिला नाहीं. तुला मात्र निःसंशयपणें हें चित्र बरोबर वठलें आहे असें वाटतें ना!

एलिझाबेथ—माझ्याच कृतीविषयीं मींच मत देणें चांगलें नाहीं!

मिस्तर डारसी—बरें, हें असो. पण मेरिटनकडे तूं व तुझ्या बहिणी नेहमीं जातां काय?

एलिझाबेथ—होय; आणि परवां जेव्हां तुमची व आमची पेठेंत गांठ पडली, त्या वेळीं आह्मी एक नवीनच ओळख करून घेत होतों.

मिस्तर डारसी—(स्वगत) तारूं निराळ्याच दिशेला झुकलें! माझ्यानें एक अक्षरहि यावर बोलवत नाहीं. ज्याचें स्मरण होतांच सचैल स्नान करावेंसें वाटतें,

तो इसमच अशा ह्या आनंददायक प्रसंगीं बोलण्याचा विषय व्हावा, हा काय चमत्कार ! असो इलाज काय !

एलिझाबेथ—(स्वगत) अगबाई, हें काय भलतेंच झालें ! वास्तविक मन आवरून धरून मीं त्याचा उल्लेख करावयाला नको होता.

मिस्तर डारसी—विखमची चालचलणूक अशी आहे कीं, दैवलीलेनें त्याला हवे तितके स्नेही मिळतात; परंतु तो मात्र त्यांचा स्नेह कितपत राखील याचा भरंवसा नाहीं !

एलिझाबेथ—दुर्दैवानें त्याला आपल्या स्नेहाला अंतरावें लागलें, आणि तेंहि अशा रीतीनें कीं, त्याचा परिणाम त्याला सगळ्या जन्मभर भोगावा लागणार आहे.

(सर विल्यम प्रवेश करितात.)

सर विल्यम—हें पहा, मला फार आनंद होत आहे. इतकें उत्कृष्ट दर्जाचें नृत्य फारसें आढळण्यांत येत नाहीं. तुम्हां दोघांचा नंबर पहिला लागत आहे. मिस्तर डारसी, तुमची जोडीदारहि तुमच्या अगदीं योग्य आहे, आणि असलें हें तुमचें नृत्य वारंवार पहाण्याचा प्रसंग येईल तर फार बरें ! तुझ्या वडील बहिणीच्या बाबतींत सर्वांच्याच अनुमानाप्रमाणें जर आनंददायक योग जुळून आला, तर तुमचें हें नृत्य वारंवार पहाण्याची संधि आह्मांला दिली जाईल अशी मी आशा करितों. खरेंच, तो आनंदाचा दिवस उगवला तर किती गोडवे गायिले जातील ! मिस्तर डारसी, तुमच्यासारख्यालाच त्याची खरी किंमत समजणार आहे. असो. या तरुण मुलीच्या मनोवेधक व चित्ताकर्षक भाषणाला माझ्या येण्यानें तुह्माला अंतरावें लागलें याबद्दल आपण क्षमा करालच ! येतों तर मी.

[जातो.

मिस्तर डारसी—(स्वगत) मी काय ऐकतों आहें हें ? सर विल्यम यांनीं तर्किलेली गोष्ट घडावी–घडणें संभवनीय आहे–असें नुसतें ऐकूनसुद्धां माझ्या मनाची काय विलक्षण स्थिति झाली पहा ! या गोष्टीच्या मुळाशीं जाऊन खरा प्रकार काय आहे तो पाहून याबद्दल नीट विचार केला पाहिजे. परंतु याच क्षणाला तें होणें शक्य नाहीं. (उघड) सर विल्यम मध्येंच आल्यानें आपण काय बोलत होतों तें मी विसरलों.

एलिझाबेथ—मला नाहीं वाटत आपण कांहीं बोलत होतों असें ! ज्यांनां स्वतःशीं कांहींच बोलावयाचें नाहीं अशीं जर कोणी दोन माणसें या समाजांत

असतील, तर तीं आपणच दोघें आहों! तेव्हां, सर विल्यम यांनां मध्यें पडण्याला आपणापेक्षां जास्त सोईची अशी दुसरी जोडी मिळालीच नसती! बोलण्याकरितां ह्मणून दोनतीन विषय आपण काढण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थ गेला. आतां काय बोलावें हेंच मला सुचत नाहीं!

मिस्तर डारसी—(हंसत) पुस्तकांविषयीं तुझें मत कसें काय आहे ?

एलिझाबेथ—काय पुस्तकें ? अरे बापरे! मला खास वाटतें कीं, आपण दोघें एकच पुस्तक निदान एकाच मनःप्रवृत्तीनें कांहीं वाचीत नाहीं!

मिस्तर डारसी—तुला असें वाटावें, याबद्दल मला खेद होतो; परंतु असें असेल तर भाषणाच्या विषयाला तरी कमतरता पडणार नाहीं. आपण आपापलीं मतें ताडून पाहूं, ह्मणजे झालें.

एलिझाबेथ—नाहीं, मला कीं नाहीं, बॉलरूममध्यें पुस्तकांविषयीं बोलणें पसंत नाहीं. माझ्या डोक्यांत नेहमीं दुसरेच विषय घोळत असतात.

मिस्तर डारसी—ह्या प्रसंगीं तुझें लक्ष बहुधा सद्यःस्थितीकडे जात असावें, असा मला संशय येतो.

एलिझाबेथ—होय हो, तसें कां ह्मणाना ? पण काय हो, मिस्तर डारसी! तुह्मी एकदां केव्हांसे म्हणालां होतां नाहीं का, कीं, तुम्ही क्षमा अशी क्वचितच करितां! एखाद्याचा एकदां तुम्हाला राग आला, कीं तो ह्मणून कधीं जावयाचा नाहीं. तेव्हां मी असें विचारतें कीं, प्रथम एखाद्याबद्दल वाईट ग्रह होण्यापूर्वीं तुम्ही फार खबरदारी घेत असाल, नाहीं ?

मिस्तर डारसी—हें काय विचारतेस, तशी खबरदारी मी घेतोंच घेतों!

एलिझाबेथ—आणि गैर समजाला अशा वेळीं तुम्ही थाराहि देत नसाल!

मिस्तर डारसी—होय.

एलिझाबेथ—ज्यांचीं मतें वारंवार पालटत नाहींत त्यांच्यावर आपलीं मतें बनवितांना योग्य विचार करण्याची मोठीच जबाबदारी असते. पण ही जबाबदारी ओळखणारे मात्र बोटांवर मोजण्याइतके तरी मिळतील किंवा नाहीं कोण जाणे!

मिस्तर डारसी—या प्रश्नांचा झोंक कोणीकडे आहे, हें समजेल का ?

एलिझाबेथ—अंः, त्यांत काय आहे ? ती तुमच्या स्वभावपरीक्षणांतील एक बाब ह्मणून विचारलें.

मिस्तर डारसी—मग त्यापासून काय निष्पन्न झालें ?

एलिझाबेथ—कांहींच थांग लागत नाहीं! तुमच्याविषयीं मला अशा कांहीं निरनिराळ्या गोष्टी ऐकूं येतात कीं, त्यांच्या योगानें माझी विचारशक्ति कशी गोंधळून जाते!

मिस्तर डारसी—होय, तसें होण्याचा संभव आहे खरा. माझ्याविषयीं निरनिराळ्या हकीगती तुझ्या कानावर येत असतील, यांत मला संशय वाटत नाहीं. आणि मिस एलिझाबेथ बेनेट! माझें तुला इतकेंच सांगणें आहे कीं, या वेळीं तूं माझ्या स्वभावाचें चित्र रेखाटणें चांगलें नाहीं. कारण, त्यापासून उभयतांनांहि फायदा होईल असें वाटत नाहीं.

एलिझाबेथ—पण या वेळीं जर मीं तुमच्या स्वभावाचें परीक्षण करून ठेविलें नाहीं, तर मला तसें करण्याला कदाचित् पुनः प्रसंगहि मिळणार नाहीं!

मिस्तर डारसी—तुझ्या इच्छेच्या आड माझ्यानें जाववत नाहीं.

[दोघेंहि नृत्य करीत आहेत असा पडदा पडतो.]

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

[स्थळ—नेदरफील्ड. मिस बिंगले, व मिसेस हर्स्ट प्रवेश करितात.]

मिस बिंगले—लुअॅझा, चार्लस तर लंडनला निघून गेला. पण एका गोष्टीचा आपण विचार केला पाहिजे, असें मला वाटतें. चार्लसचें मिस बेनेटकडे लक्ष लागत आहे, ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे; परंतु तसें होणें तर इष्ट नाहीं. तेव्हां कसें करावें ?

मिसेस हर्स्ट—खरेंच, तूं ह्मणतेस ती गोष्ट कांहीं खोटी नाहीं. जेन बेनेट जरी मला आवडते, तरी आमच्या चार्लसचें लक्ष तिनें वेधून घ्यावें, हें कांहीं ठीक चिन्ह नव्हे! कारण, नेम काय ? एकदां का तो तिच्या जाळ्यांत पक्का सांपडला, ह्मणजे मग तिचे संबंधी माणसांकडे अगर तिच्या जातकुळी वगैरे गोष्टींकडे दुर्लक्ष्य व्हावयाचें.

मिस बिंगले—अग, ती तर मोठी भीति ! पण इकडे कोण येत आहे ? (पाहिलेंसें करून) डारसी वाटतें. फारच उत्तम. त्यांनां या आपल्या बेतांत घेतलें पाहिजे.

(मिस्तर डारसी प्रवेश करितो.)

मिस्तर डारसी—कां ? दोघीजणी मिळून कसलें खलबत चाललें आहे ?

मिस बिंगले—अहो खलबत कसलें ह्मणा ! पण किती झालें तरी आमचा भाऊच पडला तो. त्याच्या हातून जर यदाकदाचित् चूक होत असली तर आह्मी नको का काळजी घ्यावयाला ?

मिस्तर डारसी—(स्वगत) अरे वा, माझ्या डोक्यांत घोळत असलेला विषय यांचेहि मनांत घोळत आहे असें दिसतें. हा योग तर बहूत नामी ! (उघड) हो, बहिणीनें भावाची काळजी घेतलीच पाहिजे. पण चार्लसच्या हातून अशी चूक तरी कोणची होत आहे ?

मिस बिंगले—वाहवा, जणूं काय तुमच्या लक्ष्यांतच आलें नाहीं ! अहो, जेन बेनेटकडे चार्लसचें लक्ष जाऊं पहात आहे व माझ्या मतानें तरी हें चिन्ह कांहीं ठीक नाहीं.

मिस्तर डारसी—अग, तेवढ्यावरच कांहीं संपत नाहीं. लोकांनीं तर त्यांचा शरीरसंबंध लौकरच होणार असें भाकीत केलें आहे.

मिस बिंगले—खरेंच कीं काय ? बहुधा तिची आईच इतक्या पुढें एकदम गेली असेल !

मिस्तर डारसी—वा, तिची आई व लेडी ल्यूकस यांचें तर त्या विषयावर एकसारखें बोलणें किती वेळ तरी चाललें होतें; परंतु त्याच्याहि आधीं, मी मिस एलिझाबेथ बेनेटबरोबर नृत्य करीत असतांच त्यासंबंधी बातमी सर विल्यम ल्यूकस यांनीं आह्मांला सांगितली. त्या क्षणापासून मी त्या दोघांकडे सारखें लक्ष्य लावून पाहूं लागलों, व दुःखाची गोष्ट ही कीं, बहुतेकांच्या तर्काप्रमाणें काढिलेलें अनुमान चुकीचें नाहीं असें मलाहि वाटूं लागलें, व तेव्हांपासून मला तर कांहीं सुचत नाहीं. एवढी गोष्ट मात्र खरी कीं, त्याचें लक्ष्य लागत आहे तें कायम ठेवणें कांहीं इष्ट नाहीं.

मिस बिंगले—माझ्या मनांत तेंच येत आहे.

मिसेस हर्स्ट—पण त्याला उपाय कोणचा ? कारण, चार्लसचें काय आणि कोणाचेंहि काय, एकदां कायमचें मन एखादीवर गेलें ह्मणजे तें परत फिरविणें बहुतेक अशक्यच होतें.

मिस्तर डारसी—अद्यापि तूं ह्मणतेस तशी स्थिति झाली आहे असें मात्र मला वाटत नाहीं, व हरएक उपायानें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत आपल्याला यशहि येईल, असें वाटतें.

मिस बिंगले—हो तर, सर्व बाजूंनीं प्रयत्न केले पाहिजेत व त्यांतला पहिला उपाय ह्मणजे त्या दोघांची ताटातूट करणें.

मिसेस हर्स्ट—ही युक्ति मला फार पसंत आहे. या उपायानें त्यांनां एकमेकांनां वारंवार भेटण्याला संधीच सांपडणार नाहीं, आणि असल्या गोष्टी कांहीं पत्रोपत्रीं होत नसतात.

मिस्तर डारसी—हा तुमचा उपाय जरी बऱ्यापैकीं आहे तत्रापि त्याहूनहि एक नाजूक कारण मीं शोधून काढिलें आहे, त्याच्या योगानें आपलें काम फत्ते झालेंच पाहिजे !

मिस बिंगले—तें काय नाजुक कारण असेल तें तुमचें तुम्ही पाहून घ्या ! परंतु पहिली गोष्ट ह्मणजे आपण लंडनला आतांच्या आतां त्याच्या पाठोपाठ जावयाचें. आपणां सर्वांनां एकदम आल्याचें पाहून त्याला प्रथम आश्चर्य वाटेल. परंतु एकदां गेल्यावर मग काय करणार तो ? त्याची कशी तरी समजूत घालून टाकूं, ह्मणजे झालें.

मिस्तर डारसी—वा, खाशी युक्ति ! तूर्त हें असेंच करावयाचें.

[मिसेस हर्स्ट व मिस्तर डारसी जातात.

मिस बिंगले—(स्वगत) आतांपर्यंत झालें तें ठीकच झालें. जेन बेनेटकडे चार्लसचें लक्ष जात आहे एवढेंच मी तिऱ्हाईतासमक्ष बोलतें, पण मला तर वाटतें कीं, नुसतें लक्षचसें काय, पण तो तिच्यावर प्रेमहि करूं लागला आहे; पण त्यांचा संबंध व्हावा हें मला मुळींच इष्ट नाहीं. बेनेट घराण्याचा कमीपणा वगैरे गोष्टी तर आहेतच, पण त्यांत माझ्या स्वतःचा असा एक अंतस्थ हेतु आहे. त्याकरितां जेन बेनेटची निराळ्याच तऱ्हेनें कानउघाडणी केली पाहिजे. तिच्या अन्तःकरणांत चार्लसविषयीं खरें खरें प्रेम वसत आहे, हें खोटें नाहीं. पण तिनें पुढील आशा करूं नये ह्मणून तिला एक इशारा मी आपल्या पत्रांत देऊन ठेवणार आहें. आणि त्याचा इष्ट परिणाम त्या शुद्ध अन्तःकरणाच्या पोरीवर झाल्यावांचून राहणार नाहीं, व तसें झालें कीं माझें बरेंच कार्य साधेल असें वाटतें. लागावें तर त्या मार्गाला.

[जाते.

प्रवेश दुसरा.

[**स्थळ**—लाँगबोर्न. जेन हातांत एक पत्र घेऊन प्रवेश करिते.]

जेन—ह्या पत्रानें तर माझी पूर्ण निराशा झाली आहे ! त्या नेदरफील्ड बॉलच्या रात्रीचें स्मरण इतक्या दिवस मला फार आनंद देत होतें, तेंच आतां माझ्या दुःखाला कारण होत आहे. सहज कामाला ह्मणून नेदरफील्डहून लंडनला गेले ते काय, त्यांच्या पाठोपाठ त्यांच्या बहिणी व मिस्तर डारसी ही सर्व मंडळी

गेली ती काय–कांहींच समजत नाहीं ! बरें, गेली तर गेली, येतील पुनः, अशा आशेवर मी होतें, पण ह्या पत्रांत तर कॅरोलाईन स्पष्ट लिहिते कीं, हिंवाळ्यांत लंडनमध्येंच सर्व मंडळी राहणार. आतां प[illegible] व्हां येतील तेव्हां येतील. निदान पुढल्या उन्हाळ्यापर्यंत तरी येत ना[illegible] आणि सहा महिन्यांत काय काय गोष्टी घडून येतील कोण जाणे. [illegible] ही इकडे कोण येत आहे ? लिझी वाटतें.

(एलिझाबेथ प्रवेश करिते.)

एलिझाबेथ—अग, एकटीच आणि असा विचार करीत कां बसली आहेस ?

जेन—अग, विचार दुसरातिसरा कसला असणार ? असे कां बरें प्रश्न करितेस ? कोणचीहि गोष्ट मीं तुझ्याजवळून कधीं चोरून ठेविली आहे का ? अग, मी कॅरोलाईनच्या पत्राचा विचार करीत होतें. तिच्या त्या पत्रानें माझी अगदीं पूर्ण निराशा केली आहे. काय सांगूं लिझी, माझें मन कसें अगदीं वेडावल्यासारखें झालें आहे. आणि त्यांत आईला तर दुसरा विषयच दिसत नाहीं ! एकसारखी त्यांची आठवण काढून ती माझ्या मनाला किती दुःख देत आहे बरें ! वास्तविक ही गोष्ट तिच्या ध्यानांत यावयाला पाहिजे होती ! परंतु मीं तरी असें दुःख कां करावें ? कांहीं काळानें मला विसर पडेल, त्यांची स्मृति नाहींशी होईल, आणि आपण सर्व पूर्वीच्याच स्थितींत पुनः पडूं. लिझी बोलत कां नाहींस ? तुझ्या ह्या चमत्कारिक बघण्यानें माझ्या ह्मणण्याचा तुला संशय येतो, असें दिसतें; पण तुला तसें वाटण्याचें कारण नाहीं. त्यांची मला स्मृति राहिली तर ती ते एक मनमिळाऊ गृहस्थ होते, अशाच प्रकारची राहील. मला आशा वाटण्यासारखें त्यांत कांहीं नव्हतें व मला निराश होण्यासारखें त्यांत कांहीं नाहीं. किंवा त्यांनां दोष देण्याचें मला कांहीं कारणच नाहीं. देवानें बरें केलें कीं, तसलें दुःख मला भोगावें लागत नाहीं–थोडासा काळ लोटला कीं, माझें मला बरें वाटूं लागेल. आतांसुद्धां मला इतक्या गोष्टीनें समाधान वाटत आहे कीं, झाल्या प्रकारांत फक्त माझी समजूतच चुकीची झाली असें होत आहे. आणि त्याचा जो कांहीं परिमाण भोगावयाचा असेल, तो फक्त मलाच भोगावा लागणार आहे.

एलिझाबेथ—बाईग, तूं चांगुलपणाची केवळ मूर्ति आहेस ! तुझा हा गोड स्वभाव व निरपेक्षता तर अद्वितीय आहे. यावर मीं काय बोलावें हेंच मला सुचत

नाहीं. मला तर असें वाटत आहे कीं, तुझी खरी योग्यता आजपर्यंत मला कळलीच नाहीं, व मीं तुझ्यावर जितकें प्रेम करावयास पाहिजे होतें तितकें केलें नाहीं.

जेन—अग, माझ्या अंगीं विशेष असें काय आहे? उगाच मनाला लावून घेऊं नकोस. तूं बहीणच पडलीस ह्मणून तुला आपलें तसें वाटतें, एवढेंच.

एलिझाबेथ—नको, असें ह्मणूं नकोस! असें बोलण्यांत तुझ्या हातून प्रमाद होत आहे. तुझी इच्छा सर्व जग संभावित आहे असें मानण्याची आहे, आणि मी जर कोणाविषयीं वाईट बोललें तर तुला त्याचा राग येतो. मला तुझ्या अंगीं पूर्णत्व आहे, एवढेंच सांगावयाचें आहे. याहून पुढें मी जाऊं इच्छित नाहीं. सर्व जगाकडे चांगल्या दृष्टीनें पहाण्याचा जो तुझा स्वभाव आहे, त्याच्या आड मी येतें असें समजूं नकोस. पण स्वतःविषयीं बोलावयाचें तर मला आवडतात अशीं फारच थोडीं माणसें आहेत! आणि ज्यांच्याबद्दल मला बरें वाटतें, अशीं त्याहूनहि थोडीं! मी जों जों जगाकडे पाहतें, तों तों माझें असमाधान वाढत आहे, आणि दिवसेंदिवस सर्व मानवी स्वभावाच्या चांचल्याबद्दल माझी खातरी दृढतर होत आहे–आणि जो कांहीं चांगलेपणा अगर सद्गुण ह्मणून वर वर दिसून येतो, त्याजवर अवलंबून राहणें धोक्याचें आहे असें वाटूं लागलें आहे. याचीं दोन उदाहरणें अलीकडे माझ्या पहाण्यांत आलीं. एकाचा मी उल्लेख करीत नाहीं. दुसरें शार्लटचें लग्न. किती विपरीत गोष्ट ही! कोणच्याहि दृष्टीनें पाहिलें तरी तें विपरीतच!

जेन—लिझी, हें पहा, असले विचार कांहीं चांगले नाहींत! यानें तुझ्या सुखाची माती होईल. स्वभाव आणि परिस्थिति यांचा जितका योक्त विचार करावयास पाहिजे, तितका तूं करीत नाहींस. मिस्तर कॉलीन्सच्या प्रतिष्ठितपणाचा विचार कर, शार्लटचा धोरणी आणि निश्चित स्वभाव मनांत आण, आणि मग तुला कसें काय वाटतें तें पहा. अग, ती मोठ्या कुटुंबांतील मुलगी आहे हें लक्षांत घे. द्रव्याच्या दृष्टीनें पाहिलें तर हें लग्न एकंदरींत बरें आहे. निदान माझ्याकरितां तरी असें मानावयास तयार हो, व शार्लटचें प्रेम कॉलीन्सवर आहे असें समज.

एलिझाबेथ—तुझ्याकरितां काय वाटेल तें मानण्यास मी तयार आहें! परंतु असें केवळ मानण्यानें कोणचाच फायदा होणार नाहीं. कारण, शार्लटच्या मनांत त्याच्याविषयीं प्रेम होतें असें मानावयाचें, तर तिच्या अंतःकरणाबद्दल जसा आधींच अनादर वाटत आहे तसा तिच्या समजुतीबद्दलहि वाटावयास लागेल.

हें बघ जेन, मिस्तर कॉलीन्स हा लबाड, डामडौली, क्षुद्र अंतःकरणाचा व मूर्ख माणूस आहे; मला तर असें खास वाटतें! आणि तुलाहि पण तसेंच वाटत असलें पाहिजे. आणि जी मुलगी त्याच्याशीं लग्न लावण्यास तयार झाली, तिची बुद्धि तितपतच आहे, असें ह्मणणें भाग आहे. आपली शार्लट ह्मणून कांहीं तूं तिची बाजू धरूं नकोस. एका माणसाकरितां तत्व, कुलीनपणा, अशा शब्दांचे अर्थ पालटण्याचा प्रसंग येऊं देऊं नकोस, आणि आपमतलबीपणा ह्मणजे दूर दृष्टि, भावी संकटाच्या कल्पनेचा अभाव ह्मणजे सुखाचें स्थैर्यत्व असें तूंहि मानूं नकोस व मलाहि मानावयाला लावूं नकोस!

जेन—मला वाटतें, त्या दोघांविषयीं बोलण्यांत ही तुझी भाषा बरीच कडक आहे, याची प्रचिती तुला त्या दोघांनां सुखांत नांदतांना पाहून खास येईल. पण आतां तें राहूंदे. मघाशीं तूं दोन उदाहरणें सांगितलींस. मला तुझा भावार्थ समजला नाहीं, असें समजूं नकोस. पण हें पहा, मी तुला विनवणी करून सांगतें कीं, त्यांनां दोष देण्याचें मनांत आणून व त्यांच्याबद्दल तुझें मत वाईट झालें असें सांगून मला दुःख देऊं नकोस. त्यांनीं जाणूनबुजून आपला अपमान केला, असें आपण समजूं नये. खुल्या दिलाचा तरुण पुरुष सर्व बाजूंनीं सदा दक्ष असतोच, असें मानण्याला कांहीं कारण नाहीं. केव्हां केव्हां तर आपलें मनच आपल्याला फसवीत असतें. बायकांनां कोणीं नुसतें बरें ह्मटलें तरी त्यांनां आपल्या अंगीं सर्वगुणसंपन्नता आहे असें वाटूं लागतें.

एलिझाबेथ—आणि त्यांनां असेंच वाटावें अशी पुरुषहि पण काळजी घेत असतात, नव्हे का?

जेन—पुरुष जर मतलबानें तसें करतील तर त्यांचें तें करणें वाईट होय. पण कांहीं माणसांच्या समजुतीप्रमाणें मला तरी जगांत इतका मतलबीपणा भरला आहे, असें वाटत नाहीं!

एलिझाबेथ—मिस्तर बिंगले यांनीं कोणचीहि गोष्ट मतलबानें केली, असें ह्मणण्यास मी तयार नाहीं; परंतु वाईट करण्याचा हेतु नसूनहि चूक होण्याचा संभव आहे, आणि तिचा परिणाम दुःख हें ठेवलेलेंच! विचाराचा अभाव, दुसऱ्याच्या अन्तःकरणप्रवृत्तीकडे दुर्लक्ष, आणि अनिश्चितपणा यांनीं तसलें कार्य सहजीं होतें.

जेन—आणि तूं मग यांपैकीं कोणच्या कारणामुळें असला प्रकार घडला असें ह्मणणार?

एलिझाबेथ—होय, शेवटल्या कारणानें असें घडलें असें मी ह्मणणार! पण हा विषय येथेंच पुरे! कारण, मी जर पुढें बोलूं लागलें तर तुझें ज्यांच्याविषयीं चांगलें मत आहे अशा माणसांनां दोष द्यावा लागेल, आणि तसें करणें बरें नाहीं.

जेन—तर मग अंजूनहि तुला असेंच वाटतें का, कीं हें सर्व कृत्य त्यांच्या बहिणींचें आहे ?

एलिझाबेथ—होय. त्या दोघी आणि त्यांनां अनुकूल त्यांचा तो स्नेही—

जेन—मला बाई हें खरें वाटत नाहीं! त्यांनीं कां बरें असें वजन खर्च करावें? त्यांनां त्यांच्याच सुखाची काळजी ना? आणि जर त्यांचें प्रेम मजवर असलें तर तें दुसऱ्या स्त्रीवर जाणें शक्य तरी आहे का?

एलिझाबेथ—आधीं तुझी पहिली समजूत चुकीची आहे! मिस्तर बिंगले यांच्या सुखाशिवाय दुसऱ्या पुष्कळ गोष्टींची त्यांनां अपेक्षा असणार. त्याच्या द्रव्यांत भर पडावी, त्याचें वर्चस्व वाढावें, असेंहि त्यांनां वाटत असणार. जिच्याकडून पुष्कळ पैसा मिळण्याचा संभव आहे, जिचे संबंधी मोठे व प्रतिष्ठित आहेत अशा मुलीशीं त्याचा विवाह व्हावा, असेंहि त्यांनां वाटत असणार.

जेन—मिस डी बरो इच्याबरोबर त्यांचें लग्न व्हावें असें त्यांनां वाटत आहे, यांत शंका नाहीं; परंतु त्याचें कारण तूं ह्मणतेस त्याहून दुसरेंच—चांगल्या प्रकारचेंहि असूं शकेल! त्यांची व तिची ओळख माझ्या व त्यांच्या ओळखीपेक्षां फार दिवसांची आहे; परंतु स्वतःची इच्छा कशीहि असली तरी त्यांनीं भावाच्या इच्छेच्या आड येणें कांहीं चांगलें नाहीं; आणि तसें करण्यास विशेष कारण नसेल तर कोणच्या बहिणीला अधिकार आहे? जर त्यांनां मजवर त्यांचें प्रेम आहे असें वाटतें, तर त्यांनीं आह्मांला दूर करण्याचा प्रयत्न करूं नये, आणि जर खरोखर त्यांचें प्रेम मजवर असेल तर त्यांच्या ह्या प्रयत्नास यशहि येणार नाहीं! परंतु अशा शुद्ध प्रेमाचें अस्तित्व कल्पून सर्व माणसांवर तूं दुर्वर्तनाचा दोष लादीत आहेस, व मला दुःख देत आहेस! पण अशी कल्पना गृहीत धरून चालूं नकोस, ह्मणजे मला दुःख होणार नाहीं. आपल्या हातून चूक झाली याचें मला इतकें वाईट वाटत नाहीं. निदान त्यांनां अगर त्यांच्या बहिणींनां वाईट ह्मटल्यानें जें दुःख मला होईल त्यापेक्षां तें कांहींच नाहीं! मी तरी याचा याच दृष्टीनेंच विचार करितें, व इतरांनींहि तसाच विचार करावा, अशी माझी इच्छा आहे.

एलिझाबेथ—अशा सदिच्छेच्या आड कोण येणार ? पण कायग जेन, आपल्या मामी येथें आल्या आहेत त्यांच्या मनांत तुला आपल्याबरोबर लंडनला न्यावयाचें आहे. मलाहि पण वाटतें कीं, तूं तेथें गेल्यानें तुझ्या मनाला थोडा विरंगुळा होईल. मामींनीं मलाच विचारण्याला सांगितलें, ह्मणून विचारतें.

जेन—बरें आहे. मलाहि कोठें तरी बाहेर कांहीं दिवस जावेंसें वाटत आहे.

एलिझाबेथ—तुझ्या ह्या रुकारानें मामींनां फार आनंद होईल. तुह्मी गेल्या नंतर कांहीं दिवसांनीं मलाहि पण शार्लटचे बोलावण्याप्रमाणें हन्सफर्डशायरमध्यें जावें लागणार आहे. जातांना वाटेंत लंडनला तुझी गांठ पडेलच. चल तर आपण आतां मामींकडे जाऊन त्यांना हा बेत कळवूं.

[जातात.

प्रवेश तिसरा.

[**स्थळ**—रोझिंग पार्क. मिस्तर डारसी प्रवेश करितो.]

मिस्तर डारसी—(स्वगत) एलिझाबेथ बेनेट येथें भेटेल अशी कल्पना तरी मी इकडे आलों तेव्हां होती का ? मुळींच नाहीं ! पण येथें येतांच एलिझाबेथ इकडे आली असल्याची बातमी प्रथम मावशीचे तोंडूनच ऐकिली. तिची व माझी पूर्वीची ओळख असल्याचें तिला त्यावेळीं ठाऊक नव्हतें; परंतु आतां तिला समजून चुकलेंच असेल–आणि समजलें ह्मणून त्यांत विशेष काय आहे ? काय मौज आहे पहा ! खुद्द मलाच जेथें ह्या माझ्या मनाच्या ओढ्याबद्दल कसेंसेंच वाटत आहे, तेथें अशा तऱ्हेची भावना माझ्या मनांत या मुलीविषयीं असेल असें माझ्या संबंधी माणसांनां वाटावें तरी कसें ! तसा संशय त्यांनां येणें शक्य तरी आहे काय ? तें कसें कां असेना, ती माझें मन आकर्षून घेत आहे, यांत कांहीं शंका नाहीं ! ती येथें आली आहे असें समजतांच मी आपण होऊन कर्नल-फिटस् विल्यमला बरोबर घेऊन मिस्तर कॉलीन्सबरोबर तिला भेटण्याला गेलों. भेट झाली, पण काय–सर्वसाधारण चौकशी करण्याशिवाय जास्त कांहीं बोलण्याचें धैर्य त्यावेळीं झालें नाहीं. पण त्या थोडक्याच बोलण्यांत तिच्या त्या जेनसंबंधी केलेल्या चौकशींत दिसून येणाऱ्या चाणाक्षपणामुळें तर माझें मन अगदीं वेडावून गेलें ! तिच्या त्या मार्मिक प्रश्नाला सयुक्तिक असें शांत वृत्तीनें उत्तरच देतां येईना. आज ईस्टरचा दिवस आहे. मिस्तर कॉलीन्सबरोबर तीहि

आज आमच्या येथें मावशीकडे येणार आहे असें आतांच मला समजलें. पण ही गोष्ट समजल्यामुळें माझ्या मनाची काय स्थिति झाली आहे हें माझें मलाच समजत नाहीं. असो, पुढें काय होतें तें पहावें.

[जातो.

प्रवेश चवथा.

[**स्थळ**—तेंच. दुसरा एक दिवाणखाना. कर्नल फिट्झ् विल्यम व एलिझाबेथ प्रवेश करितात.]

कर्नल फिट्झ् विल्यम—मिस बेनेट, तूं आह्मांला पेटी वाजून दाखविण्याचें कबूल केलें आहेस, तेव्हां आतां होऊंदेना सुरुवात. ती पहा पेटी, सुरुवात कर. डारसी येईल इतक्यांत.

एलिझाबेथ—बरें तर. (पेटी वाजवूं लागते. इतक्यांत डारसी प्रवेश करितो, व एलिझाबेथकडे टक लावून पहात बसतो.) मिस्तर डारसी ! अशा रीतीनें माझ्याकडे पहात ऐकत बसण्यांत तुमचा एकच हेतु दिसतो. तो कोणचा ह्मणाल तर मला घाबरविण्याचा ! तुह्मीं आपल्या मावशीजवळ आतांच सांगितलेंत नाहीं का, कीं तुमची बहीण पेटी फार चांगली वाजविते ह्मणून ! जरी तसें असलें, तरी तेवढ्यानें ह्मणजे मी तुमच्यासमोर पेटी वाजविण्याला घाबरून जाईन, अशांतला कांहीं प्रकार नाहीं. दुसऱ्यांची इच्छा तशी असली तरी न घाबरण्याइतकी धिटाई माझ्या अंगीं आहे. माझी घाबरगुंडी उडावी ह्मणून जों जों प्रयत्न केला जातो, तों तों माझें धैर्य वाढतच जातें !

मिस्तर डारसी—तुझें ह्मणणें चुकीचें आहे असें मी तरी ह्मणणार नाहीं. कारण, जाणूनबुजून तूं भेदरून जावीस अशा वाईट हेतूनें मी येथें बसलों आहें असा संशय तूं माझ्याविषयीं घेशील असें मला वाटत नाहीं. आणि सुदैवानें मला तुझ्या स्वभावाची चांगलीच माहिति झाली आहे. जीं मतें स्वत:चीं नाहींत, तीं आपली ह्मणून सांगण्यांत तुला नेहमींच आनंद होत असतो !

एलिझाबेथ—कर्नल फिट्झ् विल्यम, तुमचा मावसभाऊ माझ्याविषयीं तुह्मांला चांगलीच माहिती देईल ! आणि मी जें जें ह्मणून सांगेन त्यांतील एक अक्षरसुद्धां खरें मानूं नका, ह्मणून तुमची खात्री करील, असें दिसतें. हें पहा,

ज्या प्रांतांत जरा प्रौढीनें वागतां येईल असें मला वाटत होतें त्या ठिकाणीं माझा खरा स्वभाव उघड करून दाखविणारा इसम असलेला पाहून मला तर कसेंसेंच वाटूं लागलें आहे. मिस्तर डारसी ! मनापासून बोलावयाचें तर तुह्मी हर्टफर्डशायरमध्यें माझ्या प्रतिकूल अशा ज्या ज्या गोष्टी ऐकिल्या असतील, त्या त्या येथें सांगत सुटणें कांहीं बरें नाहीं. कारण, तुह्मीं तसें केल्यास मलाहि पण 'जशास तसें' ह्मणून कांहीं कांहीं गोष्टी सांगाव्या लागतील, आणि त्या ऐकून तुमच्या नातेवाईकांच्या अंगावर शहारेच उभे रहातील !

मिस्तर डारसी—(हंसत) हं ! मला तुझी भीति मुळींच वाटत नाहीं !

कर्नल फिट्झ् विल्यम—हें पहा, तुला जें जें कांहीं याच्याविषयीं ठाऊक असेल तें तें सर्व सांग पाहूं. मला तरी ही स्वारी तिऱ्हाईत माणसांबरोबर कशी काय वागते हें कळून घ्यावयाचें आहे !

एलिझाबेथ—बरें तर, माझी कांहीं ना नाहीं. परंतु मी जें कांहीं सांगणार तें फारच चमत्कारिक आहे, असें तुम्हाला वाटल्यावांचून राहणार नाहीं, हें मात्र ध्यानांत असूं द्या. हें पहा, हर्टफर्डशायरमध्यें असतांना यांची व माझी प्रथम ओळख बॉलच्या दिवशीं झाली. त्या बॉलच्या वेळीं यांनीं काय केलें, समजलें का ? या गृहस्थांनीं फक्त चार वेळां नृत्य केलें. या हकीगतीवरून आपल्याला वाईट वाटेल, पण इलाज नाहीं. पुरुष जरी कमी होते तरी ही स्वारी चार वेळच नृत्यास गेली. आणि मला पक्केपणीं आठवतें कीं, एक तरुण मुलगी तर जोडीदार नाहीं म्हणून स्वस्थ बसलेली होती. मिस्टर डारसी, मी जें कांहीं सांगत आहें तें खरें नाहीं असें कांहीं तुमच्यानें म्हणवणार नाहीं !

मिस्तर डारसी—माझ्या स्नेही मंडळीशिवाय तेथें जमलेल्या मंडळींतील दुसऱ्या स्त्रीची व माझी ओळख नव्हती.

एलिझाबेथ—होय, अगदीं खरें ! आणि बॉलरूममध्यें का कोठें ओळख करून घेण्याची संधी असते ! आणि ओळख करून देऊं का म्हणून विनंति केली होती तें कुणीकडेच गेलें ! कर्नल फिटझ् विल्यम, आतां मी काय वाजवूं ? तुमच्या सूचनेची मी वाट पहात आहें.

मिस्तर डारसी—कदाचित् मीं होऊन ओळख करून घेतली असती, अगर ओळख करून घेण्याची आलेली संधि दवडली नसती, तर जास्त चांगलें झालें असतें; परंतु तशा प्रकारची हौस माझ्या अंगीं नाहीं.

एलिझाबेथ–कर्नल फिटझ् विल्यम, आपल्या मावसभावाला असें कां वाटतें तें ते सांगतील का ? जगाचा अनुभव ज्याला आहे, जो जात्याच हुषार असून सुशिक्षित आहे, अशा इसमाला आपण होऊन दुसऱ्याची ओळख करून घेण्याचें कां बरें अवघड वाटावें ?

कर्नल फिट्झ् विल्यम–या प्रश्नाचें उत्तर त्याला न विचारतां मला देतां येईल. कारण, तसें करण्याची दगदग कोण करतो, असेंच याला वाटत असावें.

मिस्तर डारसी—खरेंच, कांहीं इसमांत दिसून येतें त्याप्रमाणें अगदीं अनोळखी असलेल्या तिऱ्हाईत इसमाशीं खुशालपणें बोलत बसण्याची वकूब माझ्या अंगांत खास नाहीं. अशा तिऱ्हाइत इसमांच्या बोलण्यांत मिसळून संभाषण चालू ठेवणें, त्यांच्या हिताहिताच्या गोष्टींची आपल्याला आस्था वाटत आहे असें दाखविणें पुष्कळ लोकांनां साधतें, परंतु तसें मला साधत नाहीं हें खास !

एलिझाबेथ—इतर ज्या चांगल्या वाजविणाऱ्या बायका आहेत त्यांच्या प्रमाणें मला हत्यार वाजवितां येत नाहीं. माझा हात तितका वहात नाही, हें जरी खरें आहे, तरी पण तो एक आपल्यांतील दोष आहे अशीच माझी समजूत आहे. आणि त्याचें कारणहि उघड आहे. मला वाजविण्याचा सराव नाहीं, व तसें करण्याविषयी स्वतःची अनास्था ! माझ्या हातांत अगर बोटांत कांहीं कमीपणा आहे, अशांतला कांहीं प्रकार नाहीं.

मिस्तर डारसी–(स्वगत) टोमणा मारावा तर असा ! याचें नांव अन्योक्ति ! (उघड) हें पहा, तुझें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. तूं आपला काळ फार चांगल्या रीतीनें घालविला आहेस. ज्याला ज्याला ह्मणून तुझें वाजविणें ऐकण्याचा प्रसंग येईल, त्याला त्याला त्यांत कांहीं कमीपणा असल्याचें वाटणार नाहीं. आपल्या दोघांचा स्वभावच असा आहे कीं, आपण दुसऱ्याकरितां ह्मणून कांहींच करण्याचें मनांत आणीत नाहीं.

कर्नल फिट्झ् विल्यम—अरे, पण मावशी तिकडे आपली वाट पहात असतील ! चला तर तिकडे.

[मिस एलिझाबेथ व कर्नल जातात.

मिस्तर डारसी–(स्वगत) इच्या प्रत्येक बोलण्यांत दिसून येणाऱ्या हुषारीनें मला तर असें वाटूं लागलें आहे कीं, बायको असावी तर अशीच असावी ! आतां इच्या स्वतःच्या हुषारीपलीकडे व सौंदर्यापलीकडे मात्र पाहण्याची सोय

नाहीं. हिचे नातेवाईक, हिच्या घरची मंडळी, त्यांचें तें एकंदरींतलें वर्तन, त्यांचें बोलणें, विशेषतः हिच्या आईचें बोलणें वगैरे गोष्टी मनांत आल्या व आपल्या स्वतःच्या योग्यतेचा विचार केला कीं, मन पुन्हां घोंटाळूं लागतें. तरी पण हे अडथळे तिच्या असाधारण बुद्धिमत्तेकडे पाहून कांहींच नाहींत, असें वाटूं लागतें.

[जातो.

प्रवेश पांचवा.

[**स्थळ**—हन्सफर्डशायर. पार्सनेस. मिसेस कॉलीन्स व एलिझाबेथ प्रवेश करितात.]

मिसेस कॉलीन्स—मग काय एलिझा, तूं रोझिंगफर्कला नाहीं येत तर ? लेडी कॅथेराईन यांनां जरा चमत्कारिक वाटेल.

एलिझाबेथ—अग, तुझ्या त्या लेडीसाहेबांनां कसें कां वाटेना ! आज माझी प्रकृति चांगली नाहीं; कपाळ फार दुखत आहे. मला तेथें गेल्यानें मनाला बरें वाटण्याऐवजीं त्रास मात्र होईल.

मिसेस कॉलीन्स—खरें ह्मणशील तर तुझें तें लेडी साहेबांबरोबर पहिल्याच भेटीला झालेलें भाषण मला फार आवडलें. आजपर्यंत त्यांनां तुझ्यासारखा स्पष्टवक्ता आढळून आलाच नव्हता. या बड्या लोकांना असें वाटत असतें कीं, शहाणपणाचा गड्डा काय तो आपल्यापाशींच आहे ! बरें पण कायग, आज तुझें कपाळ दुखायाला काय झालें ?

एलिझाबेथ—कांहीं नाहीं. एरवींच दुखत आहे.

मिसेस कॉलीन्स—अग, असें उडवाउडवीचें उत्तर कां देतेस ! कारण सांगच असा कांहीं माझा आग्रह नाहीं; आणि तूं तरी एकदां मनांत नसल्यावर सांगणार आहेस थोडीच ! तरी पण आज तुझी चित्तवृत्ति बावरल्यासारखी दिसत आहे. मनाला त्रास उत्पन्न होण्यासारखें कांहीं विशेष घडल्याशिवाय तुझ्या आनंदी वृतींत असा फरक दिसून येणार नाहीं. थोडें औषध घेऊन स्वस्थ चित्तानें विश्रांति घे. ह्मणजे तुला बरें वाटेल. मी जातें बरें का.

एलिझाबेथ—जा बरें.

[मिसेस कॉलीन्स जाते.

एलिझाबेथ—(स्वगत) किती झालें तरी चाणाक्ष ती चाणाक्ष. माझ्या आजाराचें खरें कारण तिनें केवळ अजमासानें पण तेव्हांच ताडिलें. माझ्या मनाला जो

त्रास झाला आहे त्याचें कारण या बिचारीला कसें कळणार ? ज्यानें त्याची हकीगत मला सांगितली त्या खुद्द कर्नल फिट्झ् विल्यमला तरी काय कल्पना होणार ! नांव गांव न घेतां मोघम शब्दांत त्याला कळलेली हकीगत त्यानें मला सांगितली. पण त्यानें माझ्या अन्तःकरणांत केवढा क्षोभ उडाला आहे ! डारसीनें ह्मणे आपल्या एका स्नेह्यास मोठ्या संकटांतून वांचविला. आणि तें संकट कोणचें, तर अप्रयोजक असा भावी शरीरसंबंध. ज्या मुलीवर त्याच्या स्नेह्याचें मन गेलें होतें, त्या मुलीच्या बाबतींत फार विलक्षण अशा हरकती होत्या. त्यामुळें त्याच्या लग्नांत डारसीनें फांदाडा घातला, असें कर्नल फिट्झ् विल्यम सांगत होते. अर्थात् , हा त्याचा स्नेही व त्याची ती प्रियतमा दुसरी कोण असणार ? माझी लाडकी जेन हीच ती स्त्री असली पाहिजे. पण यांत संशय तरी कशाला ? कर्नल फिट्झ् विल्यम ह्याचाहि तर्क तसाच आहे. कारण तो डारसीचा स्नेही ह्मणजे मिस्तर बिंगले असावा, असें अनुमान असल्याचें त्यानेंच सागितलें. हाय ! हाय !! माझ्यावर इतका दुःखाचा डोंगर कोसळण्याचें मुख्य कारण इतके दिवस मला मिस् बिंगले वाटत होती, पण आतां समजलेल्या हकीगतीवरून हें सर्व कृत्य डारसीचेंच आहे, असें दिसतें. या डारसीचा मला फारच राग आला आहे. केवळ आपल्या स्वतःच्या समजुतीवरून दुसऱ्याच्या–मग तो स्नेही असला ह्मणून काय झालें–जन्माच्या सुखामध्यें फांदाडा घालण्याचें धाडस यानें कां करावें ? पण याचा स्वभावच तसा ! दुसऱ्याच्या अन्तःकरणवृत्तीचा विचार त्याच्या डोक्यांतच येत नसावा. पण याची येथें आल्यापासूनची वागणूक पहावी तर जरा चमत्कारिकच वाटते. माझ्या आवडत्या रस्त्यानेंच फिरावयाला जाणें, एकदांदोनदां सुचविलें असतांहि त्याच रस्त्यांत गांठ पडणें, एका खेपेला तर मजबरोबर बिऱ्हाडापर्यंत बोलतचालत येणें, यांत काय याचा हेतु आहे, समजत नाहीं. सहज ह्मणावें, तर तसें दिसत नाहीं ! कारण, एकदां सुचविल्यावर पुनः त्याच रस्त्यावर गांठ कशी पडावी ? परवांच्या त्या बोलण्यानें तर मला अगदीं कसेंसेंच होऊन गेलें ! काय ह्मणे 'तुला तरी घरचा विशेष ओढा असेल असें दिसत नाही. तूं नेहमींच लाँगबोर्नमध्यें असशील असें नाहीं.' माणसांनीं या अशा अस्पष्ट वाक्यांचा अर्थ तरी काय करावा ? गरीब बिचारी शार्लट ! तिला वाटतें की, हें सर्व तो माझ्या विषयींच्या प्रेमामुळेंच करीत आहे. तिनें ह्याप्रमाणें मजजवळ एकदां बोलूनसुद्धां दाखविलें. पण मला तें स्वप्नवतच वाटलें. ह्मणून मीं तें सर्व केवळ

थट्टेवर नेलें. माझ्याविषयीं त्याचें वर्तन कसें का असेना ? जेनच्या सुखाच्या आड येण्याला तोच सर्वस्वी कारण आहे, आतां यांत काडीइतका संशय राहिला नाही–व त्यामुळें तर त्याचा मला इतका संताप आला आहे ! हें कर्नलचें व माझें बोलणें झाल्यावर पुनः एकदां जेनचीं सर्व पत्रें मीं वाचून पाहिलीं, आणि काय चमत्कार ! एकदम अन्तःकरणांत प्रकाश पडल्यासारखें झालें. तिच्या प्रत्येक पत्रांत–नव्हे प्रत्येक वाक्यांत–तिच्या अन्तःकरणांत झोंबत असलेल्या दुःखाची छटा दिसून येते. असो. आतां लौकरच तिची लॉंगबोर्नला जातांना वाटेंत लंडनमध्यें गांठ पडणार, हें एक बरेंच आहे, डारसीहि पण एकदोन दिवसांनीं येथून जाणार, हेंहि एका अर्थीं चांगलेंच. पण कर्नल फिट्झ् विल्यम हेहि त्याच्याबरोबर जाणार—अरे पण असें काय भलतेंच मी मनांत आणितें ? त्यांनीं एकदां स्पष्टच सांगितलें होतें नाहीं का, कीं अर्लच्या धाकट्या मुलांनां लग्नाचा विचार करितांना मुलीकडून येणाऱ्या द्रव्यावर नजर दिल्याशिवाय त्यांचें चालत नाहीं ! वेडी तर नाहींना मी–भलतासलता विचार मनांत तरी कशाला आणावयाचा ? (ऐकलेंसें करून) अरे, पण दरवाज्याची घंटा कां वाजली ? कोणी तरी आलें असावें. बहुतकरून कर्नल फिट्झ् विल्यम माझी चौकशी करण्याकरितां आले असावेत. (पाहून) अगबाई ! हे तर डारसी !

(डारसी प्रवेश करितो.)

मिस्तर डारसी—आतां कसें काय वाटत आहे ? तुझी प्रकृति बिघडल्याचें ऐकल्यावरून मुद्दाम चौकशीसाठीं आलों.

एलिझाबेथ—मला काय झालें आहे ? बरेंच आहे.

मिस्तर डारसी—(स्वगत) आतां मी जें कांहीं हिला सांगणार त्यानंतर ही असें रोखठोक उत्तर देईल काय ?–करावाच तर धीर आतां. (असें म्हणून विचार करीत इकडे तिकडे चालूं लागतो.)

एलिझाबेथ—(स्वगत) हें वर्तन आश्चर्य करण्यासारखेंच आहे. स्वारीच्या मनांत कांहीं नाजुक विचार चालले असावेत.

मिस्तर डारसी–व्यर्थ आजपर्यंत मीं धडपड केली. तें कांहीं चालत नाहीं. माझ्या अन्तःकरणवृत्तीचा ओढा फिरविणें शक्य नाहीं ! हें पहा मिस् बेनेट, काय सांगूं तुला, तुझ्याविषयीं माझ्या अन्तःकरणांत अत्यंत प्रेम वसत आहे, आणि म्हणून—कां, अशी संशयित मुद्रेनें निरखून कां पहातेस तूं माझ्याकडे ?

तुला आश्चर्य वाटेल यांत नवल नाहीं; उलट तें साहजिकच आहे. काय सांगूं, तुझ्याविषयींचें हें प्रेम आणि माझी मनोवृत्ति यांचें सारखें भांडण चालू होतें, ह्मटलें तरी चालेल ! माझा दरजा केवढा मोठा, तूं किती हलक्या कुळांतली, अशा मुलीबरोबर मीं लग्न लावणें ह्मणजे आपला किती कमीपणा करून घेणें आहे, हा विचार किती दिवस तरी मला त्रास देत होता. मनाचा कल तुझ्याकडे, पण विचार त्याच्या उलट, असा प्रकार सारखा चालूच होता. खरें ह्मटलें तर माझी इच्छा तुझ्यावर माझें मन जावें अशी नव्हती; माझी विचारशक्तिहि तसें सांगत नव्हती, व माझ्या स्वभावालाहि तें रुचत नव्हतें.तरी पण मन आंवरेना, व नाइलाज ह्मणून तुझ्यावर प्रेम करणें भाग पडलें. तेव्हां माझा तूं स्वीकार कर एवढेंच आतां सांगणें आहे.

एलिझाबेथ—(स्वगत) केवढें आश्चर्य हें ! माझ्यावर आणि यांचें प्रेम ! पण दुःखाची गोष्ट येवढीच आहे कीं, आतां मी जें उत्तर देणार त्यानें यांच्या चेहऱ्यावरून यांनां जी खात्री वाटत आहे असें दिसतें ती फुकट जाणार आहे, व निराश होऊन यांनां परत जावें लागणार आहे ! (उघड) सर्वसाधारण नियमाप्रमाणें अशा प्रकारच्या मनोदयाबद्दल आभार मानावयाचे असतात; मग त्या मनोदयाला अनुकूल असें प्रत्युत्तर मिळो वा न मिळो. आभार वाटणें अगदीं नैसर्गिक आहे; पण जर मला याबद्दल कृतज्ञता वाटती तर मजवर आपण अनुग्रह केला असेंच मीं ह्मटलें असतें ! परंतु मला तसें ह्मणवत नाहीं ! तुमच्याकडून चांगुलपणा मला मिळावा अशी इच्छा मीं कधींच मनांत धरली नव्हती. आणि ह्मटलें तर तुह्मीसुद्धां मोठ्या नाखुषीनेंच खरें मजवर प्रेम करीत आहां. माझ्यामुळें कोणालाहि दुःख झाल्यानें मला वाईट वाटणार आहे; परंतु हें दुःख देणें बुद्धिपुरःसर झालेलें नाहीं, येवढीच समाधानाची गोष्ट आहे, व अशा वाईट वाटण्याचा परिणामहि फार दिवस राहणार नाही, अशी मला आशा आहे. ज्या विचारांनीं आतांच तुह्मीं सांगितलें कीं, माझ्याविषयींच्या तुमच्या मनांतील प्रेमाचा स्फोट करण्याला इतकी अडचण पडली, तेच विचार, माझ्या या उत्तरानें, तें असलेलें प्रेम लौकरच जाळून टाकतील, यांत मला संशय वाटत नाही !

मिस्तर डारसी—(स्वगत) काय ! मला आणखी हें असलें उत्तर, आणि तें या पोरीकडून ? केवढें आश्चर्य !! संतापानें माझें डोकें भणाणून जाईल असें

मला वाटत आहे! पण असें करून उपयोगी नाहीं. शांत डोकें ठेवूनच बोललें पाहिजे. (उघड) आणि हेंच का उत्तर शेवटीं आह्माला मिळावयाचें? माझी मागणी नाकारितांना थोडी सुद्धां शालीनता दाखविण्याचा प्रयत्न झाला नाहीं, तो कां, हें समजलें तर बरें होईल. पण आतां समजणें आणि न समजणें यांत कांहीं महत्त्व राहिलें नाहींच!

एलिझाबेथ—मलाहि पण असें विचारतां येईल, कीं, मला अपमान वाटावा व राग यावा अशाच हेतूंनीं आपण आपल्या स्वतःच्या इच्छेविरुद्ध, विचारशक्तीविरुद्ध, आणि स्वभाच्याहि विरुद्ध जाऊन मजवर प्रेम करूं लागलों असें जें मला सांगितलेंत, तें कां? जर मीं उत्तर देण्यांत शालीनता खरोखरच सोडली असेल, तर तसें करण्याला वरील कारण काय थोडें आहे? पण माझ्या मनाला लागणाऱ्या अशा दुसऱ्याहि पुष्कळ गोष्टी आहेत, आणि त्या तुह्माला ठाऊकहि आहेत. जरी माझें तुमच्याविषयींचें मत पूर्वीच बनलेलें नसतें, माझें मन त्या बाबतींत अगदीं उदासीन नसतें, अथवा तें आपल्याला अगदीं अनुकूल असतें, तरीहि ज्या माणसाच्यायोगानें आपल्या आवडत्या बहिणीच्या सुखांत कदाचित् निरंतरची देखील माती पडली, त्या माणसाशीं लग्न करण्यास मी तयार होईन, असें तुह्माला वाटलें तरी कसें? तुमच्याविषयीं वाईट मत होण्याला कारणच तसें आहे. त्या दोघांच्या सुखाच्या आड येण्यांत तुह्मीं जी अनुदारता दाखविलीत, व जो अन्याय केलात, त्याचें समर्थन कशानेंहि करितां येणार नाहीं! त्यांची परस्परांपासून ताटातूट करण्यास सर्वतोपरी नसलें तरी मुख्यत्वेंकरून तुह्मीच कारण झालां, ही गोष्ट तुह्माला नाकबूल करितां यावयाची नाहीं. या कृत्यानें एकाला लहरी व अनिश्चित स्वभावाचा ह्मणून जगाच्या निंदेला पात्र करून सोडलेंत, व एकाला आशाभंगानें उत्पन्न झालेल्या निराशेमुळें जगाकडून हंसें करून घ्यावयाला लाविलेंत. आणि दोघांनांहि अति दुःखांत लोटून दिलेंत. पण तुमच्याकडे पहावें, तों तुह्माला त्यांत कांहींच वाईट वाटत नाहीं, असें दिसतें. उलट, सर्व हंसण्यावारीच नेत आहांत. तुमच्या हातूनच ही गोष्ट घडली हें तुमच्यानें नाकबूल करितां येईल काय?

मिस्तर डारसी—तुझ्या बहिणीची व माझ्या स्नेह्याची ताटातूट करण्यांत माझ्या हातून झाली ती खटपट मीं केली, व त्यांत मला यश आलेलें पाहून आनंदहि

झाला, या गोष्टी नाकबूल करण्याची माझी इच्छा नाहीं. माझ्या स्वतःच्यापेक्षां त्याची मीं जास्त काळजी घेतली, असें मला वाटत आहे!

एलिझाबेथ—पण येवढ्या गोष्टींमुळेंच माझें मन विटलें, असें नाहीं. माझें तुमच्याविषयीं मन विटण्यापूर्वींच तुमच्यासंबंधीं माझें मत ठाम झालें होतें. मिस्तर विखम यांनीं जी हकीकत कांहीं दिवसांपूर्वी मला सांगितली, त्यानें तुमचा स्वभाव कसा काय आहे हें कळून आलें. त्याच्याबद्दल तुह्माला काय ह्मणावयाचें आहे? या बाबतींत कोणच्या काल्पनिक स्नेहाकरितां ह्मणून तुह्मीं आपल्या कृत्याचें समर्थन करणार? अगर कोणच्या थापा मारून तुह्मीं त्याच्याशीं जें वर्तन केलेंत त्याबद्दल जगाकडून चांगलें ह्मणवून घेणार?

मिस्तर डारसी—या गृहस्थाच्या बाबतींत बरीच आस्था तुह्माला वाटत आहे असें दिसतें. (स्वगत) काय चमत्कार आहे हा! काय पूर्वीचा ऋणानुबंध असेल तो असो; पण ज्याचें नांवहि ऐकण्याची इच्छा नाहीं त्याचा विषय आपला जेथें तेथें आहेच!

एलिझाबेथ—ज्याला ज्याला ह्मणून त्याच्या दुर्दैवाची कहाणी कळली आहे त्याला त्याला मिळून त्याच्याबद्दल आस्था वाटणें साहजिक आहे.

मिस्तर डारसी—(तिरस्कारानें) त्याच्या दुर्दैवाची कहाणी! मोठेंच दुर्दैव ह्मणावयाचें!!

एलिझाबेथ—आणि तेंहि तुमच्यामुळेंच अनुभवास आलें. त्याला या विपन्न स्थितीला पोहोंचविण्याला कारण तुह्मीच! त्याच्याकरितां ह्मणून राखून ठेविलेल्या कायद्याच्या बाबी तुमच्या हातून मिळवून देण्याच्या असतां तुह्मीं त्याला त्या दिल्या नाहींत. भर तारुण्यांत पारतंत्र्य गळ्यांत न बसतां सुखासमाधानानें राहण्याची जी हक्काची संधि त्याला मिळाली असती ती तुह्मीं दवडिलीत, आणि हें सर्व आपण करूनसवरून पुनः त्याच्या दुःखाच्या कहाणीबद्दल असा तिरस्कार आणि चेष्टा करण्यास तुह्माला दिक्कत वाटत नाहीं!

मिस्तर डारसी—आणि हेंच का माझ्याविषयींचें तुमचें मत. तुह्मी तें इतक्या स्पष्टपणानें सांगितलेंत याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. या दृष्टीनें पाहिलें तर माझे अपराध फार मोठे आहेत, यांत कांहीं शंका नाहीं. परंतु जर मीं तुमच्या प्रेमाविषयीं मनाचा धडा करण्यापूर्वी जी माझ्या मनाची चलबिचल चालली होती त्याची प्रामाणिकपणानें कबुली दिली ती दिली नसती तर

हे अपराध पोटांतहि घातले गेले असते. परंतु माझ्या हातून जी चूक झाली ती हीच कीं, वरील कबूलजाब मीं दिला व त्याच्यायोगानें तुमच्या मानीपणाला जबर धक्का बसला. कदाचित् तुह्मी या गोष्टींचा उल्लेखहि करतां ना. पण मीं मात्र धूर्तता राखून माझें मन तुमच्याकडे वळलें तें बरेंवाईटपणाबद्दल विचारहि डोक्यांत न येतां वळलें असें सांगून तुह्माला खुलवावयाला पाहिजे होतें. परंतु कोणत्याहि प्रकारचें छद्म मला मनापासून आवडत नाहीं, आणि माझ्या मनाची जी स्थिति मीं वर्णन केली त्याबद्दल मला वाईटहि वाटत नाहीं! तसले विचार मनांत येणें अगदीं साहजिक व न्याय्य होतें. तुमच्या जातकुळीबद्दल मला आनंद वाटावा असें का तुह्माला वाटतें? ज्यांचा दर्जा माझ्या दर्जापेक्षां कितीतरी कमी आहे अशा माणसांचा व माझा संबंध जुळणार ह्मणून मीं आपणाला धन्य मानून घ्यावें असें का तुह्माला वाटतें?

एलिझाबेथ—यांत आपली थोडी गैरसमजूत होत आहे, असें दिसतें. तुह्माला असें का वाटतें कीं, तुमच्या भाषणाच्या पद्धतीमुळें मीं तुमची मागणी नाकारिली? या प्रसंगीं जर तुह्मीं सभ्य गृहस्थासारखी वर्तणूक ठेविली असती तर तुमचें ह्मणणें नाकारतांना माझें मन मला खाऊं लागलें असतें, इतकेंच; परंतु तुमच्या भाषणानें तें वांचलें, एवढाच काय तो फरक झाला. ज्या योगानें तुमचें ह्मणणें मला मान्य करण्याचा मोह पडला असता, अशा प्रकारें मागणी करणें तुमच्या हातून घडतेंचना–मी काय ह्मणत्यें तें समजलें ना? तुमची व माझी ओळख झाली त्यावेळेपासून–नव्हे त्या क्षणापासून ह्मटलें तरी चालेल–तुमच्या अंगांतील तो अहंकार, ती स्वतःविषयींची घमेंड, आणि दुसऱ्याच्या अन्तःकरणवृत्ती-विषयींचा आपस्वार्थी तिरःस्कार, यांच्यायोगानें तुमच्याविषयीं माझें मत चांगलें झालें नाहीं. आणि पुढें ज्या गोष्टी घडल्या त्यामुळें तर तुमचा मला वीट आला. आणि आपल्या ओळखीला एक महिनाहि झाला नाहीं तोंच मला असें वाटलें कीं, तुमच्या व्यतिरिक्त जगांत दुसऱ्या कोणत्याहि गृहस्थाशीं लग्न लाविण्याबद्दल माझें मन कदाचित् वळवितां येणें शक्य होईल!

मिस्तर डारसी—बाईसाहेब, पुष्कळ बोललां! तुमच्या मनोविकाराबद्दल पूर्ण कल्पना मला आतां झाली, आणि माझ्याच मनोविकाराबद्दल मला वाईट वाटत आहे. तुमचा इतका वेळ घेतला, याबद्दल क्षमा करा. शेवटीं तुमच्या आरोग्याची आणि सुखाची वृद्धि होवो इतकीच इच्छा प्रदर्शित करून मी आपली रजा घेतों.

[डारसी जातो.

एलिझाबेथ—(स्वगत) काय, मी हें पहात आहें तरी काय ? किती शोकजनक ही स्थिति ! या शोकक्षोभामुळें मन आवरून धरवत नाहीं. घटकाभर मन हलकें करून घेतलेंच पाहिजे. काय हा विलक्षण प्रसंग ! डारसीनें माझ्याशीं लग्न करण्याची इच्छा दर्शविली ! आज इतके महिने माझ्याविषयीं त्याच्या मनांत प्रेम वसत असावें–आणि त्या प्रेमाचा जोरसुद्धां इतका मोठा कीं, ज्या गोष्टी जेन व बिंगले यांच्या लग्नाच्या बाबतींत अडचणीच्या भासल्या त्या तशा असतांहि स्वतःच्या बाबतींत त्यानें दूर लोटून दिल्या !! या गोष्टी मनांत आल्या म्हणजे कांहीं सुचत नाहींसें होतें. अज्ञात रीतीनें कां होईना, परंतु एवढ्या मोठ्या गृहस्थाच्या अन्तःकरणांत माझ्याविषयीं प्रेमोद्भव झाला, यामुळें मला कां बरें कौतुक वाटूं नये ! पण–पण त्याचा तो गर्व–तो निरंकुश गर्व–त्याचे तें जेनच्या बाबतींतील निंद्य वर्तन, विखमच्या दुःखद स्थितीस स्वतः कारण होऊनहि त्याचें नुसतें नांव निघतांच यानें दाखविलेला तिरस्कार ! अशा स्थितींत त्याचें म्हणणें मीं नाकारिल्यामुळें त्याला झालेल्या दुःखाबद्दल माझ्या मनांत दयेचा पाझर आला तरी तो तत्क्षणींच नाहींसा झाला हें साहजिक आहे ! हर ! हर ! असा प्रसंग कोणावरहि येऊं नये. (ऐकलेंसें करून) अरे, शार्लट आली वाटतें ! गाडीचा आवाज ऐकूं येत आहे. अशा शोकक्षोभस्थितींत तिची गांठ पडणें ठीक नाहीं. तर आपल्या खोलींत जाऊन मन मोकळें करून घेऊं.

[जाते.

प्रवेश सहावा.

[**स्थळ**—पार्सनेजजवळील आंबराई. मिस्तर डारसी प्रवेश करितो.]

मिस्तर डारसी—एलिझाबेथ बेनेट नेहमीं याच आंबराईंत फिरावयाला येत असते. तिची गांठ पडावी व तिला हें पत्र द्यावें एवढ्याचकरितां मी येथें तिची वाट पहात बसलों आहें. आतांची ही वेळ तरी किती शांत आहे. वनश्री तरी किती नामी दिसत आहे. या वनश्रीकडे पाहून मन कसें प्रफुल्लित होत आहे ! अरे, पण हें कोण इकडे येत आहे ? एलिझाबेथ बेनेट वाटतें. अरे होय, तीच !

(एलिझाबेथ प्रवेश करिते.)

मिस्तर डारसी—(एक पत्र पुढें करून) एलिझाबेथ, मी तुझी किती तरी वेळ वाट पहात आहें. सकाळीं केव्हां तरी तुझी गांठ घेऊन हें पत्र तुला द्यावें असें मनांत होतें. हें पत्र वाचून पाहिल्यास फार उपकार होतील. येतों मी.

[जातो.

एलिझाबेथ—(स्वगत) ह्मटलें, कोठें बाहेर फिरावयाला जाऊन मन शांत झालें तर पहावें ह्मणून इकडे फिरावयाला आलें, तों आपलें नको तें आहेच! (पत्राकडे पाहून) हें पत्र फोडून वाचावें का? काय बरें यांत असेल? पाहूं तर खरें काय आहे तें! (पत्र फोडून पाहते.) अरे वा, पत्र तर बरेंच लांब आहे—यावरून यांत बरीच हकीगत लिहिलेली असावी. (चालत चालत वाचूं लागते) एकतरी बरें आहे, कीं पहिल्याच वाक्यांत यांनीं मागणीविषयीं एक अक्षरहि यांत लिहिलेलें नाहीं, असें ह्मटलें आहे! बरें पुढें काय लिहिताहेत तें पाहूं. (वाचते) "माझ्या अब्रूच्या रक्षणार्थ हें पत्र मीं लिहावें आणि तुह्मीं तें वाचावें असें वाटत असल्यामुळें तें लिहिण्याचे श्रम घेतले आहेत व ते वाचण्याविषयीं तसदी देत आहें. हें पत्र लिहितांना तुह्माला दुःख व्हावें, अगर माझा कमीपणा दृष्टोत्पत्तीस यावा, असा हेतू मुळींच नाहीं. पत्रांत विषय मात्र असे लिहिणें भाग पडलें आहे कीं, उभयतांच्या सुखाचा विचार करितां त्याचें विस्मरण जितकें लौकर होईल तितकें चांगलें. करितां तुमच्या मनांत नसलें तरीहि न्याया-करितां ह्मणून तुह्मीं हें पत्र वाचण्याचे श्रम घ्या, आणि तसदीबद्दल माफी करा." प्रस्तावना तर मोठी बाणेदारपणाची आहे! बरें पुढें काय आहे? (वाचीत असतांनां) असें काय? काल जे दोन अपराध मीं त्यांच्या पदरीं बांधिले त्याचा खुलासा करण्याचा प्रयत्न या पत्रांतही स्वारीनें केलेला आहे. हा खुलासा करितांनां मनाला दुःख होईल अशा गोष्टी लिहिणें भाग आहे, परंतु प्रसंग जाणून तें लिहिणें अपरिहार्य आहे, असेंहि लिहून त्याबद्दल वाईट वाटत असल्याचें लिहीत आहेत. जणूं काय, काल रात्रीच्या बोलण्यानें मला कमीच त्रास झाला असेल! असो. खुलासा ह्मणजे आहे तरी काय तें समजलें पाहिजे. (पुढें वाचते.) "जेनची बिंगलेविषयींची वृत्ति उदासीन अशी वाटली–" अगदीं खोटें! बरें पण पुढें काय ह्मणतात तें तर पाहूं. "तुमच्या आईची वागणूक अगदीं लांछनास्पद आहे. तुमचे संबंधी लोक कमी दर्जाचे आहेत. या गोष्टी बिंगलेस सांगून मीं त्याचें मन वळविलें."–माझेसंबंधीं कमी दर्जाचे असले ह्मणून काय झालें? खऱ्या प्रीतीला का कोठें त्यानें अडथळा येतो? स्वतःसंबंधी ज्या गोष्टीची यांनां हरकत वाटली नाहीं, त्याच गोष्टी मि. बिंगले याच्या बाबतींत अडथळ्याच्या कां वाटाव्या? लिहिलें आहे कांहीं तरी झालें! बरें पुढें काय? (वाचून) केवढें धाष्टर्य हें! जेन लंडनमध्यें असल्याची बातमी जाणूनबुजून बिंगलेपासून यांनीं चोरून ठेविली ना? अरेरे! असें

असेल तर जेनच्या लंडनहून आलेल्या पत्रांत मि. बिंगले भेटले नाहींत हा मजकूर वाचून त्याला मीं जो दोष देत होतें तो व्यर्थ होय ! कारण, त्याला जेन लंडन-मध्यें असल्याची बातमी जर यांनीं दिली नाहीं, तर बिचाऱ्यांनां तें समजावें कसें आणि त्यांनीं जेनची गांठ घ्यावी तरी कशी ? "ही गोष्ट चोरून ठेविली हें कृत्य मला कमीपणा आणणारें घडलें खास; पण ते सद्धेतूनें केलें होतें," येवढेंच यांचें या बाबतींत ह्मणणें आहे. कांहीं असो, पण एकंदरींत पत्र कपट न ठेवितां खुल्या दिलानें लिहिलें आहे. त्यांत खरेपणा कितपत आहे हें दिसतच आहे ! (वाचून) यापुढें काय ? विखमबद्दलची हकीकत आहे. अरे, पण हें भारूड वाचून तरी काय करावयाचें आहे? यांत तथ्यांश असा काय असणार ? तरी पण जिज्ञासा नष्ट होत नाहीं. वाचावेंच काय आहे तें ! (वाचीत असतां) काय ! मी हें वाचतें आहें तरी काय ! ही गोष्ट खरी असेल का ? मिस्तर विखमनें ह्मणे तीन हजार पौंड रोख घेऊन रेक्टरशिपवरील आपला हक्क सोडून दिला ! हें जर खरें असेल तर डारसीची निंदा हा काय ह्मणून करितो ! यांत कांहीं तरी गौडबंगाल आहे खास. दोघांपैकीं एक कोणी तरी खोटा असला पाहिजे. बरें पुढें काय ? (वाचते) अरेरे ! या गोष्टीनें तर मनाचा धीरच सुटला. इतका भयंकर मनुष्य विखम आहे हें अगदीं विश्वसनीय वाटत नाही. माझी खात्री व्हावी ह्मणून कांहीं तरी लिहिलें असावें. ह्मणे जॉर्जिआना[1] डारसीला पळवून नेण्याचा यानें प्रयत्न केला होता. आणि तो कां ह्मणाल तर एकतर पैशाचा लोभ आणि दुसरें एकदां हक्क सोडून पुनः संधि येतांच रेक्टरशिप डारसीनें दिली नाहीं ह्मणून त्या गोष्टीचा त्याजवर उगवावयाचा सूड ! पण हें खरें असेल का ?— पण हें जर खरें नसतें तर या सर्व गोष्टींची साक्ष ह्मणून कर्नल फिट्झ् विल्यमला विचारावें ह्मणून लिहिलें आहे तसें तो लिहितांना ! काय विलक्षण प्राणी आहे बरें हा ! अरे पण डारसीला दोष देण्यापेक्षां माझी तर चूक नाहींना होत ! तें कांहीं नाहीं ! माझी समजूत पडावी ह्मणून लिहिलें आहे कांहीं तरी झालें ! अरे वा ! हें पत्रांतलें शेवटलें वाक्य तर फारच मौजेचें आहे.—" ईश्वर तुझें कल्याण करो!" तें कांहीं नाहीं, पुनः ह्मणून या पत्राकडे मी पहाणारसुद्धां नाहीं ! (पत्र उडवून देते.) पण नाहीं, असें करून उपयोगी नाहीं. जेनविषयींचा मजकूर

१ मिस्तर डारसी यांची बहिण.

राहूंद्या बाजूला, पण मिस्तर विखमबद्दल जें कांहीं लिहिलें तें पुनः एकवार वाचूं. (वाचीत असतां) बरें स्मरण झालें. कालच माझें कर्नल फिट्झ् विल्यमबरोबर बोलणें झालें, त्यावेळीं त्यांनीं मिस्तर डारसीसंबंधी जें कांहीं सांगितलें त्याच्याशीं अगदीं तंतोतंत मेळ या लिहिण्यांत आहे! ते दोघे थोरल्या डारसीच्या मृत्युपत्रांतील जर व्यवस्था पहाणारे आहेत, तर कर्नलला या सर्व गोष्टी कळणें अगदीं साहजिक आहे. त्यांनांच विचारावें, म्हणजे खरा कोण हें कळेल. पण मी वेडी तर नाहींना? जर कर्नलला या गोष्टी माहित नसत्या, अगर त्यांच्या सांगण्यांत तफावत पडण्याचा संभव असता, तर डारसी त्याच्यावर खरेपणाचा हवाला कधींच देताना! मिस्तर विखमच्या बाबतींत खुद्द त्यानें सांगितलेल्या गोष्टी व या पत्रांतील गोष्टी पुष्कळ जुळतात. फरक काय तो रेक्टरशिपच्या नेमणुकीच्या बाबतींत येतो. ती नेमणूक न करण्याचें कारण पत्रीं लिहिलें आहे तें खरें मानिलें, तर डारसीकडे कांहीं दोष येत नाहीं, आणि खेदाची गोष्ट ही कीं, डारसीचेंच म्हणणें खरें, असें एकंदर गोष्टींचा विचार केला तर मला म्हणणें भाग आहे. मिस्तर बिंगलेला जरी पत्रांत लिहिलेली सविस्तर हकीकत ठाऊक नाहीं, तरी जेनशीं त्याच्या बोलण्यांत विखमचे बाबतींत डारसीकडे मुळींच दोष येऊं शकत नाहीं, असें नव्हतें आलें? ही त्यांची माहिती चुकीची असण्याला कांही कारण नाहीं. या अशा विचारांत मी कोणीकडे वाहून जाणार, कांहीं कळत नाहीं! पहिल्याच भेटीला म्हटलें तरी चालेल माझ्याशीं—पूर्वी ओळख नसलेल्या माणसाशीं—विखमनें सांगितली अशी हकीकत कोणीतरी सांगेल काय? खरेंच नाहीं! असें असून त्यानें सांगितली; पण काय आश्चर्य, त्यावेळीं ही गोष्ट माझ्या कशी ध्यानांत आली नाहीं? 'डारसीला मी भिणार नाहीं, त्यानेंच पाहिजे तर भ्यावें!' अशी प्रौढी मारणारा विखमच आपण होऊन नेदरफील्डच्या बॉलचे रात्रीं गैरहजर राहिला! आजपर्यंत या गोष्टीकडे माझें लक्ष्यच गेलें नव्हतें. जों जों खोल विचार करावा तों तों सर्वच पारडें फिरणार, असें वाटतें. गेल्या नाताळांत मामी आमच्या घरीं आली होती. त्यावेळींहि तिनें 'विखमबद्दल खबरदारी घे,' म्हणून दिलेली सूचना, लहानपणापासूनचें तिचें त्याच्याविषयींचें वाईट मत, या सर्वांचा विचार करतां विखम खोटा व डारसी खरा, हेंच म्हणणें भाग आहे. हर हर! केवढी ही विचारक्रांति!! बरें पण, जेनसंबंधी जी हकीकत या पत्रांत लिहिली आहे त्याच्या खरेपणाबद्दल अद्याप संशय फिटत नाहीं. तरी पुनः एकदां पत्रांतील

तो भाग वाचावा. (वाचूं लागते.) झालें, आतां अगदीं पूर्ण काम झालें. जेनचें वर्तन डारसीसारख्या तिऱ्हाईत माणसाला संशयाचें वाटलें, यांत नवल तें काय ? आतां मला शार्लटच्या[1] त्यावेळच्या बोलण्याचें स्मरण होतें. तिनें नाहीं का मला एकदां सांगितलें होतें की, जेनच्या अन्तःकरणांत किती जरी प्रेमोद्भव असला तरी तो तिच्याकडून योग्य रीतीनें दाखविला जात नाहीं. असें जर आहे, तर डारसीला दोष काय ह्मणून द्यावा? त्याला तसें वाटणें साहाजिक आहे, आणि ह्मणून त्याचें करणेंहि योग्य असें ह्मणणें भाग आहे. शेवटीं काय ठरतें, कीं जेनच्या दुःखाला कारण ही आमची घरचीच मंडळी व त्यांचें वर्तन! कोण फजिती ही! माझी मलाच आतां फार लाज वाटूं लागली आहे! डारसी व विखम यांच्याबद्दल विचार करितां सर्व दोष माझ्याकडे येत आहे! मीच पक्षपाती, अंध, गैरसमज करून घेणारी बनलें, व त्यामुळें हा सर्व अनर्थ ओढवला. किती मूर्ख-पणाचें हें माझें वर्तन! ज्या मला आपल्या चाणाक्षपणाबद्दल येवढी घमेंड होती, ज्या मला आपल्या हुशारीबद्दल येवढा डौल वाटत होता, उदार कल्पनांनां आपल्या घमेंडींत झुगारून देऊन माझेंच खरें मानून जी मी आजपर्यंत तोऱ्यानें वागलें, त्या माझी कोण ही फजिती ! पण ही फजिती होणें अगदीं न्याय्य आहे, प्रेमामुळें मी अंध बनल्यें असत्यें तर गोष्ट निराळी; परंतु माझ्यांतील विकार प्रेम नसून दुराग्रह ! प्रथमच्याच भेटीला एकाच्या आवडीनें आनंदित होऊन व दुसऱ्याच्या नावडीनें चिडून जाऊन मीं गैरसमज व अज्ञान यांनां आगाऊच आपल्या अन्तःकरणांत थारा दिला व विचारशक्तीला घालवून दिली. अशा तऱ्हेनें मी त्या दोघांच्या बाबतींत वागल्यें. आतांपर्यंत माझें मलाच स्वतः-विषयींचें ज्ञान नव्हतें, असें ह्मणणें भाग आहे. अरे, पण मी फिरावयाला ह्मणून आल्यें त्याला किती तरी वेळ झाला. सर्वजणें माझी वाट पहात असतील. जावेंच तर आतां बिऱ्हाडीं.

[जाते.

[पडदा पडतो.]

---

१. एलिझाबेथची मैत्रीण व मिस्तर कॉलीन्सची बायको इचें क्रिश्चन नांव.

अंक चवथा.

प्रवेश पहिला.

[**स्थळ**–हर्टफर्डशायर. वाटेवरील एक खाणावळ. कॅथेराईन प्रवेश करिते.]

कॅथेराईन—खरेंच, आमची लिझी मिसेस कॉलीन्सकडे गेल्याला किती तरी दिवस झाले. घरीं लिझी नाहीं एवढेंच नव्हे, तर जेन पण लंडनमध्यें मामाकडे गेलेली. त्या दोघीहि घरीं नसल्यामुळें माझी व लिडियाची चांगलीच चंगळ उडाली आहे. पण बाबांनां मात्र त्या घरीं नाहींत म्हणून कसेंसेंच झालें असावें असें दिसतें. केंटशायरमधून लिझीनें लंडनपर्यंत यावें, तेथून मग पुढें मामांनीं येथपर्यंत जेनची व तिची रवानगी करून द्यावी, व येथून त्यांनीं घरच्या गाडींत लॉंगबोर्नपर्यंत जावें, असें बाबांनीं आधींच ठरविल्याप्रमाणें मी व लिडिया त्यांनां नेण्याकरितां गाडी घेऊन येथपर्यंत तर आलों; पण त्यांचा तर अद्याप पत्ता नाहीं! लिडिया गाडी आली कीं काय हें पाहण्याकरितां म्हणून बाहेर गेली आहे, तीहि कोठें दिसत नाहीं. (पाहिलेंसें करून) अरे वा लिडिया आली. (लिडिया प्रवेश करिते.) कायग, दिसते आहे का गाडी कोठें ?

लिडिया–गाडी तर कांहीं दिसत नाहीं. पण कायग किटी,[1] आपण आल्यानंतर त्यांची गाडी ताबडतोब आली नाहीं, हें एका अर्थी बरें नाहींका झालें?

कॅथेराईन— तें कसें काय बाई?

लिडिया—कसें म्हणून काय विचारतेस? आपण येथें येऊन दाखल होतांच जर का त्या आल्या असत्या, तर मग आपणांस बाजारांत जाऊन या जिनसा कशा विकत घ्यावयाला सांपडल्या असत्या ?

कॅथेराईन—खरेंच गडे, तूं म्हणतेस तें कांहीं खोटें नाहीं. आमची लिझी ती. ती काय मग इकडे तिकडे एक क्षण तरी फुकट दवडणार आहे ? आज इतके दिवस ती घरीं नाहीं तेव्हां केव्हां एकदां घरीं जाईन असें तिला झालें असेल.

---

१. हें कॅथेराईन या नांवाचें संक्षिप्त रूप आहे.

लिडिया—खरेंच. बाकी मी तिला थोडीच भिणार आहें ह्मणा! या आपल्या लिझीचा स्वभावच तसा! आपण मौज करावयाची नाहीं व दुसऱ्यास करूं द्यावयाची नाहीं. न का येईतना त्या लौकर. एका अर्थी बरेंच. त्या येईपर्यंत आपण खाऊंपिऊं, मौज मारूं, झालें.

कॅथेराईन—अग, पण गाडीचा आवाज आला, आल्याच वाटतें त्या!

(इकडे तिकडे पहातात तों एलिझाबेथ व जेन प्रवेश करितात.)

लिडिया—या बरें, तुमच्याकरितां तयारी कशी छान करून ठेविली आहे! पहा तर कसें काल्यासारखें गार अन्न झालेलें आहे. आणि अशाच तऱ्हेची मेजवानी देण्याचा आमचा विचार ठरलेला होता. बाकी ते खाणावळीचे पैसे तुम्हीं दिले पाहिजेत हो! कारण, आमच्याजवळ जें कांहीं होतें तें सर्व आम्हीं आतांच त्या पलीकडल्या दुकानांत खर्चून टाकिलें आहे. (एक टोपी दाखवीत) ही पाहिलीत का टोपी? ही अगदीं चांगली आहे असें कांहीं मला वाटत नाहीं. जणूं काय ती विकत घेतलीच नाहीं असें समजून मीं ती विकत घेतली आहे—

एलिझाबेथ—बरें, पाहिली तुझी टोपी, अगदीं खराब आहे—

जेन—लिडिया, अग कशाला बरें असली वाईट टोपी घेतलीस—

लिडिया—हं त्यांत काय आहे? याहून वाईट अशा दोनतीन तेथें होत्या, त्यापेक्षां तर ही बरी आहे! आतां मी सुंदर रंगाची साटीन घेऊन जेव्हां ती हिला लावीन तेव्हां पहा ती कशी छान होईल! परंतु या उन्हाळ्यांत कोण मुलगी कसली टोपी घालते याचा फारसा विचार नको! कारण, मेरीटनहून लष्करचा तळ उठण्याचें ठरलें आहे आणि आतां त्याला जावयाला पंधरा दिवससुद्धां उरले नाहींत—

एलिझाबेथ—खरेंच का, लष्कर मेरीटनहून जाणार?

लिडिया--होय हो, खरेंच तें जाणार! हें लष्कर आतां मेरीटनहून ब्रायटनला[१] जाणार. खरेंच, आपण सर्वजण जर या उन्हाळ्यांत ब्रायटनला जाण्याचा बेत केला, तर किती मौज होईल! अन् त्यांत म्हणजे खर्च फारसा होईल, असें वाटत नाहीं. आईच्यासुद्धां मनांत तसेंच आहे; आणि तुम्हीच पहा कीं आपण जर तिकडे गेलों नाहीं तर हे उन्हाळ्याचे दिवस आपल्याला किती कंटाळवाणे जातील? (एक नोकर कांहीं खाण्याचे पदार्थ आणून ठेवितो व बाजूला उभा राहतो.)

१. हें एक उत्तम हवापाण्याचें ठिकाण ह्मणून प्रसिद्ध आहे.

अंक चवथा, प्रवेश पहिला.

एलिझाबेथ—वाः, फार चांगला बेत ! ठिकाण पण छान शोधून काढलेंस जावयाला. ब्रायटनला काय ह्मणे सैन्यच सैन्य आहे ! एक कोठें बारीकशी तुकडी मेरीटनला आली होती, तर आठवड्याच्या नाचांनीं आणि इतर पुष्कळ गोष्टींनीं आपणां सर्वांनांच काय थोडा उच्छृंखळपणा आला होता ? त्यांत मग ब्रायटनला गेल्यावर पुरीच भर पडावयाची !

लिडिया—आणि आतां तुम्हांला एक बातमी सांगावयची आहे—बातमी पण बातमी आहे ! फारच चांगली ! किती चांगली ह्मणून विचारूंच नका ? आणि तीहि पण जो गृहस्थ आपणां सर्वांनां आवडतो अशा गृहस्थासंबंधी.

जेन—(एलिझाबेथकडे वळून) पाहिलेंस का, काय बरें स्वभाव हा ! हा नोकर येथें आहे याचें इला भानच नाहीं ?

एलिझाबेथ—(जेनकडे वळून) अग ती तशीच आतांशा झाली आहे. (नोकरास) अरे, तूं जरा गेलास तरी चालेल हो !

[नोकर जातो.

लिडिया—(हंसत) हेंच तें ! तुह्माला शिस्तीची फारच आवड ! तुह्माला असें का वाटते कीं, त्या नोकरानें माझें बोलणें ऐकतां कामा नये ? पण त्याचें त्याला काय विशेष आहे ! मला पक्कें ठाऊक आहे कीं, मी जें कांहीं सांगणार त्यापेक्षां कितीतरी वाईट गोष्टी तो रोज ऐकत असेल. पण ही स्वारी फारच कुरूप आहे. बरें झालें गेला तो ! माझ्या हयातींत अशी लांब हनुवटी मीं कांहीं पाहिली नव्हती ! असो. आतां तर माझी बातमी सांगण्याला नाहीं ना हरकत ? ती बातमी कोणाबद्दल ह्मणाल तर आपल्या त्या लाडक्या विखमबद्दल ! मेरी किंगचा व विखमचा विवाह होईल हें आतां शक्य नाहीं ! पाहिलेंत माझी बातमी कशी छान आहे ती ! अरे वा, अगदीं मिटक्याच नकोत मारावयाला कांहीं. मेरी किंग लिव्हरपूलला आपल्या मामाकडे गेली आणि ती आतां तेथेंच राहाणार. विखमबद्दल आतां काळजी करण्याचें कारण नको !

एलिझाबेथ—आणि मेरी किंग ही सुरक्षित राहिली ह्मणावयाची ! अश्लाघ्य संबंधापासून तिची सुटका झाली, हें फार बरेंच झालें ह्मणावयाचें.

लिडिया—मला तर बाई असें वाटत होतें कीं, तो जर तिला आवडत होता तर तिनें येथून मुळीं जावयाचेंच नव्हे !

जेन—पण मला वाटतें त्या दोघांमध्यें फारसें प्रेम नव्हतें !

लिडिया—निदान विखमच्या अन्तःकरणांत प्रेमाचा एक बिंदुहि नव्हता, हें मी खात्रीनें सांगतें. त्याला तिची कवडी इतकी किंमत वाटत नव्हती; आणि उघडच आहे कीं, अशा ह्या बुबडाकडे पहातो तरी कोण ? परंतु हें आतां राहूंद्या. लिझी, जेन, अग तुमच्याबद्दल सांगाल कीं नाहीं कांहीं बातमी ! सुंदर पुरुष तुह्मीं पाहिलेत का नाहीं ? पतिप्रेमाच्या पाशांत सांपडलां कीं नाहीं ? मला तर बाई वाटत होतें कीं, तुह्मां दोघींपैकीं कोणाला तरी इतक्या अवधींत पतीचा लाभ झाला असेल ह्मणून ! जेन, तूं तर आतां एक वृद्ध कुमारीच राहाणार असें दिसतें ! काय बाई तरी, वयाला तेवीस वर्षें झालीं अन् लग्नाला तर कोठें पत्ताच नाहीं ! देव करो अन् माझें लग्न तुमच्या सर्वांच्या आधीं होवो ह्मणजे किती तरी बरें होईल ! मग मीच तुह्मांला बॉलला घेऊन जात जाईन !

कॅथेराईन—लिडिया, अग पण परवां आपण केलेली गम्मत यांनां नाहीं का सांगत ?

लिडिया—अग हें काय विचारतेस ? मी तेंच आतां सांगणार होतें. हें पहा जेन, परवां आम्ही कर्नल फॉस्टरकडे जमलों होतों. मिसेस फॉस्टरचा व माझा किती स्नेह आहे हें तुम्हांला ठाऊक आहेच. तेव्हां मी आणि किटी तिच्या इथें सर्व दिवसभर राहणार होतों. दोघां हॅरिंगटननां देखील बोलाविलें होतें; पण हॅरिअट[१] आजारी पडली ह्मणून पेनला[२] एकटीलाच येणें भाग पडलें. आणि मग आह्मीं काय केलें, समजलें का ? आह्मीं चेंबरलेनला बायकोचा पोषाख दिला. मौज पण मौज झाली. ही गोष्ट फक्त मला, किटीला अन् मिसेस फॉस्टरलाच ठाऊक होती ! मावशीचा गाऊन आणावा लागल्यामुळें तिला सहजीं समजलें. बाकी कोणाला कांहीं ठाऊक नव्हतें ! डेनी, विखम वगैरे ऑफिसर मंडळी आली, पण त्यांनां कसलाच संशय आला नाहीं. मिसेस फॉस्टरला व मला हंसूं आवरेना. मी तर हंसतां हंसतां मेलेंच असतें. त्यामुळें मंडळीला आला संशय अन् मग सर्व भांडवल फुटलें !

जेन—लिडिया, पुरें झालें तुझें हें चऱ्हाट ! चला, आपण पुढें जाण्याच्या तयारीला लागूं.

[जातात.

---

१. वरच्या वाक्यांत सांगितलेल्या बाईचें क्रिश्चन नांव.

२. दुसऱ्या बाईचें क्रिश्चन नांव.

प्रवेश दुसरा.

[**स्थळ**—लॅम्पटन-जॉन प्रवेश करितो.]

जॉन—आमचे धनीसाहेब प्रवासाला निघाल्याला आज बरेच दिवस झाले. धनीसाहेब व आमच्या बाईसाहेब यांचा स्वभाव काय विचारतां? आह्मी प्रवासांत आहों किंवा घरीं आहों हेंसुद्धां समजत नाहीं! त्यांतल्या त्यांत विशेष गोष्ट ह्मटली ह्मणजे त्यांनां जोडीला एलिझाबेथ बेनेट मिळाली आहे. आमच्या बाईसाहेबांचा या मुलीवर फारच लोभ, व त्यामुळें तर बाईसाहेबांनीं मुद्दाम प्रवासाला निघण्यापूर्वीं तिला आपल्याबरोबर येण्याविषयीं कळवून निघतांना तिला घेऊन आल्या. या मुलीसारखी खुल्या स्वभावाची मुलगी मिळणें कठीणच. तिघांचां कसा अगदीं उत्तम जम जमला आहे. माझ्यासारख्या गरिबाला का कोठें प्रवासालां जाऊन असलीं ठिकाणें पहाण्याला मिळणार? परंतु आमच्या धनीसाहेबांच्या कृपेनें तो लाभ हल्लीं मला होत आहे. आक्सफोर्ड ब्लेनिहीम, वॉरविक, केनिलवर्थ, बरमिंघम यासारखीं शहरें मला पहाण्याला मिळालीं. मला काय समजतें आहे ह्मणा. परंतु त्या शहरांतील कित्येक गोष्टींनीं मनाला फार बरें वाटलें. हल्लीं आह्मी या लॅमटन शहरीं आलों आहों. डारबी-शायरमधील या शहरांत ह्मणे आमच्या बाईसाहेब आपल्या लहानपणीं रहात असत, त्यामुळें त्यांनां हें गांव फार आवडतें. येथें आल्यापासून सर्व वेळ जुन्या ओळखी काढण्यांत, जुनीं ठिकाणें पहाण्यांत चालला आहे. आज तर ही मंडळी या प्रांतांतील प्रसिद्ध ठिकाण जें पेंबरले तें पाहण्यासाठीं जाणार आहे. गाडी तयार ठेवण्याची वेळ होत आली, तिकडेसच जावें कसें!

[जातो.

प्रवेश तिसरा.

[**स्थळ**—पेंबरले वाडा. मिस्तर व मिसेस गार्डिनर, एलिझाबेथ व मिसेस रेनॉल्डस प्रवेश करितात.]

एलिझाबेथ—(स्वगत) कोणत्याहि ठिकाणाचें वर्णन ऐकण्यांत व तें प्रत्यक्ष पहाण्यांत किती तरी अंतर असतें! हें पेंबरले ठिकाण फारच रमणीय आहे, यांत कांहीं शंका नाहीं. जी ही इमारत आह्मी पहात आहों ती कितीतरी सुंदर आहे.

त्याचे भोंवतालचें हें सृष्टिसौंदर्य तरी किती अवर्णनीय आहे ! इमारतीच्या कोणत्याहि भागांतून दूरवर पहावें तों सर्वत्र सुंदर देखावा दिसून येत आहे. अहाहा ! पलीकडील ती टेंकडी, त्यावरील तें सुंदर जंगल, त्यापुढील तें रमणीय मैदान, टेंकडीखालून जाणारा तो सुंदर ओढा, हें सर्व पाहून कोणाचें अन्तःकरण आनंदित होणार नाहीं ! सृष्टीच्या नैसर्गिक सौंदर्यांत जरूरीपुरतीच मनुष्यकृतीची भर टाकिलेली असल्यामुळें, या ठिकाणाला अद्वितीय शोभा आली आहे. त्यामुळें मालकाच्या अभिरुचीची तारीफच करावी लागत आहे. हें जसें बाहेर तसेंच आंतहि पण आहे. सर्व सामान कसें बेताचें व मालकाच्या वैभवाला शोभेल असेंच आहे. त्यांत फाजील डामडौल रतिभरसुद्धां नाहीं. खरेंच, असल्या स्थळाची मालकीण होणें ह्मणजे कांहीं लहान भाग्य नव्हे ! अरेरे! केंटशायरमध्यें घडला तसा प्रकार न घडता तर या स्थळाची मी मालकीण झालें असतें ! ह्या खोल्या माझ्या नित्य परिचयाच्या झाल्या असत्या. आतांप्रमाणें त्यांजकडे तिऱ्हाईत दृष्टीनें न पहातां त्या माझ्या ह्मणून पहाण्यांत मला अत्यानंद झाला असता व मोठ्या हौसेनें मी माझ्या मामामामींनां पाहुणचारास आणवून त्यांनां त्या दाखविल्या असत्या. अरे, पण नाहीं—मग मला मामामामींचें नुसतें दर्शनहि झालें नसतें. मग त्यांनां येथें बोलावण्याचें नांवच नको ! मी हें सर्व पहाण्यांत गर्क झालें आहें खरी, पण खरोखरच मिस्तर डारसी येथें नाहींतना ? नाहीं तर—पण संशय कसला ? मामा याच बाबतींत कांहींतरी मिसेस रेनॉल्डसबरोबर बोलत आहेत असें दिसतें, तेव्हां खरा प्रकार आतांच समजून येईल.

मिस्तर गार्डिनर—मिसेस रेनॉल्डस, तुमचे धनीसाहेब येथें नाहींत वाटतें ?

मिसेस रेनॉल्डस—होय, ते घरीं नाहींत. पण उद्यांच ते बरोबर बरीच स्नेही मंडळी घेऊन येणार आहेत.

एलिझाबेथ— (स्वगत) खरेंच, आमचा बेत एक दिवस आधीं झाला, हें किती तरी चांगलें झालें ह्मणावयाचें !

मिसेस गार्डिनर—(तसबिरीकडे पाहून) लिझी, ही पाहिलीस का कोणाची तसबीर आहे ती ? तुझ्या अगदीं ओळखीचे इसमाची आहे !

मिसेस रेनॉल्डस—ही तसबीर मिस्तर विखमची आहे. हा इसम माझ्या थोरल्या धनीसाहेबांच्या दिवाणाचा मुलगा. त्या मुलाचें सर्व शिक्षण आमच्या

थोरल्या धनीसाहेबांनीं केलें. हल्लीं त्यानें सैन्यांत नोकरी धरली आहे ह्मणून ऐकतें; परंतु मला तर असें कळतें कीं, तो फार बहकला आहे.

मिसेस गार्डिनर—(एलिझाबेथकडे वळून) ऐकलेंस का लिझी ?

मिसेस रेनॉल्डस—आणि ही पाहिलीत का दुसरी तसबीर? ही आमच्या धनीसाहेबांची. ही काढल्यास आज आठ वर्षे झालीं. चेहरा पण अगदीं हुबेहुब वठला आहे.

मिसेस गार्डिनर—तुमच्या धनीसाहेबांच्या सौंदर्याची ख्याती आह्मीं ऐकलीच आहे. हा चेहरा फार सुंदर आहे खरा, परंतु तो अगदीं हुबेहुब आहे किंवा नाहीं हें आमची लिझी सांगू शकेल ! खरेंच लिझी, पहा बरें नीट, अगदीं हुबेहुब चेहरा आहे कीं नाहीं तो ?

मिसेस रेनॉल्डस—काय म्हणतां, आमचे धनीसाहेब यांच्या ओळखीचे आहेत? खरेंच का हो हें ?

एलिझाबेथ—होय, माझी थोडीशी ओळख आहे. (स्वगत.) गरीब बिचारी ! मीं मनांत आणिलें असतें तर हें असें उत्तर देण्याचा दुर्घट प्रसंग मजवर आलाच नसता !

मिसेस रेनॉल्डस—मग तुम्हाला नाहीं वाटत कीं ते फार सुंदर पुरुष आहेत ह्मणून !

एलिझाबेथ—यांत काय संशय ! ते फारच सुंदर आहेत हो !

मिसेस रेनॉल्डस—माझी पक्की खातरी आहे कीं, इतका सुंदर पुरुष दुसऱ्या कोठेंहि मीं तरी पाहिला नाहीं ! परंतु वर गॅलरीमध्यें त्यांची फार मोठी तसबीर तुम्हांला पहाण्याला सांपडेल. ही खोली आमच्या थोरल्या धनीसाहेबांना फारच आवडे. हें सर्व सामान ते असतांना जसें होतें तसेंच कायम ठेवलेलें आहे. त्यांत फरक झालेला नाहीं.

एलिझाबेथ—(स्वगत) मघापासून मी विचार करीत होतें कीं, मिस्तर विखमची तसबीर येथें कशी राहिली ! पण या हिच्या भाषणानें सर्व खुलासा आपोआप झाला !

मिस्तर गार्डिनर—काय हो, तुमचे धनीसाहेब वर्षांतून बरेच दिवस येथें रहातात का ?

मिसेस रेनॉल्डस—मला असावेत असें वाटतें तितके दिवस तरी ते येथें नसतात. जवळजवळ सहा महिने त्यांचा मुक्काम येथें असतो. धनीसाहेबांची बहीण तर उन्हाळ्याचे दिवसांत येथें असावयाचीच !

मिस्तर गार्डिनर—जर तुमच्या धनीसाहेबांनीं लग्न केलें तर ते कदाचित् जास्त दिवस येथें रहातील, नाहीं का ?

मिसेस रेनॉल्डस—होय, खरें ह्मणतां तुह्मी. परंतु ती गोष्ट घडेल तेव्हां खरें ! त्यांच्या योग्य अशी नवरी जगांत कोण आहे, देव जाणे !

मिसेस गार्डिनर—(एलिझाबेथकडे वळून हंसत) ऐकलेंस का ही काय ह्मणाली तें ?

एलिझाबेथ—तुह्माला असें वाटावें हें तुमच्या धनीसाहेबांच्या चांगुलपणाचें चांगलेंच द्योतक आहे.

मिसेस रेनॉल्डस—मी जें खरें आहे तेंच सांगतें, आणि ज्याला ज्याला ह्मणून त्यांची माहिती आहे तोहि असेंच ह्मणेल. काय सांगूं तुह्माला त्यांचा स्वभाव ! माझ्या हयातींत एकदांहि त्यांनीं मला दुरुत्तर केल्याचें स्मरत नाहीं. मी त्यांनां ते चार वर्षांचे असल्यापासून पहात आहें.

एलिझाबेथ—(स्वगत) ही स्तुति तर फारच विलक्षण ! माझ्या कल्पनेच्या अगदीं विरुद्ध ! पण या इच्या बोलण्यानें माझें सर्व लक्ष ह्याच विषयानें घेरून टाकिलें आहे हें खास. याचा जास्त उलगडा कसा होईल तो होवो !

मिस्तर गार्डिनर—ज्याच्याबद्दल अशी स्तुति ऐकण्यांत येते, असे लोक फारच क्वचित् ! असला धनी तुह्माला मिळाला आहे, हें तुमचें भाग्यच ह्मणावयाचें !

मिसेस रेनॉल्डस—यांत काय संशय ! सगळें जग जरी मी शोधूं लागलें तरी मला यांच्याहून अधीक चांगला मनुष्य मिळणार नाहीं ! माझ्या अनुभवानें तरी मला असें वाटतें कीं, लहानपणीं जे चांगले मुलगे ह्मणून नांवाजले जातात ते मोठेपणींहि तसेच निपजतात. लहानपणीं तर आमच्या धनीसाहेबांइतका गोड स्वभावाचा व उदार अंत:करणाचा मुलगा आढळणारच नाहीं, असें जो तो ह्मणे !

एलिझाबेथ—(स्वगत) केवढें आश्चर्य ! मी हें मिस्तर डारसीचेंच वर्णन ऐकत आहेंना ?

मिसेस गार्डिनर—याचा बाप फार चांगला माणूस होता, नाहीं का ?

मिसेस रेनॉल्डस—होय बाईसाहेब! आणि त्यांचा मुलगाहि पण तितकाच चांगला निपजला. गरिबांवर अगदीं त्यांच्या इतकीच दया करणारा आहे.

मिस्तर गार्डिनर—(एलिझाबेथकडे वळून) पाहिलेंस, या बाईच्या अंगांत कुटुंबाविषयीं फाजील आदर कसा भरला आहे तो! त्यामुळेंच तर ही आपल्या धन्याची इतकी स्तुति करीत आहे. पण आपलें काय जातें त्यांत. ती एकंदरींत काय सांगतें तें तर पाहूं. (उघड) त्याच्या कुळाडाळांवरहि त्याची तशीच नजर असेल, नाहीं?

मिसेस रेनॉल्डस—ते फार चांगले जमीनदार व कनवाळू धनी आहेत. नाहीं तर काय, अलीकडील तरूण मंडळी! त्यांनां आपल्याशिवाय कांहीं दिसतच नाहीं! त्यांच्या कुळाडाळांत अगर चाकरनोकरांत एकहि मनुष्य असा मिळणार नाहीं कीं, जो त्यांनां चांगलें ह्मणणार नाहीं. कांहीं लोक आमचे धनीसाहेब गर्विष्ठ आहेत असें मानितात; परंतु मला तर बाई त्यांतलें कांहींच दिसत नाहीं. माझी तर कल्पना अशी आहे कीं, ते इतर तरूण गृहस्थांप्रमाणें एकसारखे बडबड करीत नाहींत, ह्मणूनच लोक त्यांनां गर्विष्ठ ह्मणत असावेत!

एलिझाबेथ—(स्वगत) या दृष्टीनें त्यांच्या स्वभावाकडे पाहिलें ह्मणजे त्यांच्याबद्दल कितीतरी आदर उत्पन्न होतो!

मिसेस गार्डिनर—(एलिझाबेथला) आपल्या त्या स्नेह्याच्या बाबतींतील त्याची ती वर्तणूक या वर्णनाशीं बरीच विसंगत आहे!

एलिझाबेथ—(मिसेस गार्डिनरला) कदाचित् आपणच फसलों असूं!

मिसेस गार्डिनर—(एलिझाबेथला) पण तें संभवनीय नाहीं. आपला आधार कांहीं डळमळीत नव्हता.

मिसेस रेनॉल्डस—ती बघितलीत का, पलीकडे बसावयाची एक खोली आहे ती. ती खोली मिस डारसीला फार आवडते, ह्मणून किती सुंदर बनविली आहे.

एलिझाबेथ–खरेंच, तुमच्या धनीसाहेबांचें भगिनीप्रेम फार विलक्षण दिसतें.

मिसेस रेनॉल्डस—उद्यां मिस डारसी आली कीं तिला ही खोली पाहून कितीतरी आनंद होईल! आणि हीच धनीसाहेबांची नेहमींची रीत. आपल्या बहिणीला जें आवडेल तें एका क्षणांत घडवून आणावयाचें. तिच्याकरितां न करण्यासारखें असें कांहींच नाहीं झटलें तरी चालेल. चला, आतां वर गॅलरींत तुह्मांला तसबिरा दाखवितें.

[सर्व जातात.

प्रवेश चवथा.

[**स्थल**—सदर गॅलरी. डारसीच्या मोठ्या तसबिरीकडे पहात एलिझाबेथ उभी आहे, असा प्रवेश.]

एलिझाबेथ—(स्वगत) मामा व मामी दुसऱ्या भागांत तसबिरी पहात आहेत तों मला ही तसबीर नीट पाहून घेऊंदे. किती मनोवेधक हें हास्यमुख आहे ! केव्हां केव्हां माझ्याकडे पहातांना स्मितहास्य चेहऱ्यावर दिसे तसेंच हुबेहुब या चित्रांत वठलेलें दिसत आहे. काय बाई चमत्कार ! या तसबिरीकडे पहात असतांना माझ्या मनांत मिस्तर डारसीविषयीं अननुभूत असे विचार कां बरें उत्पन्न होत आहेत ? मिसेस रेनॉल्डसनें केलेल्या स्तुतीची किंमत मामा ह्मणतात तशी अगदीं क्षुल्लक नाहीं. हुशार अशा चाकराकडून चांगलें नांव मिळविणें फारच भाग्याचें समजलें पाहिजे. विचार केला तर बंधु ह्मणून, जमीनदार म्हणून, धनी ह्मणून, किती तरी माणसांचें बरेंवाईट करण्याचें यांच्या हातीं आहे. मिसेस रेनॉल्डसच्या भाषणानें त्यांच्या चांगुलपणाची किंमत अधिकाधिक वाढतच आहे. खरेंच, अशा माणसानें मजवर प्रीति करावी, ह्मणजे केवढ्या भाग्याची गोष्ट ! त्याबद्दल खरें ह्मटलें तर मीं किती तरी कृतज्ञ असावयाला पाहिजे. त्या प्रीतीचा झरा पण किती स्वच्छ व जोरदार होता ! खरेंच, प्रीति उघड करून दाखविण्यांत जरी कांहीं दोष असले, तरी ते त्यांच्या ठिकाणीं क्षम्यच मानणें अवश्य नाहीं का ? पण ही पश्चाद्बुद्धि सुचून उपयोग काय ? अरे, पण हीं पहा मामा व मामी इकडे येत आहेत.

(मिसेस गार्डिनर व मिस्तर गार्डिनर प्रवेश करितात.)

मिस्तर गार्डिनर—बरें, आतां सर्व वाडा तर पाहून झाला. आतां पलीकडील तें मैदान व टेंकडी वगैरे पाहूं चला.

एलिझाबेथ—बरें आहे.

[जातात.

प्रवेश पांचवा.

[**स्थल**—तेंच. घोड्यांच्या पागेकडून जाणारा रस्ता. मिस्तर डारसी प्रवेश करितो.]

मिस्तर डारसी—(स्वगत) बरा वेळेवर आलों ह्मणावयाचा ! वास्तवीक पूर्वीच्या बेताप्रमाणें मी उद्यांच येथें यावयाचें; परंतु आमच्या दिवाणजींनीं जरा

एक दिवस आधीं बोलावल्याप्रमाणें येथें येऊन तर दाखल झालों. उद्यां सर्व मंडळी येण्यापूर्वी काय विशेष जरूरीचें काम असेल तें उरकून घ्यावें. चला तर.

(एका बाजूनें डारसी जातो, तों दुसऱ्या बाजूनें मिस्तर व मिसेस गार्डिनर व एलिझाबेथ प्रवेश करितात.)

मिस्तर गार्डिनर—एलिझा, येथून मागें इमारतीकडे वळून पाहिलें ह्मणजे पहा कशी शोभा दिसत आहे ती! मला वाटतें, ही इमारत बरीच जुनी असावी. निदान—

(मिस्तर डारसी प्रवेश करितो.)

मिस्तर डारसी—(स्वगत)–अरे! मी हें पहातों आहें तरी काय! एलिझाबेथ बेनेट आणि ती येथें आमचें घर पाहाण्यास आली! केवढें आश्चर्य! माझे डोळे तर या वेळीं मला फसवीत नाहींतना? अरे, पण माझ्या मनाची ही अशी एकदम चलबिचल कां झाली! असो. पण तिची विचारपूस तर केली पाहिजे. (एलिझाबेथजवळ जाऊन गुडमार्निंग करितो.) कसें काय, बरें आहेना? तुह्मी येथें कधीं आलां?

(मिस्तर व मिसेस गार्डिनर बाजूला वळतात.)

एलिझाबेथ—(स्वगत) अरे, हे तर अगदीं माझ्याशींच बोलूं लागले! काय विलक्षण प्रसंग हा! (उघड) मी आपली फार आभारी आहें! मी नुकतीच येथें आलें.

मिस्तर गार्डिनर—(मिसेस गार्डिनरला) हे गृहस्थ मिस्तर डारसीच असले पाहिजेत! कारण, आतांच जी त्यांची मोठी तसबीर आपण पाहिली त्यांतील चेहऱ्याशीं यांचा चेहरा अगदीं तंतोतंत जुळतो!

मिसेस गार्डिनर—(मिस्तर गार्डिनरला)–होय, मलाहि पण तसेंच वाटतें. हे गृहस्थ ह्या ठिकाणाचे मालक मिस्तर डारसीच असले पाहिजेत.

मिस्तर डारसी—मिस बेनेट, तुमच्या घरची मंडळी खुशाल आहेना?

एलिझाबेथ—सर्व खुशाल आहेत.

मिस्तर डारसी—तुम्ही डारबिशायरमध्यें कधीं आलां? लाँगबोर्न सोडल्यास किती दिवस झाले?

एलिझाबेथ—घर सोडल्यास सुमारें पाऊण महिना होऊन गेला.

मिस्तर डारसी—पण खुद्द डारबीशायरमध्यें येऊन किती दिवस झाले? येथें तुह्मी कोठून आलां?

एलिझाबेथ—नुकतेच लँपटनहून येथें आलों. (स्वगत) काय ही प्रश्नांची धांदल! पण माझा तरी उत्तरें देण्याला जीव कोठें थाऱ्यावर आहे?

मिसेस गार्डिनर—(मिस्तर गार्डिनरला) पाहिलें का तिकडे, दोघेंहि कांहींच न बोलतां स्वस्थ उभीं आहेत! लिझी तर वर मान करूनहि त्या गृहस्थाकडे पहात नाहींसें दिसतें! अरे वा, ते गृहस्थ तर निघूनहि गेले!

[डारसी जातो.

मिसेस गार्डिनर—(एलिझाबेथकडे वळून) लिझी! मिस्तर डारसीचना हे! खरेंच, मोठा उमदा पुरुष दिसतो!

मिस्तर गार्डिनर—चेहरा तर कसा तरतरीत आहे! माणूस फार हुषार असला पाहिजे. मिसेस गार्डिनर, ती पाहिली का तिकडे ओढ्याची कशी शोभा दिसत आहे ती,–चला पाहून तर येऊं.

[दोघें जातात.

एलिझाबेथ—(स्वगत) माझें लक्ष आहे कोठें ठिकाणावर! किती निर्लज्ज मी आहें असें यांनां वाटेल! मला येथें पाहिल्यानें त्यांनां किती त्रास झाला असेल! खरेंच, आधीं हें ठिकाण पहाण्याला येण्यांतच माझी चूक झाली. येथें येण्याचें ठरविण्यापूर्वीच मीं याचा जास्त खोल विचार करावयाला पाहिजे होता. माझ्या येथें येण्यानें त्यांनां कसें वाटलें असेल! त्यांच्यासारख्या गर्विष्ठ माणसाला हें कृत्य ह्मणजे केवळ लांछनास्पद वाटणार! मी होऊन मुद्दाम त्यांच्या पायांशीं पुनः आलें, असाच अर्थ होणारना! आणि हें तर या मानी पुरुषाला कसें सहन होणार! अरेरे!! मी आलें तरी कशाला येथें! अगर यांनीं तरी एक दिवस आधीं येण्याची एवढी घाई कां बरें केली? केवळ दहा मिनिटें जरी गेलीं असतीं तरी मग एकमेकांनां न ओळखण्या इतक्या अंतरावर आह्मी गेलों असतों. काय विलक्षण भेट ही! भेट होणें जितकें विलक्षण वाटतें त्याच्या शतपट त्यांच्या या वागणुकींतील फरकाबद्दल आश्चर्य वाटतें! याचा अर्थ तरी काय? ते माझ्याशीं बोलण्याचा नुसता प्रयत्न करतील हेंच मुळीं संभवनीय वाटलें नव्हतें. पण नुसतें बोलणेंच काय पण माझ्या घरच्या मंडळीची विचारपूस

सुद्धां केली. केवढें आश्चर्य! यापूर्वी कधींच यांच्या वर्तणुकींतील आढ्यता कमी झालेली मला दिसली नव्हती. रोझिंगपार्कमध्यें शेवटीं जेव्हां त्यांनीं माझ्या हातांत पत्र दिलें, त्या वेळचें त्यांचें वर्तन व हल्लींचें वर्तन यांत केवढें महदंतर! हें कशामुळें झालें? कांहींच तर्क करवत नाहीं. मन अगदीं गोंधळून गेलें आहे! यांच्या मनांत या क्षणाला कोणचे विचार घोळत असतील बरें! माझ्याकडून अगदीं कडेलोट झाला असतांहि माझ्याविषयीं अझूनहि त्यांच्या मनांत प्रेम वसत असेल काय? कदाचित् चित्तवृत्ति शांत असल्यामुळें हें असें वर्तन घडलें असेल! मला मात्र तें विशेष प्रकारचें असें दिसत आहे. पण तसें ह्मणावें तर त्यांच्या आवाजांत जी कांहीं खोंच होती त्यामुळें त्यांचें मन गोंधळून गेलेलें होतें, हें खास! अरे, पण इतका वेळ आपली एकटीच विचार करीत बसलें आहें, मामा व मामी कोठें गेल्या.

(मिस्तर गार्डिनर व मिसेस गार्डिनर प्रवेश करितात.)

मिसेस गार्डिनर—लिझी, अग तुझें लक्ष गुंतलें आहे तरी कोठें? अशी विचार करीत काय एकटीच उभी आहेस?

एलिझाबेथ—अहो, लक्ष गुंतावयाचें तें कोठें? आपली इकडली तिकडली मजा पहात आहें, झालें. (पाहिलेंसें करून स्वगत) कोण! डारसीच इकडे येत आहेत वाटतें. एकदां भेट झाली ती झाली, पण हे पुनः कां येत आहेत? मघाशीं आपली सहजीं येत असतां वाटेंत गांठ पडली, तेव्हां बोलणेंचालणें झालें तें एकवार ठीकच झालें असें ह्मणतां येईल. पण आतां पुनः कां बरें येत आहेत? हें येणें कांहीं साहजिक नाहीं; मला तर बाई भीतिच वाटूं लागली आहे.

(मिस्तर डारसी प्रवेश करितो.)

मिस्तर डारसी—(एलिझाबेथकडे वळून) झालें का सर्व पाहून? पहाण्यासारखें असें विशेष नाहींच ह्मणा–

एलिझाबेथ—असें कां बरें ह्मणतां! या तुमच्या ठिकाणाइतकें चित्ताकर्षक व मनोवेधक ठिकाण–(स्वगत) अरे, पण मी काय करीत आहें! पेंबरलेबद्दल माझ्या तोंडून निघालेल्या स्तुतीचा भलताच अर्थ व्हावयाचा!

मिस्तर डारसी—(स्वगत) असें अर्धवट वाक्य कां राहिलें हें सहजीं ध्यानांत येतें. खरेंच, फारच हुशार व धोरणी आहे, यांत कांहीं शंकाच नाहीं!

(उघड) तुमच्या ह्या स्नेही मंडळीची व माझी ओळख करून दिली तर मोठे उपकार होतील !

एलिझाबेथ—(स्वगत) ह्मणजे हें तर सर्वांत विलक्षण! (उघड) बरें आहे, आपल्या इच्छे आड कोण येणार ! (मिस्तर गार्डिनरकडे वळून,) हे माझे मामा मिस्तर गार्डिनर, व ही माझी मामी मिसेस गार्डिनर ! (स्वगत) आतां पहावें स्वारीला कसें काय वाटतें तें. मुद्रेवर तर खेद व आश्चर्य दिसूं लागलींच !

मिस्तर डारसी—(दोघांशीं शेकहँड करितो) आपली ओळख झाली, फार बरें झालें.

मिस्तर गार्डिनर—खरें ह्मटलें तर आम्हींच या ओळखीबद्दल धन्यता मानून घेतली पाहिजे.

एलिझाबेथ—(स्वगत) मामामामीशीं यांचें बोलणें होण्यांत भिण्याचें कांहीं कारण नाहीं. यांना एवढें तरी दिसून येईल कीं, निदान माझ्या नातेवाईकांत काहीं माणसें तरी शहाणींसुर्ती आहेत.

मिस्तर गार्डिनर—आपल्या येथें मासे मारण्याची फारच उत्तम सोय दिसते.

मिस्तर डारसी—आहे खरी थोडीशी सोय. आतां एवढीच विनंती आहे कीं, आपण शेजारीं असाल त्या मुदतींत येथें खुशाल मासे मारण्यास यावें, आपली सर्व तरतूद केली जाईल. (एलिझाबेथ व मिसेस गार्डिनर एकमेकींकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पहातात.)

मिस्तर गार्डिनर—मिसेस गार्डिनर, बराच वेळ आपण फिरत आहों. तेव्हां जरा येथें कोठें तरी ओढ्याचे बाजूस बसून थोडी विश्रांति घेऊन मग पुढें चालूं लागूं.

मिसेस गार्डिनर—चला तर.

[दोघें जातात.

मिस्तर डारसी (एलिझाबेथकडे वळून) तुह्मी एकट्याच चाललां आहांत. आपण बरोबर चालूं.

एलिझाबेथ—बरें तर. (स्वगत) हा इतका फरक यांच्यामध्यें कशानें झाला? काय बरें याचें कारण असावें. हें सर्व माझ्याकरितां तर नव्हे ना ? पण माझ्यासाठींच यांच्या वृत्तींत हा एवढा फरक पडला असेल असें मला वाटत

नाहीं. हन्सफर्डमध्यें मी जी त्यांची निर्भर्त्सना केली तिचा एवढा मोठा परिणाम होणें शक्य आहे का ? मजविषयींचें त्यांचें प्रेम अद्याप जिवंत असेल काय ? (डारसीस उद्देशून) आपलें येणें अगदीं अवचित् घडलें ह्मणावयाचें ! आतांच आपली घर राखणारीण बाई ह्मणत होती कीं, आपण उद्यांपर्यंत येणार नव्हतां आणि बेकवेल सोडण्यापूर्वी तर आह्मांला असें समजलें होतें कीं, आपण तूर्त तरी या प्रांतांत येणारच नाहीं.

मिस्तर डारसी—(स्वगत) किती मार्मिकपणा या भाषणांत आहे ! (उघड) तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें आहे. आमच्या दिवाणजीनें जरा आधीं या ह्मणून कळविलें नसतें तर मी उद्यांच बाकी मंडळीबरोबर आलों असतों. ती सर्व मंडळी उद्यां सकाळीं येथें येऊन दाखल होईल. येणाऱ्या मंडळींत कांहीं तुमच्या ओळखीचे आहेत. मिस्तर बिंगले व त्याच्या दोघी बहिणी ह्याहि येणार आहेत.

एलिझाबेथ—असें का. (स्वगत) मिस्तर बिंगले यांचें नांव शेवटीं जेव्हां यांचे व माझे बोलण्यांत आलें तेव्हांचे प्रसंगाची आठवण होऊन मन पहा कसें बावरून गेलें तें !

मिस्तर डारसी—(स्वगत) मिस्तर बिंगलेचें नांव उच्चारितांच इच्या मनांत कोणचे विचार उद्भवले असतील, हें जाणणें अवघड नाहीं. (उघड) येणाऱ्या मंडळींत आणखीहि एक माणूस आहे कीं ज्याला तुमची ओळख होण्याविषयीं फार उत्सुकता वाटत आहे. माझ्या बहिणीच्या मनांत तुमची ओळख करून घेण्याचें फार आहे. पण तसें करा ह्मणून सांगणें अति प्रसंगाचें नाहींना वाटणार ?

एलिझाबेथ—असें काय उलटें बोलणें हें ? मींच या इच्छेबद्दल आभार मानिले पाहिजेत. (स्वगत) माझी आज पुरी फजिती करण्याचा जणुं बेतच केला आहे ! सर्वच गोष्टी माझ्या अटकळी बाहेर होत आहेत.

मिस्तर डारसी—तुम्ही बराच वेळ फिरत आहां, जरा घरांत येऊन विश्रांति घेतलीत तर बरें नाहीं का !

एलिझाबेथ–नको, तसें कांहीं करण्याची जरूरी नाहीं. मी कांहीं दमलें नाहीं. मामा व मामी येई तोंपर्यंत येथेंच थांबलें ह्मणजे झालें. अरे वा, तीं पहा आलींच वाटतें दोघें !

(मिस्तर गार्डिनर व मिसेस गार्डिनर प्रवेश करितात.)

मिस्तर डारसी—आपण सर्वांनीं घरांत येऊन थोडा उपहार करावा, अशी इच्छा आहे.

मिस्तर गार्डिनर—नको, इतकी तसदी घेण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. आम्ही बिऱ्हाडीं लौकरच पोहोंचूं.

(एक चाकर प्रवेश करितो.)

चाकर—धनीसाहेब, गाडी तयार आहे.

मिस्तर गार्डिनर—ठीक, आलोंच आह्मी. (डारसीकडे वळून) येतों तर.

[डारसीशिवाय सर्व जातात.

मिस्तर डारसी—(स्वगत) एलिझाबेथ बेनेट जरी चाणाक्ष आहे, तरी तिच्याशीं व तिच्या नातेवाईकांशीं हीं माणसें इकडे असेपर्यंत असें वर्तन ठेवावयाचें कीं, त्याच्यायोगानें तिला मिळून आश्चर्यचकित करून सोडावयाचें. माझ्या मागणीच्या वेळीं तिनें जी कानउघाडणी केली त्याचा उत्तम परिणाम झाला आहे हें दाखविणें आपलें कर्तव्य आहे. आणि कोण जाणे त्याचा पुढें कसा काय परिणाम होईल तो ! ठरला बेत तर. उद्यां मिस डारसी येथें येतांच तिला घेऊन यांनां भेटावयाला जाऊं, व बरोबर मिस्तर बिंगले यालाहि घेऊं. अशा रीतीनें आपणच सुरुवात केली कीं तिलाहि पण उलट भेट देणें वगैरे शिष्टाचार पाळावे लागतील, व संघटन जास्त वाढून माझ्या मनांतील वरील हेतू साध्य होतील. ठीक आहे तर, असेंच करावयाचें.

[जातो.

प्रवेश सहावा.

[**स्थळ**—लॅम्पटन खाणावळींतील एक खोली.]

एलिझाबेथ—(स्वगत) असें कसें झालें बरें ! घराहून जेनचें पत्र या पूर्वींच यावयाला पाहिजे होतें. याच खेपेला इतका उशीर कां बरें लागला ? कांहीं कमीजास्त तर नसेल ना ? लिडिया ब्रायटनला गेल्यापासून तिचें तर पत्र मला आलें नाहींच; पण घराकडूनहि तिची कांहींच हकीकत कळली नाहीं. तिनें ब्रायटनला जावें हें मला मनापासून पसंत नव्हतें. तिनें जावें असें ठरलें त्या दिवशींच मीं बाबांनां तर तें सुचविलेंहि पण होतें; पण बाबांनीं त्या वेळीं माझ्या त्या ह्मणण्याला कांहींच किंमत दिली नाहीं. ती अलीकडे फार उच्छृंखल

होऊं लागली आहे. तिच्या असल्या वर्तनानें तिलाच नव्हे तर तिच्या दुसऱ्या बहिणींनांहि जड जाणार आहे असें मीं ह्मटलें मात्र, तों माझीच थट्टा करून मलाच विचारूं लागले कीं, लिडियाच्या वर्तनामुळें ज्या तरुण पुरुषांनीं तुला नाकारिलें असे पुरुष तरी किती आहेत ! एखादी महत्त्वाची गोष्ट अशा रीतीनें थट्टेवारी नेल्यावर मग काय उपाय ? पण मला तर बाई तिची फार भीति वाटत आहे.

(एक चाकर प्रवेश करितो.)

चाकर—(पत्रें देऊन) हीं दोन पत्रें आतांच आलीं आहेत.

एलिझाबेथ—बरें आहे, जा तूं खालीं. (चाकर जातो. पत्रें पाहून) अरे, हीं तर दोन्ही जेनचीं पत्रें आहेत ! एकाच दिवशीं दोन पत्रें कशीं बरें आलीं ? (पाहून) हं, समजलें ! एक चुकून दुसरे गांवीं प्रथम गेलें होतें, असें दिसतें. असो. पहिल्यानें पाठविलेलें आधीं वाचिलें पाहिजे. (पत्र फोडून वाचते. लगेच दुसरेंहि फोडून वाचते. आणि एकदम खिन्न होते.) स्वप्नामध्यें अगर मनानें केव्हां केव्हां पुढील घडणाऱ्या गोष्टी आधीं दिसतात, त्यांतलीच आतांची स्थिति झाली ! लिडियाविषयीं मनांत विचार यावयाला व या पत्रांतहि तिचाच विषय असावयाला कशी एकच गांठ पडली ! लिडिया, हें भयंकर कृत्य तूं केलेंस ! अरे, पण मामा कोठें आहेत ?

(दाराकडे बाहेर जाण्यासाठीं ह्मणून जाते, तों मिस्तर डारसी प्रवेश करितो.)

एलिझाबेथ—महाराज, मी आपली क्षमा मागतें ! मला या क्षणाला बाहेर गेलें पाहिजे. मला मिस्तर गार्डिनर यांची आतांचे आतां भेट घेतली पाहिजे. कामच इतकें महत्त्वाचें आहे, क्षणाचाहि विलंब उपयोगी नाहीं !

मिस्तर डारसी—अरे देवारे ! काय, झालें तरी काय आहे ? मी तुह्माला फार वेळ थांबवून घेत नाहीं. परंतु हें पहा, मिस्तर गार्डिनरला बोलावयाला मी जातों, अगर तुमच्या नोकराला पाठवावा. तुह्मीं जाण्याइतकी तुमची स्थिति दिसत नाहीं !

एलिझाबेथ—आपण ह्मणतां तें कांहीं अंशीं खरेंच आहे. माझे पायच जणूं गळल्यासारखे वाटत आहेत. जॉन, अरे जॉन, इकडे ये पाहूं. (जॉन प्रवेश करितो.)

जॉन, मिस्तर गार्डिनर यांनां आतांचे आतां मीं बोलविलें आहे ह्मणून सांगून घेऊन ये.

जॉन—हा पहा, आतांच त्यांनां घेऊन येतों.

[जातो.

मिस्तर डारसी—(स्वगत) काय विलक्षण स्थिति हिची झाली ही! प्रकृतींत एकदम एवढा फरक कशानें झाला! अशा स्थितींत हिला टाकून जाणें शक्य नाहीं. (उघड) तुमच्या बाईला[१] हांक मारूं का? क्षणभर बरें वाटावें ह्मणून कांहीं पेय घेतां का? एक ग्लासभर सरबत आणूं का? तुह्मी फार थकलेल्या दिसतां.

एलिझाबेथ—आपली फार आभारी आहें! नको बरें, मला कांहीं—मला स्वतःला कांहींच झालें नाहीं. माझी प्रकृति ठीक आहे. घराकडील एक भयंकर बातमी आतांच लाँगबोर्नहून आलेली कळली, त्यामुळें माझी ही अशी एकाएकीं अवस्था झाली आहे. (रडूं लागते.)

मिस्तर डारसी—(स्वगत) काय बरें असावें! बातमी तर अतिशय वाईट असलीच पाहिजे. एरव्हीं हिला इतकें दुःख होणार नाहीं. (उघड) मला समजेल का काय बातमी आहे ती?

एलिझाबेथ—मला आतांच जेनचें पत्र मिळालें, त्यांत ही भयंकर बातमी आहे. ही बातमी गुप्त रहाणें शक्य नाहीं. माझ्या अगदीं धाकट्या बहिणीनें आपल्या स्वजनांस सोडून दिलें, ती पळून गेली! तिनें आपल्याला एका गृहस्थाच्या–पण मोघम तरी कशाला—मिस्तर विखमच्या जाळ्यांत अडकवून घेतलें! तीं दोघेंहि ब्रायटन सोडून निघून गेलीं आहेत,—पुढें काय होईल तें तुह्माला सांगावयाला नकोच! विखमला आपण चांगलेच ओळखितां. आमच्या लिडियाजवळ पैसा नाहीं. आमचीं संबंधी माणसें मोठीं नाहींत. सारांश, त्यांचें लग्न जुळवून आणतां येईल असा योग मुळींच दिसून येत नाहीं. ती आह्मांला कायमची अंतरली ह्मणावयाची! हा प्रकार माझ्या हातून टळला असता असा विचार मनांत आला ह्मणजे काय होतें ह्मणून सांगूं? कारण, मला तो मनुष्य कसा होता हें पूर्णपणें कळलें होतें. त्याच्याविषयीं मला जें जें कांहीं समजलें होतें, त्याचा थोडासा जरी भाग मी आपल्या घरांत बोललें असतें तर—त्याच्या

१. घरांतील बायकांच्या कामाकरितां ठेवलेली मोलकरीण.

स्वभावाची माहिती जर सर्वांनां झाली असती तर–असा प्रकार खास घडताना! परंतु आतां त्याचें काय? आतां हे विचार इतक्या उशिरां सुचून उपयोग काय?

मिस्तर डारसी—ही बातमी ऐकून खरेंच मला अत्यंत दुःख होत आहे. किती तें सांगतां येत नाहीं. पण ही बातमी खरी आहे का?

एलिझाबेथ—अहो, अगदीं खरी! रविवारीं रात्रीं त्यांनीं ब्रायटन सोडलें, आणि त्यांचा थेट लंडनपर्यंत शोध लागला; पण त्यापुढें कांहीं पत्ता नाहीं. तीं स्कॉटलंडमध्यें गेलीं नाहींत हें अगदीं नक्की!

मिस्तर डारसी—त्यांनां शोधण्याविषयीं आतांपर्यंत काय केलें आहे?

एलिझाबेथ—बाबा लंडनला गेले आहेत, आणि आमच्या मामांनींहि तावडतोब तिकडे यावें ह्मणून जेननें लिहिलें आहे. ते गेल्यानें बाबांनां बरीच मदत होईल, ह्मणून आह्मी तावडतोब जाणार.

मिस्तर डारसी—असें तर खरेंच. तावडतोब तर गेलेंच पाहिजे.

(विचार करीत इकडे तिकडे फिरतो.)

एलिझाबेथ–(स्वगत) यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें ह्मणजे यांच्या अंन्तःकरणांतील विचार तेव्हांच कळून चुकतील. अरेरे! यांच्या चेहऱ्याकडे माझ्यानें पहावतच नाहीं! खरेंच, काय बरें यांच्या मनांत घोळत असेल? डोळ्यांनों, तुह्मीं जरी यांच्या चेहऱ्याकडे पहाण्याचें साफ नाकारिलेंत, तरी माझी मीच अंन्तर्दृष्टीनें सर्व कांहीं पहातें बरें! अहाहा! यांचा तो हृत्पटल कसा स्पष्ट दिसत आहे! अरे, पण याच्यावर काय बरें हें रेखाटलेलें दिसत आहे? माझें नांव तर नाहींना? नको–पण वाचण्याचा प्रयत्नच करूं नये–त्यापासून दुःखच होणार आहे! यांनां यावेळीं किती दुःख होत असेल. बुडत्याचा पाय खोलांत ह्मणतात त्याप्रमाणें आधींच माझ्या वाईट स्थितींत ही एक मोठी थोरली भर पडली! हीन कुळाबद्दल आधींच जें यांच्या मनाला खात होतें त्यांत हा असा प्रकार!

मिस्तर डारसी–एलिझाबेथ, मीं येथून निघून जावें असें मनापासून तुह्माला वाटत असेल, आणि मलाहि पण येथें थांबण्याला सांगण्यासारखी सबब नाहीं! केवळ खरी खरी पण निरपेक्ष अशी काळजी! या दुःखाचे निवारणार्थ माझ्या हातून कांहीं घडेल तर परमेश्वराचा मोठा प्रसाद झाला, असें होईल. परंतु भलत्याच आशेला मी तुह्माला लावीत नाहीं. आणि न जाणों, जाणूनबुजून

तुमच्यावर उपकार व्हावे ह्मणूनच मी असें कृत्य करीत आहें असेंहि वाटण्याचा संभव आहे. तेव्हां मला जास्त कांहींच बोलतां येत नाहीं. पूर्वीच्या बेताप्रमाणें आज पेंबरलेला जेवायला तुह्मी कोणीच येणार नाहीं तर ?

एलिझाबेथ--असें तर खरेंच. माफी मागून मिस डारसीला सांगा कीं, कांहीं जरूरीच्या कामामुळें आह्मांला गांवीं जाणें भाग पडलें. शक्य असेल तोंपर्यंत हें दुःखदायक सत्य गुप्त ठेवा. कारण, तें फार वेळ गुप्त राहील असें मला तरी वाटत नाहीं !

मिस्तर डारसी—त्याची तुह्माला काळजी नको ! ईश्वर करो आणि याचा शेवट तरी गोड होवो. बरें तर येतों मी. मिस्तर व मिसेस गार्डिनर यांनां माझे नमस्कार सांगावे. येऊं तर मी ?

[एलिझाबेथकडे सखेदाश्चर्यानें पहात जातो.

एलिझाबेथ—(स्वगत) गेले का निघून ते ! यांच्या वागणुकींतील हा विलक्षण फरक पाहून आतां मला यांचा जास्तच हेवा वाटूं लागला आहे ! हा फरक झाला नसता तर फार बरें झालें असतें ! जरी या घटकेपूर्वी माझ्याविषयीं यांच्या अन्तःकरणांत प्रेम असलें तरी तें या गोष्टीनें समूळ खणून जाईल, यांत काडीइतकी शंका नाहीं ! काय हा दैवयोग ! आह्मी दोघें एकमेकांशीं अशा रीतीनें बोलूं, अशा प्रेमळ अन्तःकरणानें एकमेकांच्या भेटी घेऊं, असें संभवनीय तरी वाटत होतें का ? या डारबीशायरमधील भेटी अशा तऱ्हेनें होणार असें जर कोणीं पूर्वी सांगितलें असतें तर त्यावर क्षणभरसुद्धां मीं विश्वास ठेविला नसता ! आमची ओळख झाल्यापासून आजपर्यंतच्या आमच्या भेटीचें जर सिंहावलोकन करून पाहिलें तर त्यांत किती विसंगतपणा, किती तऱ्हेवाईकपणा दिसून येईल ! ज्या अन्तःकरणवृत्तीमुळें पूर्वी मला आनंद झाला असता व आतांहि फार बरें वाटलें असतें, त्या माझ्या अन्तःकरणवृत्तींत फरक झालेला पाहून मला फारच दुःख होत आहे. खरेंच, यांच्या अंगच्या थोर गुणांकडे पाहिलें म्हणजे आपलें प्रेमस्थान ईश्वरानें हेंच निर्माण केलें आहे, असें अंतःकरणापासून मला वाटूं लागलें आहे. हा जो माझ्यामध्यें फरक झाला आहे त्या फरकाबद्दल मी जगाला काय बरें सांगूं ? कृतज्ञता आणि सद्गुणांची जाणीव हींच जर प्रेमाचीं खरीं कारणें असतील, तर मला कांहीं तरी बोलतां येईल.

जगाचा मजवर फारसा रोष होणार नाहीं. पण जर अशा कारणांनीं उत्पन्न झालेली प्रीति अनैसर्गिक व अप्रयोजक ठरेल, व केवळ दृष्टादृष्ट होतांच– एक शब्द उच्चारिला नाहीं तोंच उत्पन्न होणारी प्रीति ही खरी खरी प्रीति असेल, तर मला बाहेर तोंडच काढावयास नको ! फार तर हा दुसरा प्रयोग मिस्तर विखमच्या बाबतींत माझ्या हातून घडून आला; त्यांत मला अपयश आलें असें म्हणतां येईल. खरा प्रकार कोणचा कां असेना, ते निघून गेल्यानें मला अत्यंत दुःख होत आहे. लिडियाच्या दुःष्ट कृत्याच्या ह्या पहिल्याच हप्त्याकडे पाहिलें, म्हणजे पुढें काय होणार याची नुसती अटकळहि करितां येत नाहीं. लिडिया ! काय बाई केलेंस हें ! तुझ्या हातून असलें कृत्य घडेल असा किंचित् संशय जरी आला असता, तरी तुझ्याबद्दल विशेष खबरदारी घेतली गेली असती. मी केव्हां एकदा घरीं जाईन, असें मला झालें आहे. एकव्या जेनवर सर्व भार पडला आहे. (ऐकलेंसें करून) अरे, खालीं मामा आले वाटतें. चला तर, तिकडे जाऊन सर्व हकीकत कळवून एकदाची ताबडतोब निघण्याची तयारी करूं.

[जाते.

[पडदा पडतो.]

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

[**स्थळ**—लंडन. ग्रेसचर्च स्ट्रीट. मिस्तर गार्डिनर व मिसेस गार्डिनर प्रवेश करितात.]

मिसेस गार्डिनर—मला कीं नाहीं, तें पत्र वाचून फारच आश्चर्य वाटलें. केंटशायरमध्यें आपण असतांना त्या दोघांचें तें वर्तन, विशेषत: डारसीचें तें वर्तन पाहून आपणाला संशय हा आलाच होता. निदान डारसीच्या मनोविकाराबद्दल तरी खात्री होऊन चुकली होती. असें असून एलिझाच जेव्हां तिऱ्हाईत इसमाजवळ डारसीच्या हालचालीविषयीं माहिती विचारते, तेव्हां त्याबद्दल चमत्कारिक वाटणें साहजिक नव्हे का ?

मिस्तर गार्डिनर—मीहि त्या पत्राविषयीं विचार करीत आहें. आपल्या कल्पनेप्रमाणें खरें झटलें तर लिडियाच्या लग्नासंबंधी मिस्तर डारसीनें जी खटपट केली व जी झीज सोशिली, त्याची हकीकत त्यानें आपण होऊन कळविणें रास्त होतें; परंतु या इच्या पत्रानें आपली कल्पना–एलिझाबेथचे बाबतींत तरी–खरी ठरूं पहात नाहीं.

मिसेस गार्डिनर—होय, असें खरें. मिस्तर डारसीचे मनांत तिच्याविषयीं प्रेम उत्पन्न झालेलें आहे, हें अगदीं खास; परंतु एलिझाबेथविषयीं मात्र शंका उत्पन्न होते. आपण जेव्हां लॅम्पटनहून निघालों, त्यावेळीं तिनें लिडियाची सर्व हकीकत त्याला सांगितली. त्यामुळें तर माझ्या मनाची पक्की खात्री झाली होती. नाहींतर असें पहा, ती गोष्ट कोणी कळकळीच्या माणसाखेरीज दुसऱ्या कोणाजवळ आपण होऊन बोलेल का तरी ?

मिस्तर गार्डिनर—ती गोष्ट खात्री वाटण्यासारखी होती खरी; परंतु आतां काय त्याचें ? तें असो; पण तुम्हीं तिला उत्तर लिहिलेंत कीं नाहीं ?

मिसेस गार्डिनर—हें काय विचारणें ! मीं पत्र वाचतां क्षणींच उत्तर लिहून टाकिलें. अशा पत्राची का कोणी उपेक्षा करणार आहे ?

मिस्तर गार्डिनर—अगदीं सविस्तर हकीकत लिहिली आहे, कीं पुनः आपलें तिला घोटाळ्यांत घालण्यासारखें लिहिलें आहे ?

मिसेस गार्डिनर—म्हणजे माझें लिहिणें आपलें नेहमींच घोंटाळ्याचें असतें, असेंच ह्मणावयाचेंना ? होय बाई, तसेंका ह्मणाना. आम्हा बायकांनां कोठें पत्रें तरी लिहितां येतात का ?

मिस्तर गार्डिनर—अहो पत्र लिहिणेंचसें काय, पण उद्यां तुम्ही बायका राज्य करण्यालाहि तयार व्हाल व आपणांला पार्लमेंटांत जागा हवी ह्मणून सुद्धां भांडत सुटाल !

मिसेस गार्डिनर—उद्यांचें राहूं द्या, पण आज नाहीं शंभर वर्षांनीं असा काळ येईल कीं, ही आपली आजची थट्टा खरी होऊं पाहील !

मिस्तर गार्डिनर—पण माझ्या प्रश्नाचें उत्तर नाहीं मिळालें ! सविस्तर हकीकत लिहिली आहे ना तिला ?

मिसेस गार्डिनर—अगदीं सविस्तर हकीकत लिहिली आहे हो !

मिस्तर गार्डिनर—फार उत्तम ! कारण, आजपर्यंत मिस्तर बेनेट व त्यांच्या घरच्या मंडळींनां असेंच वाटत आहे, कीं, लिडियाच्या लग्नाच्या बाबतींत तिला शोधून काढण्यापासून तों थेट लग्नविधि उरकून जाईपर्यंत सर्व खटपट मींच केली; सर्व पैसा आह्मीच खर्च केला; पण हें आमचें सिंहाचें कातडें, या पत्रानें दूर केलें जाईल व खरें स्वरूप बाहेर पडून योग्य त्या माणसाला यशाचा वांटा मिळेल. खरेंच, या लिडियाच्या बाबतींत विचार केला तर मिस्तर डारसीनें जर या गोष्टींत लक्ष घातलें नसतें, तर झाली अशी गोष्ट कधींच घडतीना, व मिस्तर बेनेटच्या घराण्यास निरंतरचा काळिमा लागला असता !

मिसेस गार्डिनर—यांत काय संशय ? एक तर मिस्तर विखमचा खरा स्वभाव माहित असलेला इसम त्याच्याशिवाय दुसरा कोणी नाहीं ह्मटलें तरी चालेल. खेरीज द्रव्याचीहि अनुकूलता त्याच्या इतकी इतरांच्या ठिकाणीं असणें दुरापास्तच !

मिस्तर गार्डिनर—पैशाचें राहो–आपल्यावर पडलें असतें तरी कुटुंबाचे अब्रूकरितां पैशाकडे पाहून चाललें नसतें; पैसा कसा तरी तयार केलाच असता ! पण मिस्तर डारसी इतकी खटपट, इतके अविश्रांत श्रम, इतकी मानहानि करून घेऊनहि इष्टकार्य साधण्याइतकी चिकाटी सर्वांनांच साधावयाची नाहीं. याच्या

मनांत वसत असलेलें प्रेमच कारणीभूत झालें असलें पाहिजे, व ह्मणूनच मी थोडीशी माघार घेत आलों. अशा शुद्ध मनोविकाराच्या आड आपण तरी कां यावें ?

मिसेस गार्डिनर—तें तर उघड आहे.

मिस्तर गार्डिनर—खरेंच, उत्तरेस जाण्यापूर्वी लिडियाला मिस्तर बेनेट घरीं बोलावितील असें मला वाटलें नव्हतें!

मिसेस गार्डिनर—मला तर खात्रीच वाटत होती. पण असेंहि वाटतें कीं, तिला घरीं येण्याची परवानगी मिळण्याला जेन व एलिझाबेथ याच कारणीभूत झाल्या असतील. एरव्हीं मिसेस बेनेटच्या विनंतीवरून ती गोष्ट खास घडतीना!

मिस्तर गार्डिनर—क्षमा करणें हें आपल्या धर्माचें तत्व आहे, व त्याला अनुसरून मिस्तर बेनेट वागले हें एक चांगलेंच झालें.

[जातात.

प्रवेश दुसरा.

[**स्थळ**—लॉंगबोर्न. मिसेस बेनेट, मिसेस फिलिप्स, एलिझाबेथ आणि जेन वसल्या आहेत, असा प्रवेश.]

मिसेस बेनेट—आपलीच मंडळी आपल्याला सोडून दूर निघून गेल्यानें किती दुःख होतें, याचा अनुभव आज चांगलाच आला. मला तर आज कसेंसेंच होत आहे!

एलिझाबेथ—मावशी, आईच्या या ह्मणण्याचा अर्थ समजला का तुह्मांला? आज आमची लिडिया उत्तरेकडे आपल्या नवऱ्याच्या रोजगारावर निघून गेली, त्यामुळें आईला इतकें वाईट वाटत आहे; पण ती तिकडे जाणें अगदीं साहजिक नाहीं का? आई, पाहिलेंसना आतां, मुलींचें लग्न झालें ह्मणजे काय होतें तें. तुझ्या बाकीच्या चौघींचीं लग्नें झालेलीं नाहींत, हें एका अर्थी बरेंच आहे, असेंच तूं मानिलें पाहिजेस!

मिसेस बेनेट—तसेंच केवळ नाहीं! लिडिया जी मला सोडून गेली ती कांहीं तिचें लग्न झालें ह्मणून नव्हे, तर तिच्या यजमानाचें सैन्य फार दूरवर असल्यामुळें ती इतक्या लांबीच्या पल्ल्यावर गेली. तेंच सैन्य जर जवळपास इकडेसच असतें तर ती कांहीं इतक्या लौकर तिकडे जातीना. खरेंच, ती गेल्यामुळें आतां हे दिवस कीं नाहीं, अगदीं कंटाळवाणे जाणार आहेत.

मिसेस फिलिप्स—तुझ्या मनाला विरंगुळा लागेल, असें कांहीं मला सांगतां येण्यासारखें आहे.

मिसेस बेनेट—तें काय बरें! कांहीं नवल विशेष आहे कीं काय? कारण, बातमी काढण्यांत तुझा नेहमींच पहिला नंबर असावयाचा!

मिसेस फिलिप्स—नेदरफील्डच्या मालकानें शिकारीकरितां यावयाचें ह्मणून बंगला साफसूफ करून ठेवण्याबद्दल आपल्या नोकरांनां कळविल्यास दोन-तीन दिवस झाले, तेव्हां अर्थातच मिस्तर बिंगले येथें लौकरच येणार यांत संशय दिसत नाहीं.

(एलिझाबेथ जेनकडे पहाते.)

मिसेस बेनेट—खरेंच कीं काय? एकूण मिस्तर बिंगले पुनः येणार तर इकडे? वा:, फारच चांगलें! त्यांत ह्मणजे कांहीं मला विशेष वाटतें असेंच केवळ नव्हे. तुला ठाऊकच आहे कीं, आह्मांला काय करावयाचें आहे त्याच्याशीं? मला तर त्याला पहावा असेंसुद्धां वाटत नाहीं! पण जर नेदरफील्ड त्यांनां आवडत आहे तर त्यांनीं खुशाल यावें, आह्मांला त्यांत आनंदच आहे. आणि कुणाला ठाऊक पुढें काय होतें तें! समजा कांहीं झालें, तरी आपला त्यांत थोडाच फायदा आहे! मीं मागेंच ठरविलें आहे कीं, त्या बाबतींत आतां अक्षरसुद्धां काढावयाचें नाहीं–पण खरेंच ते येणार का?

मिसेस फिलिप्स—मी सांगतें तें अगदीं खरें आहे. खुद्द मिसेस निकोल्सनें मला ही बातमी खरी असल्याचें सांगितलें. ती काल रात्रीं मेरिटन-मधून कोठेंशी जात होती. मीं मुद्दाम तिला विचारलें व तिनें ऐकलेली बातमी खरी असल्याचें सांगितलें. मिस्तर बिंगले हे बुधवारीं–फार झालें तर गुरुवारीं येणार आहेत.

जेन—(स्वगत) इतका वेळ मीं स्वस्थपणानें यांचें भाषण ऐकिलें खरें, पण ते येणार हें ऐकून माझ्या मनाला कसेंसेंच वाटूं लागलें आहे!

मिसेस फिलिप्स—अरे, पण उशीर बराच झाला, येतें मी आतां.

मिसेस बेनेट—निघालीस वाटतें! चल मीहि पण तुझ्याबरोबर जरा बाहेर तुला पोहोंचवायाला येतें.

(मिसेस बेनेट व मिसेस फिलिप्स जातात.)

जेन—(एलिझाबेथकडे वळून) आतांच आपल्याला मावशीनें जी बातमी सांगितली ती ऐकतांच तूं माझ्याकडे पाहिलेंस, हें माझ्या ध्यानांत आलें होतें; आणि मलाहि पण ती बातमी ऐकून जरा चमत्कारिक वाटलें ! क्षणभरच, पण मी गोंधळल्यासारखी झालें. माझ्याचकडे लोकांनीं कां पहावें, हेंच मला कळत नाहीं. या बातमीनें मला आनंदहि होत नाहीं व दुःखहि वाटत नाहीं. ते शिकारी-करितां येणार ह्मणजे एकटेच येणार हें त्यांतल्या त्यांत चांगलें आहे. कारण, मग त्यांची व आपली वारंवार गांठ पडणार नाहीं. माझें मलाच भय वाटतें असें नाहीं, पण इतर इसमांच्या बोलण्यानें मला त्रास होण्याचा संभव आहे.

एलिझाबेथ—तूं काय बोलत आहेस हेंच मला नीट समजत नाहीं ! बाकी तूं ह्मणतेस तसेंच खरें धरून चाललें पाहिजे. (स्वगत) आणि मला तें अक्षरशः खरेंहि वाटलें असतें. परंतु डारबीशायरमधली मिस्तर बिंगले यांची वागणूक लक्ष्यांत घेतां ते केवळ शिकारीसाठींच इकडे आले असावेत, असें मला वाटत नाहीं. दुसऱ्याहि एखाद्या हेतूनें ते आले असावे. निदान इकडे येण्याला त्यांच्या स्नेह्याची त्यांनां आडकाठी आलेली नसावी !

जेन—(पाहिलेंसें करून) लिझी, बाबा व आई इकडेच येत आहेत. तर आपण येथून दूर जाऊं चला.

(जेन व एलिझाबेथ जातात, मिस्तर व मिसेस बेनेट येतात.)

मिसेस बेनेट—ऐकलें का, मिस्तर बिंगले ह्मणे पुनः येथें येणार ! ते येतांच त्यांची गांठ घेतली पाहिजे, समजलें का ?

मिस्तर बेनेट—तें कांहीं नाहीं बोवा ! तुमच्या आग्रहावरून गेले सालीं मी त्यांनां भेटावयाला गेलों होतों; तुमचा अदमास—नव्हे अशी खात्रीच होती कीं, मीं तसें केलें कीं, ते आपल्या कोणच्या तरी मुलीला मागणी घालतील ! पण त्यांतलें कांहींच घडून आलें नाहीं ! तेव्हां आतां रिकामटेकड्यासारखा पुनः आतां मी कांहीं जाणार नाहीं !

मिसेस बेनेट—पण चालीरीतींनां अनुसरून तर वागलें पाहिजे ना ? सर्व शेजारी मंडळी आपण होऊन त्यांनां भेटावयास जातील, आपण मात्र जावयाचें नाहीं, असें कसें ह्मणतां ?

मिस्तर बिंगले—असल्या चालीरीतींचा मला फार तिटकारा आहे ! जणूं काय आह्मांलाच त्यांच्या संगतीची जरूरी आहे ! त्यांनां जर आमची संगति

पाहिजे तर त्यांनीं होऊन आमच्या येथें यावयाला कोणची हरकत आहे? आह्मी कोठें राहतों हें त्यांनां ठाऊक आहे. शेजारी लोक जेव्हां जेव्हां येतील व जेव्हां जेव्हां जातील, तेव्हां तेव्हां त्यांच्या भेटी घेत बसून वेळ दवडण्यांत मला कांहीं अर्थ दिसत नाहीं !

मिसेस बेनेट--आपण भेटावयाला न गेल्यानें अगदीं गैरशिस्त दिसेल ! (स्वगत) नाहीं जाणार तर काय करावयाचें? पण मी त्यांनां मेजवानीला मिळून बोलावणारच ! मिसेस लॉंग व गोल्डींगज् यांनां मेजवानीला बोलवावयाचें आहेच; तेव्हां त्या दिवशीं त्यांनां बोलविल्यानें अगदीं नेमकी मंडळी होईल.

(मिस्तर व मिसेस बेनेट जातात. एलिझाबेथ व जेन येतात.)

जेन—लिझी, खरें बोलावयाचें तर ते येणार या गोष्टीमुळेंच मला फार दुःख होऊं लागलें आहे. त्यांत विशेष कांहीं नाहीं. मी केवळ तिऱ्हाईत या दृष्टीनेंच त्यांच्याशीं वागेन. तरी पण वारंवार त्यांच्यासंबंधीं जें बोलणें कानीं येईल तें मला सहन करवणार नाहीं ! आईचा हेतु फार चांगला आहे, यांत शंका नाहीं; परंतु तिच्या बोलण्यानें मला किती दुःख होतें, याची तिला कल्पनाहि नाहीं ! नेदरफील्डमधून ते निघून गेले ह्मणजे तो दिवस मी सुखाचा मानीन !

एलिझाबेथ--तुला बरें वाटेल असें कांहीं तरी मला या वेळीं जर सांगतां आलें असतें, तर फार बरें झालें असतें. तुझें तुलाच समाधान करून घेतलें पाहिजे. ज्याला दुःख होतें त्याला धीर धर ह्मणून सांगावें लागतें. पण तुझी गोष्टच निराळी. तूं धीराची केवळ मूर्तीच आहेस. तुला ज्यास्त काय सांगणार ?

[जातात.

प्रवेश तिसरा.

[**स्थळ**—लॉंगबोर्न. मिसेस बेनेट प्रवेश करिते.]

मिसेस बेनेट—(स्वगत) मिस्तर बिंगले नेदरफील्डला आल्यानंतर तिसरेच दिवशीं आपण होऊन आह्मांला भेटावयास आलेले पाहून मला बाई किती तरी आनंद झाला ! पण त्यांच्याबरोबर पाहिलें तों आपला त्यांचा तो स्नेही—तो गर्विष्ट गृहस्थ—डारसी हा आपला होताच ! मिस्तर बिंगले यांचा स्नेही ह्मणून मला त्याचा नाखुषीनें कां होईना, परामर्ष घेणें भाग पडलें ! मिस्तर बिंगले

हे शिकारीसाठीं आले होते हें आधींच समजलेलें असल्यामुळें, प्रथमच्याच भेटीला मीं त्यांनां आमच्या जंगलांत शिकारीला येण्याविषयीं निमंत्रण देऊन टाकिलें. येवढ्यानेंच काय झालें! ते जेव्हां जावयास निघाले तेव्हां त्यांनां गुदस्तां त्यांनीं मेजवानीस येण्याचें कबूल केलें होतें त्याचें स्मरण देऊन तेंहि निमंत्रण देऊन मोकळी झालें, आणि काय मौज पहा, त्यांनीं पण लगेच तें मेजवानीचें आमंत्रण स्वीकारून त्या पुढच्याच मंगळवारीं येण्याचें कबूल केलें. अहाहा! तो मेजवानीचा बेत माझ्या मतें फारच उत्तम वठला. त्या दिवशीं मिस्तर बिंगले व जेन एकत्र येतील अशी एकहि संधि मीं वायां दवडूं दिली नाहीं. त्या दिवसानंतर मिस्तर बिंगले हे एकटेच आमच्या घरीं येऊं लागले, हेंहि एकपरी बरेंच झालें. कारण, त्यांचा तो स्नेही–तो डारसी, ह्मणे आठदहा दिवसांचे बोलीनें लंडनला कांहीं कामानिमित्त गेला. अशा रीतीनें त्यांचें दळण-वळण वाढल्यानें कां बरें आनंद होऊं नये? जेनला मिस्तर बिंगले पति मिळणार असें मला तर खास वाटूं लागलें आहे! आज तर मुद्दाम शिकारीला जाण्याचा बेत करविला.मिस्तर बेनेट व ते मिळून दोघेहि शिकारीला गेले होते. परत आल्यावर अर्थातच त्यांनां जेवणाला राहून घेतलें. ते व जेन एके ठिकाणीं असतील अशी योजना मीं आतांच करून त्या दोघांनां त्या पलीकडच्या हॉलमध्यें एकटीं सोडून इकडे आलें तर खरी. आतां जरा वर जाऊन आपल्या खोलींत स्वस्थ बसावें. लिझी पण वरच पत्र लिहावयाला म्हणून गेली आहे. बहुधा ती लौकर खालीं येणार नाहींच.

[जाते.

प्रवेश चवथा.

[**स्थळ**—तेंच. मिस्तर बिंगले व जेन एका उंच जागीं उभीं असून बोलत आहेत, व एलिझाबेथ खालीं एका बाजूस उभी आहे, असा प्रवेश.]

एलिझाबेथ—अगबाई, हीं दोघें तर अगदीं एकांतांत बोलत आहेत असें दिसतें! या वेळीं कशाला ग बाई मी येथें आलें! किती अप्रयोजक करणें हें!

[मिस्तर बिंगले व जेन एलिझाबेथला पाहून आश्चर्यचकित होतात. ती जाऊं लागते इतक्यांत मिस्तर बिंगले जेनच्या कानांत कांहीं गोष्ट सांगून निघून जातो.

जेन—(एलिझाबेथजवळ येऊन तिला मिठी मारिते.) लिझीपासून मला कांहीं चोरून ठेववत नाहीं! लिझी, मी सुखाच्या केवळ पर्वतावर बसलें आहें,

असें मला वाटत आहे. खरेंच, इतकें सौख्य माझ्यानें सहन तरी कसें करवेल? आणि असलें सौख्य मला मिळावें अशी माझी योग्यता तरी कोठें आहे? खरेंच, सगळ्यांनांच असें सौख्य कां बरें मिळत नाहीं?

एलिझाबेथ—जेन! तुझ्या ह्या भाषणानें मला फारच आनंद झाला व तुझें असें कल्याण झालेलें पाहून मला किती संतोष वाटत आहे ह्मणून सांगू! शब्दानें तो व्यक्तच करितां यावयाचा नाहीं! तूं धन्य आहेस, एवढेंच मी ह्मणतें. यांतच कायतें समज! अग, तुह्मी दोघें ह्मणजे एक अद्वितीय जोडपें आहांत बरें! इतक्या समवृत्तीचीं दोन माणसें विवाहबंधनानें बद्ध झालेलीं कोठेंच आढळणार नाहींत! ईश्वरानें तुझें कल्याण केलें, हेंच खरें!

जेन—बरें पण, आधीं आईला ही बातमी मीच प्रथम सांगून येतें, मग आपण स्वस्थपणें बोलत बसूं. तिचे मार्ग कसे कां असेनात, पण तिच्या मातृवात्सल्याची उपेक्षा माझ्यानें तरी करवत नाहीं! माझ्याच तोंडून तिनें ही गोष्ट ऐकिली पाहिजे. ते बाबांकडे आतांच गेले आहेत. लिझी, आतां मी जें कांहीं कळविणार, त्यानें आपल्या कुटुंबांतील माणसांनां किती तरी आनंद होणार आहे.

[जेन जाते.

एलिझाबेथ—(स्वगत) सरते शेवटीं जी गोष्ट घडावी म्हणून अन्तःकरणपूर्वक मला वाटत होतें, ती गोष्ट इतक्या लौकर व अशा सहज रीतीनें घडलेली पाहून मनाला भारीच आनंद होत आहे! शेवटीं त्यांच्या त्या स्नेह्याच्या धूर्तपणाचा व त्यांच्या त्या बहिणींच्या खोटेपणाचा व युक्तीप्रयुक्तीचा असा परिणाम झाला ना! अत्यंत सुखदायक, शहाणपणाला उचित, आणि सदसद्विवेकबुद्धीला पटेल असाच हा गोड शेवट झाला! (पाहिलेंसें करून) अरे, पण हें इकडे कोण येत आहे? मिस्तर बिंगलेच आले!

(मिस्तर बिंगले प्रवेश करितो.)

मिस्तर बिंगले—तुमची बहीण कोठें आहे?

एलिझाबेथ—ती आईकडे माडीवर गेली आहे. इतक्यांतच इकडे येईल.

मिस्तर बिंगले—आपल्या भावी संबंधानें तुह्मांला आनंदच होईल, नाहीं का?

एलिझाबेथ—हें काय बाई विचारणें! माझ्या बहिणीचें मोठें भाग्य ह्मणून आपल्यासारखें रत्न तिला लाभलें!

मिस्तर बिंगले—मला ही उपमा शोभत नाहीं ! तुमच्या बहिणीलाच ती जास्त शोभते. खरेंच, एलिझाबेथ, तुमच्या बहिणीची योग्यता कांहीं सामान्य नाहीं. मला पूर्ण खात्री आहे कीं, आमच्या ह्या संबंधानें उभयतांनांहि खरें सुख प्राप्त झाल्यावांचून राहणार नाहीं.

[जातात.

प्रवेश पांचवा.

[**स्थळ**—तेंच. मिस्तर बेनेटच्या बंगल्याच्या बाजूकडील एक आंबराई.
लेडी कॅथेराईन प्रवेश करिते.]

लेडी कॅथेराईन—ठरलेल्या बेताप्रमाणें आह्मी येथें येऊन दाखल तर झालोंच. मला नाहीं वाटत, ही पोरगी ह्मणजे आमच्या ह्मणण्याच्या बाहेर जाईल! मनांत योजिल्याप्रमाणें हिच्याजवळून वचन घेऊन ह्या वाटत असलेल्या संकटाचा नाश केला पाहिजे. बरें पण, हिला मीं आंबराईंत चल ह्मणून सांगितलें, ती येते ह्मणून ह्मणाली, पण अझून कां बरें येत नाहीं ? (एलिझाबेथ प्रवेश करिते.) वा, आलीस का ? फार चांगलें. मिस बेनेट, आह्मी येथें कां आलों याचें कारण तुला समजून चुकलेंच असेल. तुझ्या मनाला तें पक्कें उमजलें असेल. तुझ्या अन्त:करणांतहि त्याचा प्रकाश स्पष्ट पडला असेल—

एलिझाबेथ—(आश्चर्यानें) बाईसाहेब, आपण अगदीं चुकत आहां ! आमच्या ह्या गरीब झोंपडीला दर्शन देण्याचे श्रम आपण कां घेतलेत, हें कांहीं कळत नाहीं. मी तर संशयानें अगदीं भांबावून गेलें आहें.

लेडी कॅथेराईन—मिस बेनेट,हा असला चावटपणा आमच्याशीं चालावयाचा नाहीं, समजलीस ! आणि तूं जरी सर्वच गोष्टी थट्टेवर नेण्याचें मनांत आणिलेंस, तरी आम्हाला तसें करणें नाहीं. आंत एक, बाहेर एक, असें आह्माला मुळींच आवडत नाहीं!आमचा स्वभाव खुला असल्याबद्दल सर्वत्र ख्याती झालेली आहे,आणि हल्लींच्या प्रसंगीं ज्या कांहीं गोष्टी करणें त्या फारच मोकळ्या मनानें व शुद्ध अन्त:करणानें केल्या पाहिजेत. ऐक तर आमचें येण्याचें कारण. दोन दिवसांपूर्वी फारच भयंकर अशी एक बातमी आह्माला समजली. असें कळलें कीं, तुझ्या बहिणीला फार उत्तम स्थल मिळालें, एवढेंच नव्हे, तर तुझाहि संबंध मिस्तर डारसीबरोबर

—माझ्या भाच्याबरोबर—हजार हिशानें जुळणार. अर्थात् ही बातमी निवळ खोटी असली पाहिजे, असें मला तेव्हांच वाटलें. तरी पण या बाबतींत आमचे स्वतःचे विचार कसे काय आहेत हें तुला ताबडतोब कळवावें असें मनानें घेतलें, व ह्मणूनच आह्मी येथें आलों.

एलिझाबेथ—जर आपणाला ती बातमी खोटीच असली पाहिजे असें नक्की वाटत होतें तर आपण इकडे येण्याचे व्यर्थ श्रम घेतलेत असेंच नाहीं का होत?

लेडी कॅथेराईन—सर्वांनां या बातमीच्या मुळाशीं तथ्यांश कांहींच नाहीं हें ताबडतोब समजलें पाहिजे व तें कार्य ह्या भेटीनें होणार आहे.

एलिझाबेथ—बाईसाहेब, यानें तर उलट परिणाम होणार आहे. जर तशी बातमी खरोखरच उठली असेल तर त्याचें या कृत्यानें दृढीकरणच होणार आहे!

लेडी कॅथेराईन—वाहवा ग वाहवा! काय ह्मणे बातमी उठली असली तर! जणूं काय, तुला त्यांतलें कांहींच माहित नाहीं! मिस बेनेट, असें वेड्याचें सोंग पांघरून भागत नसतें. किती ढोंग हें! तुम्हींच नाहींका मुद्दाम अशी बातमी पसरविलीत? सर्व ठिकाणीं अशी बातमी पसरली असतां तुह्मांला ती नाकबूल करणें शक्य नाहीं!

एलिझाबेथ—माझ्या तरी कानावर अशी बातमी कधींच आलेली नाहीं!

लेडी कॅथेराईन—बरें पण, अशा बातमीला मुळांत कांहीं आधार नाहीं, असें स्पष्टपणें सांग बरें एकदाच?

एलिझाबेथ—बाईसाहेब! आपल्या इतका मनाचा मोकळेपणा माझ्या अंगीं नाहीं बरें! आपण वाटेल ते प्रश्न करावेत, त्याचीं उत्तरें देणें माझ्या मर्जीवर राहील.

लेडी कॅथेराईन—मिस बेनेट, अशानें कांहीं चालणार नाहीं! मला खरें काय तें स्पष्टपणें कळलें पाहिजे. माझ्या भाच्यानें तुला मागणी घातली आहे का?

एलिझाबेथ—परंतु अशी गोष्ट घडणें असंभवनीय अशीच आपली ठाम समजूत आहेना? मग हा प्रश्न कशाला?

लेडी कॅथेराईन—तो शुद्धीवर आहे तोंपर्यंत असें घडणारच नाही! माझेंच म्हणणें खरें ठरलें पाहिजे. परंतु नेम काय? तुझ्या युक्तीप्रयुक्तींनीं व मनोहर कृत्यांनीं कदाचित् भुरळ पडून त्याच्या हातून स्वतःला व स्वतःच्या

कुटुंबाला कमीपणा आणणारी गोष्ट घडून येण्याचा संभव आहे. तूं त्याला मोहनी घालून फसविलेंहि असशील !

एलिझाबेथ—खरोखरच असें कांहीं कृत्य मीं केलें असलें तर ती गोष्ट मीच कबूल करीन असें आपणाला वाटलें तरी कसें ?

लेडी कॅथेराईन—मिस बेनेट,आह्मी कोण आहोंत हें तुला समजत नाहीं का ? अशा प्रकारचीं उत्तरें सहन करण्याचा आह्मांला कधींच प्रसंग नाहीं. सर्व जगांत डारसीच्या जिव्हाळ्याचें असें आमच्याशिवाय कोणी नाहीं. तेव्हां त्याच्या हितसंबंधांतील अत्यंत गुह्य गोष्टीहि आह्मांला समजल्या पाहिजेत.

एलिझाबेथ—पण माझ्या गुह्य गोष्टी आपल्याला समजल्या पाहिजेत, असा कांहीं त्याचा अर्थ नव्हे ! आणि या तुमच्या वर्तनानें मीं आणखी कांहीं स्पष्ट बोलावें असें मनांतसुद्धां येणार नाहीं.

लेडी कॅथेराईन--आमचें ह्मणणें काय आहे हें तुला स्पष्टपणें समजलें पाहिजे. तुला ही जी मोठी आशा वाटत आहे त्याप्रमाणें तुझा त्याच्याशीं संबंध कधींहि घडणार नाहीं. मिस्तर डारसीचा व माझ्या मुलीचा विवाहसंबंध जुळणार आहे. तो तिच्याकरितां राखून ठेविलेला आहे, असेंच कां ह्मणेनास. यावर तुझें काय ह्मणणें आहे ?

एलिझाबेथ—मी एवढेंच ह्मणतें कीं, तसें असेल तर ते मला मागणी घालतील असें आपणाला वाटण्याचें कारणच उरत नाहीं !

लेडी कॅथेराईन—(स्वगत) आमचेंच बोलणें आमच्याच घशांत ही पोरगी घालूं पाहते ! (उघड) हें पहा, त्या दोघांचा संबंध कांहीं विशेष प्रकारचा आहे. अगदीं लहानपणापासून आह्मीं दोघी बहिणींनीं तें आधींच ठरवून ठेविलेलें आहे. त्या आमच्या योजनेप्रमाणें घडण्याचा आतां कोठें योग येणार, तों त्यांत तुमच्यासारख्या हलक्या कुळांतल्या पोरीनें का फांदाडा घालावयाचा ?

एलिझाबेथ—हें पहा, आणखी दुसरी कसली जर अडचण येणार नाहीं, तर बाईसाहेब ! आपल्या अगर मिस्तर डारसी यांच्या आईच्या मनांत त्यांचें लग्न तुमच्या मुलीशीं व्हावें असें होतें एवढ्याचसाठीं, त्यांच्याशीं लग्न करण्यास कबूल न होण्याइतकी मी दुधखुळी नाहीं, समजलांत ! अहो, तुह्मां दोघी बहिणींच्या हातांत होतें तेवढें तुह्मीं केलेंत ! पण मिस्तर डारसी यांचा ओढा जर आपल्या मावसबहिणीकडे नसला, तर त्याला तुमचा काय उपाय व दुसऱ्याचा तरी काय ?

जर त्यांचें लक्ष आपल्या मावसबहिणीच्या ऐवजीं माझ्याकडे लागलें असेल तर मीं तरी त्यांच्याशीं लग्न कां करूं नये ?

लेडी कॅथेराईन—कारण, तसें करण्यांत त्याचें अहित आहे ह्मणून! त्याचा दुर्लौकिक होऊन त्याच्या संबंधी माणसांकडून त्याची छीः थू होईल. आमच्यापैकीं एकजण दिखील तुमचें नांवसुद्धां काढणार नाहीं !

एलिझाबेथ—अरेरे, असें होईल तर मोठें दुर्दैव ह्मणावयाचें ! पण बाईसाहेब, आपण हें लक्षांत ठेवा कीं, कोणाहि स्त्रीला मिस्तर डारसीची बायको होण्यांत जो कांहीं आनंद आहे, त्याच्या पासंगालाहि, या तुमच्या कृतीमुळें होणारें दुःख पुरणार नाहीं !

लेडी कॅथेराईन—किती हट्टी व बेमुर्वत आहेस तूं एकंदरींत ! आह्मीं जो तुझा गेल्या वसंतांत इतका परामर्ष घेतला, त्याची फेड तूं अशा रीतीनें करितेस काय ? आमच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व कांहीं झालेंच पाहिजे ! दुसऱ्याच्या लहरींना मान तुकविण्याची आह्मांला मुळींच संवय नाहीं, व निराशा ही तर आह्मांला ठाऊकच नाहीं !

एलिझाबेथ—अबब ! असें का आहे ? तर मग बाईसाहेब, मला तर आपली फारच कींव करावी लागेल ! पण आपल्या या स्थितीचा माझ्यावर कांहीं एक परिणाम होणार नाहीं, हें आपण नीट लक्षांत ठेवा !

लेडी कॅथेराईन—तुला जर आपलें कल्याण व्हावें असें वाटत असेल, तर तूं ज्या परिस्थितींत वाढली आहेस तिच्या कक्षेच्या बाहेर जाण्याची तूं इच्छा करूं नयेस !

एलिझाबेथ—माझें कल्याण कशांत आहे हें जाणण्याची अक्कल देवानें मला दिली आहे ! तुमच्या भाच्याशीं लग्न केल्यानें मी तुह्मी ह्मणतां त्या कक्षेच्या बाहेर गेलें असें मानण्याचें कारण नाहीं. ते सभ्य गृहस्थ आहेत; मीहि पण एका सभ्य गृहस्थाची मुलगी आहें; आणि एवढया अंशानें आह्मी दोघेंहि सारख्या योग्यतेचीं आहोंत.

लेडी कॅथेराईन—होय, तूं सभ्य गृहस्थाची मुलगी आहेस खरी, पण तुझी आई कोण होती, तुझ्या माम्या कोण आहेत, त्यांच्या स्थितीची मला माहिती नाहीं, असें समजूं नकोस !

एलिझाबेथ—माझे नातेवाईक कोणी का असेनात ? जर तुमच्या भाच्याला त्यामुळें अडथळा वाटत नाहीं तर तुह्माला काय त्याचें ?

लेडी कॅथेराईन—असे आढेवेढे कशाला ? हें पहा, डारसीनें तुला मागणी घातली आणि तूं ती स्वीकारलीस असें झालें आहे का ?

एलिझाबेथ—(स्वगत) आपलें त्यांत कल्याण असलें ह्मणून काय झालें ! या बाईला उगीच खोटें सांगून कां फसवा ? (उघड) नाहीं बरें.

लेडी कॅथेराईन—वा, फार उत्तम ! आह्मांला आतां एवढेंच पाहिजे कीं, त्यानें मागणी घातलीच तर ती तूं स्वीकारणार नाहींस, असें वचन तूं द्यावेंस.

एलिझाबेथ—बाईसाहेब, आपण आहांत कोठें आणि बोलतां तरी काय ? मी नाहीं हो असल्या प्रकारचें वचन देणार !

लेडी कॅथेराईन—मिस बेनेट ! काय हें तुझें बोलणें तरी. मला अगदीं धक्का बसल्यासारखें झालें आहे. काय आश्चर्य हें ! मला तर तूं मोठी शहाणी मुलगी आहेस असें वाटत होतें. पण आह्मी माघार घेऊं असें मात्र समजूं नकोस. आम्ही मागतों तें वचन तूं दिल्याशिवाय मी येथून जाणारच नाहीं !

एलिझाबेथ—आणि मीहि साफ सांगतें कीं, तें मी कधींहि देणार नाहीं ! मला धास्ती घालून असें मूर्खपणाचें कृत्य करण्यास परावृत्त करण्याची कोणाची छाती आहे ? (शांत होऊन) बाईसाहेब, जरा विचार करा कीं, खरोखरच ते माझ्यावर प्रीति करीत असले तर माझ्या तुम्हाला दिलेल्या अशा वचनानें का तुमच्या मुलीवर त्यांचें प्रेम नसल्यास तें उत्पन्न होईल ? बाईसाहेब, मीं तुम्हाला सांगावें असें नाहीं. पण, प्रेमाची गोष्ट कांहीं निराळीच आहे ! मारून मुटकून का कोठें प्रेमोद्भव होत असतो ? प्रेम उत्पन्न करूं गेल्यानें उत्पन्न होत नसतें अन् दाबूं ह्मटल्यानें दाबलें जात नाहीं ! त्याचा उगम केव्हां व कसा होतो हें जरी कळलें नाहीं, तरी तो गुप्त प्रवाह एकदा का सुरू झाला, कीं त्याला अडथळा करण्याचें सामर्थ्य ज्याचें त्यालाच राहत नाहीं, मग इतरांची कथा काय ?

लेडी कॅथेराईन—वाहवा ग ढालगज पोरी ! मला का तूं संभावितपणाच्या गोष्टी सांगणार ? पण एवढ्यांतच माझें बोलणें संपलें असें नाहीं. तूं ह्मणशील कीं, तुझ्या त्या बहिणीच्या पळपुटेपणाची आह्मांला माहितीच नाहीं ! पण तसें नाहीं हो! लग्नाची ती मागाहूनची कल्पना—सर्व कांहीं आम्हांला कळलें आहे. अरेरे ! खुद्द दिवाणाचा पोरटा का आमच्या डारसीचा साडू होणार ? अशक्य ! अशक्य !!

अग, तुझा विचार तरी काय आहे? मानापमानाची तुला कांहीं कल्पना तरी आहे? पेंबरले ठिकाणाचें पावित्र्य अशा रीतीनें गमवावयाचें काय ?

एलिझाबेथ—बाईसाहेब, आतां बहुधा आपलें सर्व बोलणें संपलें असेल. मीहि पण आपल्याला पुनः एकदा निक्षून सांगतें कीं, मी नाहीं हो अशानें बधावयाची ! तुमची तशी कल्पना असेल तर तुह्माला माझा स्वभाव कळलाच नाहीं, असें ह्मणावें लागतें. कृपा करून पुनः मला या बाबतींत एक अक्षरहि विचारूं नका. आतांपर्यंत अपमान केलात तेवढा पुरे झाला !

लेडी कॅथेराईन—काय, तूंच असें वर्तन करून आह्मालाच अपमान केला ह्मणून ह्मणतेस ? हेंच का तुझें शेवटलें उत्तर ?

एलिझाबेथ—होय, हेंच शेवटलें उत्तर !

लेडी कॅथेराईन–(आंबट तोंड करून) तर मग तूं त्याच्याशीं लग्न लावणारच–

एलिझाबेथ—मीं असें कांहीं ह्मटलें नाहीं; पण माझें सौख्य ज्यांत आहे ती गोष्ट करण्याचा माझा निश्चय आहे. मग त्या कृत्यानें तुह्माला अगर दुसऱ्या कोणाला काय वाटेल याची मी मुळींच पर्वा करीत नाहीं !

लेडी कॅथेराईन—बरें आहे. आतां कसें काय वागावयाचें हें आमचें आह्मी पाहून घेऊं. मिस बेनेट ! तुझी ही महत्त्वाकांक्षा सफल होईल असें मुळींच मनांत आणूं नकोस ! लक्षांत ठेव, कीं मी आपलें ह्मणणें खरें करून दाखवीन. आह्मी येतों ह्मणूनसुद्धां आतां तुला सांगत नाहीं. तुझ्या आईलाहि आह्मी येतों ह्मणून निरोप सांगत नाहीं. तुमची तशी योग्यताच नाहीं ! आह्माला फार फार वाईट वाटत आहे.

[जाते.

एलिझाबेथ—(स्वगत) गेली का एकदांची बया ! अहाहा ! काय पण शहाणपण बाईचें ! आपण मोठी व्यवहारदक्ष ह्मणून या बाईला मोठी घमेंड आहे; पण या कामांत तिची सर्व अक्कल गेलीच, असें मला वाटतें. (विचार करून) पण इच्या या येण्याचा अर्थ तरी काय ? ती ह्मणते तशी बातमी खरोखरच उठली आहे का ? आणि तिचा उगम तरी कोठून झाला ! मला वाटतें मिस्तर कॉलिन्स यांच्या सुपीक मेंदूंतूनच ही शक्कल निघाली असावी. तें कसें का असेना, ती बातमी या बाईला तरी खरी वाटली हें खास. नाहीं तर तिनें हा उपद्व्याप करण्याचा प्रयत्न केला नसता. माझ्या बाबतींत तर हिची निराशा

झालीच; पण ही बया जर आतां त्यांनां भेटली आणि त्यांचें मन कलुषित करण्याचा हिनें प्रयत्न केला, तर कसें काय होईल? आमच्या दोघांच्या लग्नाच्या बाबतींत ज्या हरकती तिनें घेतल्या त्याचें मला मुळींच महत्त्व वाटलें नाहीं. पण त्यांनांहि तसेंच वाटेल काय? जर त्यांचे विचार कदाचित् द्विधा असतील तर ह्या बयाच्या शिष्टाईनें ते निश्चयात्मक बनतील, व मग ते माझा नाद साफ सोडून देतील! आणि तसें झालें ह्मणजे मिस्तर बिंगले यांनां कबूल केल्याप्रमाणें ते लंडनहून येथें लौकर येणारच नाहींत, आणि त्यांतच काय तें माझें मी समजून घेईन. अरेरे! किती दुःखद हे विचार!!

[जाते.

प्रवेश सहावा.

[**स्थळ**—लाँगबोर्न. मैदानांतील एक रस्ता. मिस्तर डारसी प्रवेश करितो.]

मिस्तर डारसी—(स्वगत) काय करावें! रात्रंदिवस दुसरा विचारच सुचत नाहीं! एलिझाबेथचें प्रेम कसें संपादन करितां येईल या गोष्टीचा कसा निदिध्यास लागून राहिला आहे.! तिचें प्रेम संपादन व्हावें ह्मणून आजपर्यंत मीं किती तरी प्रयत्न केले आहेत! परंतु असे प्रयत्न करून नंतर फलांची आशा करण्याचा धडा तरी मला तिनेंच शिकविला! केंटशायरमध्यें तिनें जी माझी मागणी नाकारिली, त्यावेळीं मला त्यांचें महत्त्व फारसें वाटलें नाहीं; परंतु त्या गोष्टीचा मी जों जों विचार करूं लागलों तों तों तिचें करणें अगदीं बरोबर होतें, असेंच वाटूं लागलें. तिनें मला जो धडा दिला तो अगदीं यथार्थ होता. त्याचा परिणाम मनावर फार उत्तम झाला. आपलें वर्तन सुधारण्याचा दृढ निश्चय करून त्याप्रमाणें मी वागूं लागलों. डारबीशायरमध्यें पुनः जेव्हां तिची गांठ पडली तेव्हां आपल्या मनावर तिच्या कानउघाडणीचा परिणाम चांगलाच झाला आहे हें तिला शक्य त्या मार्गांनीं मीं दाखविलें. पुढें तिच्या दुर्दैवानें परंतु माझ्या कदाचित् सुदैवानें लिडियावर तो प्रसंग आला तेव्हांहि आपण खटपट करून तो लागत असलेला काळीमा घालविला तर एलिझाबेथला बरें वाटेल व त्यायोगानें माझ्याविषयीं तिच्या मनांत प्रेमोद्भव होईल अशी आशा वाटत होती; नाहींतर त्या घाणेरड्या कामांत कोण पडलें असतें? मिस्तर विखमसारख्या पाजी माणसाची मनधरणी मीं काय ह्मणून केली असती? हजारों

पौंड खर्च करून लिडियाचें लग्न जुळवून आणण्याचें काय कारण होतें! पण ही सर्व खटपट, हे सर्व श्रम, ही सर्व झीज, केवळ त्या एका रत्नाच्या प्राप्तीसाठीं चालविली! जेन व बिंगले यांचें लग्न जुळल्यानेंहि थोडी भर पडेल ह्मणून मिस्तर बिंगले यास नेदरफील्डला येण्याचा आग्रह करून त्याला घेऊन आलों. जेनच्या अन्तःकरणांत बिंगलेविषयीं खरें खरें प्रेम वसत असल्याचें दिसून येतांच पूर्वींच्या सर्व गोष्टींची हकीगत मिस्तर बिंगले यास सांगितली. त्या बाबतींत जें थोडें फार कपट करावें लागलें होतें त्यामुळें प्रथम जरी माझ्यावर तो रागावला, तरी माझ्यावर त्याची भक्ति विलक्षण असल्यामुळें तो तें सर्व विसरून जाऊन आतां सर्वांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या लग्नाचा योग जुळून आला आहे. पण माझी स्थिति काय होणार? एलिझाबेथशिवाय अन्य स्त्रीवर माझें मन जाणें अगदीं अशक्य आहे, आणि त्या मानी व बाणेदार पोरीनें तर माझें ह्मणणें एकदां नाकबूल केलें आहे, तेव्हां कसें करणार? पुरुष जातीच्या व्यर्थ अभिमानास न पेटतां पुन्हां तिचें मन पहाण्याचा प्रयत्न केल्याशिवाय माझ्या मनाची तळमळ राहणार नाहीं! परंतु तसा योग जुळूनच येत नाहीं. कदाचित् या तिच्या आवडत्या फिरण्याच्या रस्त्यावर तिची गांठ पडेल ह्मणून एकटाच इकडे फिरण्यास आलों आहें. पहावें तर खरें काय होतें तें.

(एका बाजूनें जातो, तों एलिझाबेथ दुसऱ्या बाजूनें प्रवेश करिते.)

एलिझाबेथ—(स्वगत) माझ्या मनोवृत्तींत पडलेला फरक मिस्तर डारसी यांच्या लक्षांत आला असेल काय? परंतु हा विचार करण्यापूर्वी मजविषयींचें त्यांचें प्रेम अद्याप कायम असेल का?—एक मन होय ह्मणून उत्तर देतें, तों दुसरें मन नाहीं ह्मणून सुचवितें—पण नाहीं ह्मणावें तर ते इकडे येतात कां, पण आले तर बोलत कां नाहींत? या खेपेच्या पहिल्याच भेटीला मामा व मामींची चौकशी करण्यापलीकडे एक अक्षरहि आपण होऊन ते बोलले नाहींत—मलाहि जास्त बोलवेना—पण त्यांचा तो गंभीर चेहरा आपला कायम तो कायमच! यावरून काय बाई तर्क करणार? माझी त्यांनां मुळींच गरज नाहीं, हाच नव्हे का याचा अर्थ? पण असें ह्मणावें, तर ते नेदरफील्डला—नव्हे आमच्या घरीं, आपण होऊन आले तरी कां! हें बाई कशाचें लक्षण! मला तर बाई त्यांनीं माझ्याशीं पुष्कळ बोलावें, पूर्वीसारखें बोलावें—नव्हे मागणी घालावी, असेंच वाटत आहे—पण—पण मीच ना त्यांची मागणी एकदा नाकबूल केली आहे? तेव्हां ते होऊन पुनः मागणीचें

बोलणें काढतील, हें संभवनीय तरी आहे का? कोण हा वेडेपणा! केवढा हा भ्रम! परमेश्वरा! पुरुषजातींत अशी एक दिव्य शक्ति असेल कीं, जिला तसें करणें जिवापलीकडचें वाटणार नाहीं. हाय! हाय! हे विचार मनांत आले म्हणजे मला कितीदा सखेदाश्चर्य वाटूं लागतें व पूर्वीच्या माझ्या वर्तनाबद्दल अत्यंत दुःख होतें. पण आतां कसें करणार? लेडी कॅथेराईन येथून गेल्यावर त्यांची व तिची भेट होईल व ते येथें येणारच नाहींत, असें वाटलें होतें; पण त्यांनां आलेले पाहून मनाला त्या दिवशीं खरें खरें समाधान वाटलें. मला जे आवडते विचार सुचत आहेत तेच विचार त्यांच्याहि अन्तःकरणांत घोळत असतील काय? वेडे, एलिझाबेथ! संशय कसला घेतेस? लेडी कॅथेराईनची व त्यांची गांठ पडली असली पाहिजे, यांत काडीइतका संशय नाहीं. आणि गांठ पडली असूनहि ते येथें आले, यांतच काय तें समज. तें कसें का असेना, पण लिडियाच्या बाबतींत जे आमच्या कुटुंबावर पर्वतप्राय उपकार त्यांच्या हातून झाले आहेत, त्यांजबद्दल त्यांचे केव्हां एकदा आभार मानीन, असें मला झालें आहे. माझ्याशिवाय दुसऱ्या कुणालाच आमच्या घरांत ही गोष्ट माहीत नसल्यामुळें माझ्या कुटुंबांतील मंडळीचें त्यांच्याशीं जें वर्तन चालू आहे त्याजबद्दल मला फारच वाईट वाटत आहे. पण उपाय काय? रात्रंदिवस हेच विचार मनांत घोळत असल्यामुळें चैन कसें तें पडत नाहीं. मनाला थोडी हुशारी यावी म्हणून माझ्या त्या आवडत्या फिरण्याच्या रस्त्याला आलें, पण मनच जेथें थाऱ्यावर नाहीं तेथें बाह्य सृष्टीचें सौंदर्य काय करणार? सृष्टिसौंदर्याचा जींवतपणा पहाणाराचे अन्तःकरणवृत्तींत प्रतिबिंबित व्हावा लागतो. तेव्हांच त्याची जाणीव उत्पन्न होते. (पाहिलेंसें करून) अग बाई, इकडे कोण येत आहे हें? मिस्तर डारसी वाटतें! वा, फारच बरें. आतां एकदा मनाचा धीर करून मी त्यांच्याशीं बोलणारच!

(मिस्तर डारसी प्रवेश करितो.)

एलिझाबेथ—(उघड) आपली गांठ सहजीं पडली म्हणावयाची! मला नव्हतें ठाऊक, आपण इकडेच फिरावयाला आलां आहां. मिस्तर डारसी, आज किती दिवस सांगेन म्हणून म्हणत होतें, पण संधिच आली नाहीं. मी जें कांहीं सांगणार त्यामुळें तुमच्या मनाला काय वाटेल याची मुळींच पर्वा न करितां, केवळ माझ्या मनाला समाधान व्हावें म्हणून स्वार्थैक बुद्धीनें मी ही गोष्ट तुमच्या जवळ काढीत आहें, इतकी मी आपमतलबी बनलें आहें. माझ्या बहिणीच्या

लग्नाच्या बाबतींत तुम्हीं जे अनंत उपकार आमच्यावर केले आहेत त्यांबद्दल तुमचे अन्तःकरणपूर्वक आभार मानिल्यावांचून माझ्यानें राहावत नाहीं. ती गोष्ट कळल्यापासून मला किती कृतज्ञता वाटत आहे ह्मणून सांगुं ! तुमच्याजवळ हें केव्हां एकदां कबूल करीन असें मला झालें होतें, आणि माझ्या घरच्या दुसऱ्याहि माणसांनां ही गोष्ट कळली असती तर मला एकटीलाच आभार मानण्याचें कारण उरतेंना.

मिस्तर डारसी—खरेंच, मला फारच अवघड वाटत आहे ! मीं जें कांहीं केलें त्याचा भलताच अर्थ केला जाऊन तुह्मांला कसेंसेंच वाटेल, अशी ही गोष्ट तुमच्या कानावर गेली तरी कशी? मिसेस गार्डिनर अशा रीतीनें फसवितील असें मला वाटलें नव्हतें. !

एलिझाबेथ—माझ्या मामींला दोष देण्याचें कारण नाहीं. लिडियाच्या उच्छृंखळपणामुळेंच, आपण तिच्या लग्नाच्या वेळीं हजर होतां, असें तिच्या तोंडून बाहेर पडलें. आणि मग माझ्यानें तर खुलासा करून घेतल्याशिवाय राहवेना. तेव्हां मींच मामींला लिहून सर्व खुलासा आणविला. तेव्हां त्या दोघांनां शोधून काढण्यांत जे कष्ट आपण घेतलेत, जो अपमान सहन केलात, त्याबद्दल माझ्या कुटुंबांतील सर्व माणसांच्या तर्फे मी पुनःपुनः आपले मनापासून आभार मानितें.

मिस्तर डारसी—जर तुह्माला माझे आभारच मानावयाचे असतील तर ते केवळ स्वतःकरितांच माना. अशी गोष्ट केल्यानें तुह्माला सुख होईल ह्मणून, व मनांतील इतर हेतु साध्य होण्याचा संभव दिसला ह्मणून, ती गोष्ट करावी असें माझ्या मनानें घेतलें, हें मी नाकबूल करीत नाहीं. परंतु तुमच्या कुटुंबांतील इतर माणसांचा यांत कांहीं संबंध येत नाहीं! माझ्या अन्तःकरणांत केवळ तुमचीच मूर्ति वसत होती. एलिझाबेथ! असें करूं नका! तुमचें अन्तःकरण इतकें उदार आहे कीं, माझी अवहेलना तुमच्यानें करवणार नाहीं. जर तुमच्या मनोवृत्ति गेल्या एप्रिलमध्यें होत्या तशाच अद्याप कायम असतील तर मला तसें आतांच सांगा. माझ्या प्रेमांत मात्र अंतर पडलेलें नाहीं, व माझ्या पूर्वीच्या इच्छा अद्याप कायम आहेत. परंतु तुमच्या तोंडून शेवटचा असा एक शब्द एकदांचा ऐकला ह्मणजे या बाबतींत पुनः ब्रंहि काढण्याचें कारण उरणार नाहीं !

एलिझाबेथ—या दीन दासीवर फारच उपकार झाले! अगदीं शुद्ध प्रेमानें, कृतज्ञतापूर्वक व मोठ्या संतोषानें मी एवढेंच ह्मणतें कीं, मी आपल्या ह्मणण्याचे बाहेर नाहीं !

मिस्तर डारसी—खरेंच कीं काय? अहाहा! प्रिये, तुझ्या या उत्तरानें मला जो आनंद झाला आहे त्याचें शब्दानें वर्णन करितां येत नाहीं.! एलिझाबेथ, —माझे लाडके! या भाषणानें तूं जणूं मला अमृत पाजून पुनरपि जिवंत केलेंस, असेंच मला भासूं लागलें आहे !

एलिझाबेथ—(स्वगत) यांच्या मुखकमलाकडे माझ्यानें आतां पहावतच नाहीं—तें किती प्रफुल्लित झालें असेल!! तर पाहूंच का एकदां? (पाहण्याचा प्रयत्न करिते, तोंच लाजून) नाहीं, धीरच होत नाहीं ! डोळ्यांनों! किती तुह्मी लबाड आहांत ! आतां तुह्मांला त्यांच्याकडे पहा ह्मणूनच सांगत असतां तुह्मी पहात नाहीं. आणि नको ह्मटलें तर तुमच्यानें राहवत नाहीं ! (उघड) आपली फार आभारी आहें.

मिस्तर डारसी—एलिझाबेथ! माझ्या गृहिणीपदाला तूंच एक योग्य आहेस. आपला हा अद्वितीय संयोग उभयतांच्या गुणवृद्धीस कारण होऊन सर्व जगाला धडा घालून देण्याचें सामर्थ्य आपणांस उत्पन्न होणार आहे.

एलिझाबेथ—आपण ह्मणाल तें थोडेंच आहे! माझ्या अंगीं तसे कांहीं गुण आहेत, असें मला तरी वाटत नाहीं. तरी पण, जें कांहीं माझ्यामध्यें चांगलें असेल त्याचें कौतुक आपल्याशिवाय दुसरें कोण करणार ?

मिस्तर डारसी—खरेंच, मावशीची व माझी, अलीकडे लंडनमध्यें जी गांठ पडली ती जर पडतीना, तर हा योग इतक्या लौकर जुळून आला नसता !

एलिझाबेथ—ह्मणजे! लेडी कॅथेराईन यांनीं आपली गांठ घेतलीच ह्मणावयाची तर? मला तसें होईल असें वाटलेंच होतें !

मिस्तर डारसी—नुसती गांठच घेतली इतकेंच नव्हे, तर तिनें तुझा व तिचा जो संवाद झाला त्याची कच्ची हकीगत मला सांगितली. त्याचा परिणाम मात्र तिच्या कल्पनेच्या अगदीं उलट असा झाला. त्यामुळें माझ्या अन्तःकरणांत फारच आशा उत्पन्न झाली. कारण, मला तुझ्या स्वभावाची जी काय ओळख आहे त्यावरून तुझ्या अन्तःकरणांत जर माझ्याविषयीं प्रेम उद्भवलें नसतें तर तूं तें स्पष्टपणें व खुल्या दिलानें तिला सांगून टाकिलें असतेंस.

एलिझाबेथ—(हंसत) हो तर! माझ्या स्पष्टवक्तेपणाची आपल्याला चांगलीच आठवण राहिली असेल! आपल्याला आपल्या तोंडावर इतक्या शिव्या दिल्या तर आपल्या नातेवाईकाजवळ आपल्याविषयीं वाटेल तें मी बोलेन, हें अगदीं साहजिकच आहे.

मिस्तर डारसी—योग्य तेंच त्या वेळीं तूं बोललीस! त्या वेळची माझी वागणूकच अशी होती कीं, माझ्या डोळ्यांत पडलें तें अंजन अगदीं योग्य होतें! माझी मलाच त्या वर्तनाबद्दल खंती वाटत आहे.

एलिझाबेथ—त्या दिवशीं झालेल्या प्रकाराबद्दल एकमेकांनां दोष लावून भांडत बसण्यांत अर्थ नाहीं. कारण, खरी पारख करावयाची तर दोघांचेहि वर्त-नांत दोषच आढळून येईल. परंतु त्यानंतर दोघांमध्यें बरीच सुधारणा झाली आहे.

मिस्तर डारसी—तुझ्या बाबतींत हें ह्मणणें कितपत खरें ठरेल कोणास ठाऊक, परंतु माझ्या बाबतींत तें बरेंच खरें आहे. त्या प्रसंगींच्या तुझ्या एका उद्गाराचें मला पक्कें स्मरण आहे.

एलिझाबेथ—अग बाई, असें कोणचें तें बोलणें बरें?

मिस्तर डारसी—'आपण जरा जास्त सभ्य रीतीनें वागलां असतां तर' असेच तुझे शब्द होते. त्या शब्दांनीं मला तुझ्या कल्पनेच्या बाहेर छळलें आहे. त्यांचा खरेपणा लक्ष्यांत यावयाला बराच काल लागला, हेंहि या वेळीं कबूल केलें पाहिजे.

एलिझाबेथ—त्या शब्दांचा एवढा मोठा परिणाम होईल, असें मला नव्हतें वाटलें!

मिस्तर डारसी—तूं ह्मणतेस तें अगदीं खरें. माझ्या अन्तःकरणाला मार्दव नसावेंच, अशी तुझी कल्पना असली पाहिजे. कारण, त्यावेळीं माझें वर्तनच तसें होतें. बरें पण माझ्या पत्रानें कांहीं परिणाम केला का?

एलिझाबेथ—त्या पत्राविषयीं बोलावयाचें ह्मणजे थोडक्यांत सांगून भागणार नाहीं. परंतु येवढें खरें कीं, आपल्याविषयींचा गैरसमज दूर होण्यास मुख्य कारण तें पत्रच झालें. परंतु आतां त्या पत्राचा विचारच नको! ज्या व्यक्तीनें तें पत्र लिहिलें, व ज्या व्यक्तीला तें लिहिलें होतें त्यांच्या त्यावेळच्या व हल्लींच्या वृत्तींत इतका फरक पडला आहे कीं, त्या प्रसंगांतील प्रत्येक दुःख-जनक गोष्ट आपण विसरून गेलें पाहिजे. माझें तत्वज्ञान आपण आतां हलुहळू

शिकावें, बरें का? ज्या मागील गोष्टींनीं मनाला सुख होईल तितक्याच गोष्टींचें स्मरण ठेवणें चांगलें.

मिस्तर डारसी—ह्या तुझ्या तत्वज्ञानांत कांहीं अर्थ नाहीं! तुझ्या मागील वर्तनाचें सिंहावलोकन केलें तर त्यांत तुझ्या हातून कांहीं दोष झाला आहे, अशी नुसती भावनाहि उत्पन्न होत नाहीं; परंतु माझी स्थिति मात्र तशी नाहीं! तत्वश: नसलों तरी व्यवहारांत मी तोंपर्यंत आप्पलपोटेपणानें वागत आलों. लहान असतां मला चांगल्या गोष्टींचें ज्ञान करून दिलें होतें, परंतु आपल्या मनावर योग्य दाब ठेवण्यास मला शिकविलें नव्हतें. मला उत्तम तत्वांची ओळख करून दिली होती, परंतु त्यांचें अवलंबन गर्विष्ठपणानें व तोऱ्यानें करण्याची संवय होऊं दिली होती. दुर्दैवानें मी एकुलता एक मुलगा व कित्येक वर्षें एकुलतें एकच मूल असल्यामुळें माझ्या आईबापांनीं स्वत:, विशेषत: वडील चांगले असून मला त्यांनीं विघडविलें, व आप्पलपोटेपणांत व घमेंडींत वागण्यास शिकविलें. आपल्या कुटुंबांतील व्यक्तींखेरीज इतरांशीं बेपर्वाईनें वागणें व सर्व जनतेकडे क्षुद्र दृष्टीनें पाहणें, निदान आपल्याशीं तुलना केल्यास त्यांचें ज्ञान कांहींच नाहीं अशी भावना धरण्यास त्यांनीं संधि दिली–शिकविलें ह्मटलें तरी चालेल. काय सांगूं एलिझाबेथ! असा मी अठ्ठावीस वर्षांचा होईपर्यंत होतों, आणि पुढेंहि तसाच राहिलों असतों; परंतु लाडके! तुझ्यामुळेंच माझ्यामध्यें हा इष्ट फरक पडला! मी तुझा कां बरें ऋणी नाहीं? तूंच मला प्रथम जरा कटु परंतु परिणामीं हितकर असें औषध दिलेंस. तुझ्याचमुळें मला योग्य वळण लागलें. प्रेम संपादन होण्याला योग्य अशा स्त्रीचें मन वळविण्याला माझ्या अंगचे गुण किती कमी होते हें तूं मला शिकविलेंस. केवढी तुझी ही योग्यता–

एलिझाबेथ—पुरे आतां ही स्तुती! आतां इतकेंच विचारतें कीं, आपण जें मजवर प्रेम करूं लागलां त्याला आरंभ कसा झाला? कारण, एकदां आरंभ झाल्यावर मग पुढें त्याची वाढ आपल्या हातून कशी झाली हें मला तर्कानें समजून घेतां येईल.

मिस्तर डारसी—कोणच्यावेळीं, अगर कोणच्या ठिकाणीं, अगर कोणच्या शब्दांनीं अगर नेत्रकटाक्षानें प्रेमाचा उद्गम झाला, हें नक्की सांगतां येणार नाहीं. कारण, तो प्रारंभ झाल्यास बराच काळ लोटून गेल्यावर त्या प्रेमाची मला जाणीव उत्पन्न झाली.

एलिझाबेथ--आतां हें पुरें नाहीं का? पुनः केव्हां तरी स्वस्थपणें बोलूं. मिस्तर बिंगले यांनीं जेनला मागणी घातली व ती तिनें स्वीकारली, याबद्दल आपल्याला कसें काय वाटतें?

मिस्तर डारसी—मला त्यापासून खरा खरा संतोष वाटत आहे! बरें पण, आतां पुढें कसें काय करावयाचें? मिस्तर बेनेट यांचा रुकार मी आतां घरीं जातांच घेतों. तूंहि आपल्या आईचा रुकार लौकरच घे.

एलिझाबेथ—बरें तर.

[जातात.

प्रवेश सातवा.

[**स्थळ**–मिस्तर बेनेटचा वाडा. माडीवरील एका दिवाणखान्यांत मिस्तर बेनेट प्रवेश करितो]

मिस्तर बेनेट—(स्वगत) पोरीनें मनांत तरी काय आणिलें आहे! मिस्तर डारसीचा तिला किती तरी तिट्कारा अन् असें असून तिनेंच त्याची मागणी कबूल करावी ! केवढें आश्चर्य ! आमच्या लिझीच्या शहाणपणाबद्दल आजपर्यंतचा भरंवसा पोकळ ठरूं पाहातो ! मिस्तर डारसीच्या केवळ संपत्तीला भुलून खरें प्रेम नसतां तिनें त्याचा स्वीकार केला असें जर असेल, तर फारच फसगत झाली ह्मणावयाची. असो. मिस्तर डारसीबरोबर तिला वर येण्याविषयीं मीं निरोप पाठविलाच आहे. ती आतां आली कीं सर्व खुलासा होईल. परंतु आश्चर्यानें माझें मन अगदीं गोंधळून गेलें आहे. कांहींच तर्क करवत नाहीं.

(एलिझाबेथ प्रवेश करिते.)

मिस्तर बेनेट—लिझी, तूं करते आहेस तरी काय ? या मनुष्याची मागणी कबूल करितांना तूं शुद्धीवर तर होतीस ना? अग, तूं त्याचा नेहमीं द्वेषच नव्हतीस का करीत ?

एलिझाबेथ—(स्वगत) मीं प्रथमपासून आपलें मत देण्यांत जरा मऊपणा धरला असता तर किती बरें झालें असतें? आणि तें मतहि जरा विचार-पूर्वक बनविलें असतें, तर आजचा हा प्रसंग टळला असता. आतां सर्व गोष्टी खुलासेवार सांगितल्याखेरीज गत्यंतर नाहीं. (उघड) काय सांगूं बाबा, माझ्या अन्तःकरणांत त्यांच्याविषयीं खरें खरें प्रेम वसत आहे.

मिस्तर बेनेट—मग असेंच कां ह्मणेनास कीं, त्याच्याशीं लग्न लावण्याबद्दल तुझा निश्चयच झाला आहे. तो श्रीमान् आहे, जेनपेक्षां कपडालत्त्यांचा आणि गाडीघोड्यांचा तुझा बडेजाव जास्त राहील, एवढी गोष्ट खरी; पण त्यांत तुला खरें सौख्य लाभेल काय ?

एलिझाबेथ—बाबा, माझ्या मनांतील प्रेमाच्या अभावाखेरीज दुसरें वैगुण्य तर त्यांच्यामध्यें तुह्माला नाहींना दिसून येत ?

मिस्तर बेनेट—दुसरें वैगुण्य तें काय असणार ? तो गर्विष्ठ व तऱ्हेवाईक असल्याचें आपल्याला ठाऊक आहे; पण तुझें त्याच्यावर प्रेम असल्यावर मग या गोष्टीचें काय मोठेंसें आहे.

एलिझाबेथ—बाबा, काय सांगूं, माझा कंठ दाटून येत आहे. माझ्यानें बोलवत नाहीं–मला ते आवडत–न–व्हे माझें त्यांच्यावर पूर्ण प्रेम आहे. खरें ह्मटलें तर, त्यांच्या अंगीं खरा खरा गर्व ह्मणून ज्याला ह्मणतात असा मनोविकार मुळींच नाहीं. ते खरोखरच मनमिळाऊ आहेत. त्यांचा खरा खरा स्वभाव तुह्माला कळलाच नाहीं. बाबा, त्यांच्याविषयीं असे उद्गार काढून मला दुःख होईल असें करूं नका.

मिस्तर बेनेट—लिझी, मीं आपला रुकार आधींच दिला आहे. तो माणूसच तशा योग्यतेचा आहे. तो जें जें कांहीं कृपादृष्टीनें मागेल तें तें नाहीं ह्मणण्याची कोणाची प्राज्ञा आहे ? जर तुझा निश्चय झाला आहे तर मी तुलाहि आपला रुकार देतों; परंतु तूं अधिक चांगला विचार कर, असें सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. लिझी, तुझा स्वभाव मला पुरा माहितीचा आहे. तुझ्या पतीविषयीं तुझ्या मनांत आदर असल्याशिवाय, तो तुझ्याहून श्रेष्ठ आहे अशी तुझी भावना झाल्याखेरीज, तुला खरें सुख होणार नाहीं. अयोग्य संबंधानें तुझ्या असाधारण हुषारीवर भलताच परिणाम होईल. तुझ्या नशिबीं मग दुःख आणि अविश्वास हींच असणार ! तुझ्या अंगीं पतिनिष्ठा नाहीं असें पहाण्याचा दुःखद प्रसंग मजवर आणूं नकोस. तूं काय करीत आहेस हें निदान तुझ्यासारखीला तरी सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

एलिझाबेथ–बाबा, किती सांगू अन् सांगू तरी काय ? त्यांच्याविषयीं माझ्या अन्तःकरणांत एकदम प्रेमोद्भव झाला नाहीं; एवढेंच नव्हे, तर त्यांच्याविषयीं माझ्या मनांत जो गैरसमज होता तो थोडथोडा कमी होत जाऊन अखेर त्याची

जागा शुद्ध आणि सात्विक अशा प्रेमानें घेतली आणि माझ्या मनोदेवतेला शेवटीं असेंच वाटूं लागलें कीं, माझ्या योग्य पति जर कोणी असतील तर मिस्तर डारसी हेच होत ! हें कसें घडलें हें पाल्हाळ लावून आतांच सांगत बसत नाहीं. परंतु माझें त्यांच्यावर खरें खरें प्रेम आहे. ही गोष्ट शपथपूर्वक आपणाला सांगतें.

मिस्तर बेनेट—इतकें सांगितल्यावर आणखी काय पाहिजे ! बरें तर, आतां मला जास्त कांहीं बोलावयाचें नाहीं. तसें आहे तर तुझ्या योग्य असाच तो गृहस्थ आहे. याहून कमी योग्यतेच्या माणसाच्या पदरीं मीं माझ्या लाडक्या लिझीला टाकिलें नसतें, समजलीस ?

एलिझाबेथ—बाबा, त्यांच्या उदारपणाबद्दलसुद्धां कितीक सांगण्यासारखें आहे. आपल्या लिडियाच्या लग्नाच्या बाबतींत सर्व खर्च आणि खटपट आमच्या मामांनीं केली अशी आपली जी समजूत आहे ती सर्व चुकीची आहे. तें सर्व डारसी यांनीं केलें हो !

मिस्तर बेनेट—खरेंच कीं काय ! वा, आजचा हा दिवस केवळ आश्चर्यांचाच दिसतो ह्मणावयाचा. काय ह्मणतेस, मिस्तर डारसीनेंच या सर्व गोष्टी केल्या ? लग्न जुळवून आणिलें, त्यांनींच विखमला पैसा दिला, आणि त्याचें कर्जहि त्यांनींच वारिलें, व त्याला नोकरीहि त्यांनींच मिळवून दिली ?

एलिझाबेथ—होय, या सर्व गोष्टी त्यांनींच केल्या.

मिस्तर बेनेट—तर मग उत्तमच झालें ह्मणावयाचें. माझा किती तरी त्रास चुकेल व काटकसरींतून मी मोकळा होईन. जर तुझ्या मामानें हें सर्व केलें असतें तर त्याचे उपकार फेडणें मला भाग होतें, व त्याचा पैसाहि देऊन टाकिला असता; परंतु हे उतावीळ तरुण पुरुष सर्वच गोष्टी आपल्या ह्मणण्याप्रमाणें करूं पहातात. उद्यां मी त्याचा पैसा परत देण्याविषयीं गोष्ट काढितों, आणि काय बहार होते ती पहा. ! तो तुझ्या प्रेमाचे गोडवे गाऊं लागेल व सर्व गोष्टी जेथच्या तेथेंच रहातील ! खरेंच, बरें स्मरण झालें. त्या कॉलीन्सच्या पत्राची मौज माझ्या इतकी त्यावेळीं तुला कां वाटली नाहीं हें आतां लक्ष्यांत आलें. खरा प्रकार निराळाच असल्यामुळें त्याच्या थट्टेंत तूं सामील झाली नाहींस, हें अगदीं साहजिक होतें. पोरी, एकंदरींत आधीं लाथ मारून मग पाया पडण्यासारखाच प्रकार केलास ह्मणावयाचा ! अहाग वेडे, प्रथम त्याची टेर उडविण्यांत एका पायावर तयार, तर आत्तां त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाण्याला तितकीच आतुर!

चांगला तावूनसुलाखून नवरा पसंत केलास ह्मणावयाचें ! नशीव बिचाऱ्याचें, तो या तुझ्या प्रयोगांतून वांचला. बाळे लिझी, खुशाल आनंदानें जा बरें खालीं. माझ्या मनांतील सर्व संशय नाहींसा झाला, व तुलाहि जेनसारखेंच सौख्य लाभणार हें पाहून मला मनापासून समाधान वाटत आहे. दैवयोगानें तुह्मां दोघींनांहि अनुरूप पति मिळालेले पाहून माझ्या मनाला जें समाधान वाटत आहे, तें सांगतां पुरवत नाहीं !

(एक चाकर प्रवेश करितो.)

चाकर—धनीसाहेब, खालीं मिस्तर कॉलीन्स सहकुटुंब आले आहेत. ते व मिस्तर बिंगले वगैरे मंडळी बोलत बसलीं आहेत व आपणाला भेटावयाचें आहे ह्मणून वर्दी देण्यासाठीं मला पाठविलें आहे.

मिस्तर बेनेट—जा, व सर्वच मंडळींनां वर लायब्ररींत बोलाविलें आहे ह्मणून सांग.

(मिस्तर व मिसेस कॉलीन्स, जेन, बिंगले, आणि मिस्तर डारसी प्रवेश करितात.)

मिस्तर बेनेट—मिस्तर कॉलीन्स, आपण केव्हां आलां ?

मिस्तर कॉलीन्स—हीं आह्मी दोघेंहि आत्तांच आलों.

मिस्तर बेनेट–वा ! यावेळीं तुह्मी आलांत, हें फार बरें झालें. मिस्तर कॉलीन्स, आमची लिझी लौकरच मिस्तर डारसीची बायको होणार हो. आतां लेडी कॅथेराईनचें सर्वतोपरी शांतवन करणें तुमच्यावरच येणार. परंतु मला विचाराल तर झालें हेंच ठीक झालें, असेंच मी कोणालाहि सांगेन.

मिस्तर कॉलीन्स–असा कांहीं प्रकार इकडे घडणार याचा वास आह्मांला तेथेंच लागला. तेव्हां मिसेस कॉलीन्सनीं असें ठरविलें कीं, लेडी कॅथेराईन बाई साहेबांचा राग जरा शांत होईपर्यंत इकडे निघून यावें, व मलाहि मोठ्या कष्टानेंच खरें ह्मटलें तर त्यांच्या ह्मणण्याला रुकार द्यावासा वाटला, आणि मग तडक इकडेच निघून आलों.

मिसेस कॉलीन्स—लेडी कॅथेराईनची शिष्टाई फुकट गेलेली कळतांच वारा कसा वहात आहे हें माझ्या ध्यानीं आलें. मग अशा वेळीं लिझीजवळ असणें बरें असें वाटून इकडे येण्याचा बेत केला.

मिस्तर बेनेट—तुमचा विचार फार उत्तम ठरला, यांत शंका नाहीं..कारण, अशा आनंदाच्या प्रसंगीं लिझीची जिवलग मैत्रिण जवळ असणें जरूरच होतें. खरें कीं नाहीं लिझी ?

एलिझाबेथ—बाबा, शार्लटला या वेळीं एथें पाहून मनाला फारच बरें वाटतें !

मिसेस कॉलीन्स—(एलिझाबेथकडे वळून हळूच) लिझी, शेवटीं ज्यांनीं तुझी खोडी काढली ह्मणून चिडली होतीस त्यांनांच पसंत केलेंस ! पाहिलेंस, ईश्वरी सूत्र हें असें असतें बरें !

एलिझाबेथ—(मिसेस कॉलीन्सकडे वळून) कर बाई थट्टा ! तुला तशी संधिच मिळाली आहे.

मिस्तर बेनेट—मिस्तर बिंगले, आपल्या जिवलग मित्राचें आपण अभिनंदन केलें पाहिजे.

मिस्तर बिंगले—यांत काय संशय ! आतांच खुद्द त्याच्याचकडून मला सर्व प्रकार समजला व मनाला फारच समाधान वाटलें. जेनलाहि तसेंच वाटत आहे.

जेन—बाबा, आनंदातिशयानें माझ्या तोंडून शब्दच उमटत नाहींत. लिझी तूं धन्य आहेस !

मिस्तर कॉलीन्स—मिस्तर डार्सी, या प्रांतांतील हें दिव्य रत्न आपण संपादन केलेंत, याबद्दल लेडी कॅथेराईन यांनां काय वाटेल हा विचार बाजूला ठेवून, मी आपला मनापासून धन्यवाद गातों. तुमच्या अगदी योग्य अशी गृहिणी तुह्माला प्राप्त झाली आहे. आतां तिच्या समागमें मोठ्या आनंदानें व पूर्ण सौख्यानें संसार करा.

मिस्तर डारसी—तथास्तु !

[शेवटचा पडदा पडतो.]

समाप्त.